

# मैत्री

वर्षारंभ विशेषांक जून १९८३

किंमत पाच रुपये

## ग्रामदानाची प्रयोगभूमी

दुसरी आवृत्ती

ग्रामदानक्राती म्हणजे काय ? तिचे मार्ग कोणते ? कोरापुटमधील ( ओरिसा ) कार्याची माहिती करून घेतल्यामुळेच हे कळण्याजोगे आहे. श्री माजगावकर यानी याच दिशेने आपल्या पुस्तकात प्रयत्न केला आहे हा उपयुक्त झाला आहे असे मला वाटते.

**—डॉ. धनंजयराव गाडगीळ**

ज्यात प्रत्यक्ष व्यवहार्यता आणि दूरगामी क्रातिकारक ध्येयवाद याची सागड नाही, अशा प्रयोगाबद्दल महाराष्ट्रामध्ये जिव्हाळा उत्पन्न होत नाही. कोरापुटच्या प्रयोगाचे हे चिकित्सक दर्शन म्हणूनच मला उपयुक्त वाटते. समाजक्रातीचे ध्येय पुढे ठेवणाऱ्या सर्वांकडूनच या पुस्तकाचे स्वागत व्हावे असे मला वाटते.

**—दि. के. बेडेकर**

पुस्तक उत्कृष्ट. माहिती जमा करण्याची कसोशी, अवलोकन, त्यातून निष्कर्ष काढण्याची बुद्धी—सर्वच गुण यात दिसून येतात पण याहीपेक्षा स्वतत्रपणे चिंतन करण्याचे जे सामर्थ्य या लेखनात दिसून येते ते विशेष अभिनदनीय आहे. मला पुस्तक वाचून अत्यंत आनंद झाला.

¤ **—डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे**

## श्रीग्रामायन

दुसरी आवृत्ती

माजगावकराचे हे पुस्तक प्रभावी आहे यात शंका नाही. विचार करणाऱ्या माणसाचे लक्ष ग्रामीण समस्याकडे वेधून घेण्याची फार मोठी कामगिरी ते करीत आहेत. हे करताना माजगावकराचे साहित्यगुणही विशेषत्वाने चमकतात. तजेलदार भाषा, स्फोटक वर्णन, भेदक उपरोध, नाट्यमय प्रारभ व शेवट हे सगळे त्यात आहे. शिवाय मौलिक विचार आहेत, आणि शुद्ध भावकाव्यही कुठेकुठे आहे

**—प्रा. स. ह. देशपांडे**

श्री ग. माजगावकराच्या पुस्तकाचे नाव असे आहे की, ते उघडण्यापूर्वीच एक क्षण वाचकाने जरा थबकावे—'श्रीग्रामायन !' माजगावकराना जे जे व्यक्त करायचे आहे त्याचा 'मर्मबंध' म्हणजे हे नाव. स्वैर चिंतनात्मक लेख, मुलाखती किंवा मित्राशी पत्ररूप सवाद—अशा निरनिराळ्या अन् ललित शैलीची प्रसन्न डूब दिलेल्या माध्यमातून लेखकाने एक सूत्र गोवत नेले आहे अशा विविध माध्यमामुळे काही वेळा माजगावकराचे लिखाण भरकटत गेले असले तरी त्याना जी एक बैठक माडायची आहे तिचा पक्केपणा कुठेही गेलेला नाही.

**—डॉ. विद्याधर पुंडलिक**

जीवनाची चाकोरी सोडून, पायपीट करून ग्रामीण प्रश्नाचे वेगवेगळे पैलू जवळून पाहण्याचा हा एक आगळाच प्रयत्न आहे काही उपक्रमात पुढाकार व जबाबदारीही घेतलेली आहे

¤ **— आबा करमरकर**

## निर्माणपर्व

( आगामी )

काही रचनाप्रयोग आणि संघर्षक्षेत्रे यांचा सहभागपूर्वक घेतलेला शोध—शहाद्याची चळवळ, म्हैसाळ, जयप्रकाश आंदोलन, ग्राहक चळवळ . . . . इत्यादी.

¤

## जनतापर्व

( आगामी )

आणीबाणी, दुसरे स्वातंत्र्य, जनता राजवटीची सुरुवात—शेवट.

¤

## बलसागर

( आगामी )

हिंदुत्व, भारतीयत्व, राष्ट्रीय एकात्मता आणि राष्ट्रीय पुरुषार्थ

**पाच पुस्तके । प्रकाशनाच्या मार्गावर । श्री. ग. माजगावकर**

साप्ताहिक
# माणूस

¤

वर्ष : तेविसावे

अंक : पहिला ते चवथा

[ वर्षारंभ विशेषांक ]

¤

४ जून १९८३

किंमत : पाच रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ व आतील चित्रे :

संजय पवार

# वर्षारंभ....२३

'उत्तरप्रदेशातील गोंडा येथे भारत सरकार लवकरच एक अत्याधुनिक विद्युत्यांत्रिकी कारखाना सुरू करीत आहे. या कारखान्याचा आपल्या प्रकल्पावर काय परिणाम होईल ? आपल्या प्रकल्पाला लाभलेले यश पुसून टाकण्याचा, चालू असलेला बोलबाला कमी करण्याचा हा प्रयत्न आहे का ?' एका अनौपचारिक बैठकीत नानाजी देशमुख याना, अलिकडच्या त्यांच्या पुणे—मुक्कामात एकाने प्रश्न विचारला.

'आम्ही या नव्या उद्योगउभारणीचे, विद्युत्यांत्रिकी कारखान्याचे स्वागत करतो. कारण लोक दोन भिन्न विकासमार्गांची समोरासमोर तुलना करू शकतील व यातून चागले काय ते आपोआपच तावुनसुलाखून बाहेर पडेल.' नानाजी.

नियोजनविषयक हे दोन दृष्टिकोन आज आपल्यासमोर आहेत एक दृष्टिकोन ढोबळमानाने नेहरूप्रणीत म्हणता येईल. सरकारी मालकीचे किंवा सरकारी मदतीवर चालणारे मोठमोठे कारखाने, भाक्रा-नानगलसारखी प्रचंड धरणे बांधून येथला मागासलेपणा, गरिबी हटवायची हा नेहरूंचा दृष्टिकोन होता. भाक्रा-नानगलला तर त्यांनी नवे तीर्थस्थान म्हटले होते याउलट येथील जनतेची शक्ती, स्थानिक साधनसामग्री ध्यानात घेऊन, ती जागृत व संघटित करून, प्रत्येकाला, वाढत्या लोकसंख्येला रोजगार मिळेल असे अल्प भांडवली विकासतंत्र येथे शेती-ग्रामोद्योगद्वारा निर्माण करायचे, हा गाधीजींचा—विनोबाचा दृष्टिकोन होता. पुढे लोहिया, दीनदयाळ उपाध्याय, जयप्रकाश यानी हा अधिक विस्तारित व विकसित केला. नेहरूप्रणीत शासनाधारित विकास व गांधी-विनोबा, जयप्रकाश-दीनदयाळप्रणीत जनाधारित विकास असे हे दोन भिन्न आरंभबिंदूपासून निघणारे दोन पर्याय आहेत. नेहरूप्रणीत पर्यायाचे फलित आपल्यासमोर आहेच. लोकसंख्या खेड्यातून शहरावर कोसळली, म्हानगरांऐवजी शहरांच्या आता महाझोपडपट्ट्या होण्याची पाळी येऊन ठेपली. देश परकीय कर्जात अधिकाधिक रुतत चालला आहे. खेड्यातील जनतेला फारसे विस्थापित न करता तिला सहभागी करून घेऊन, तिचे ज्ञान व कौशल्य वाढवून, विकेंद्रित पद्धतीने देशविकास साधू पाहणारा गाधीवादी पर्याय नेहरू युगात मागेच पडला होता. काही गाधीवादी बेटे उरली, कुठे आश्रम उभे आहेत; पण या पर्यायात जोम नाही. नानाजी देशमुख यांचा गोंडा प्रयोग किंवा तशा स्वरूपाचे इतर स्वयंसेवी प्रकल्प म्हणूनच विशेष महत्त्वाचे ठरतात. लुप्त झालेला गांधीवादी विकासमार्ग पुन्हा अशा प्रयोगाच्या यशामुळे विचारात घेतला जाण्याची शक्यता आहे. 'माणूस'ने म्हणूनच गोंडा प्रकल्पावर तीन सविस्तर लेख गेल्या महिन्यात प्रसिद्ध केले, मागील व चालू अंकात बीड जिल्ह्याच्या सद्य:स्थितीची कल्पना आणून देणारी दोन वार्तापत्रे दिली.

¤

उत्तरप्रदेशात गोंडा तसा महाराष्ट्रात बीड हा जिल्हा नानाजी देशमुख यांनी आपल्या विकासप्रयोगासाठी, ग्रामोदयप्रकल्पासाठी निवडलेला आहे. या सहारा

वाळवटात नंदनवन फुलेल का ? आव्हान फार मोठे आहे, प्रचंड आहे एवढेच सध्या जाणवते आहे....

¤

हे पाचही दीर्घ लेख-वार्तापत्रे एकत्रित स्वरूपात **'दीनदयाळ–जयप्रकाश स्वयंनियोजन पुरवणी'** द्वारा वाचकासमोर ठेवावेत अशी मूळ कल्पना. ही पुरवणी माणूस वासंतिक विशेषांकात द्यायची होती; पण वासंतिक विशेषांकच एकाऐवजी चार निघाले. साहित्य इतके जमले की, एका मोठ्या वासंतिक विशेषांकाचा विचार सोडूनच द्यावा लागला. ओघानेच पुरवणीही विभागून देणे आले. चार वासंतिक व चालू पाचवा वर्षारंभ विशेषांक मिळून पुरवणीचे सर्व साहित्य वाचकासमोर ठेवले आहे.

¤

बावीस वर्षांपूर्वी, पहिल्या अंकाच्या मुखपृष्ठावर 'माणूस'ने पं. जवाहरलाल नेहरू यांचे एक अवतरण उद्धृत केले आहे. पंडितजींनी म्हटले आहे –

'मती कुंठित करून टाकील असा आमचा हा वर्तमानकाल आहे भविष्याकडे आमची दृष्टी लागली आहे आणि भूतकालालाही आम्ही विसरू शकत नाही. भूतभविष्याच्या रस्सीखेचीत आम्ही सापडलो आहोत. हा संघर्ष कसा सोडवायचा आणि आमच्या आधिभौतिक गरजा भागवणारा परंतु त्याबरोबर आमची आध्यात्मिक धारणा कायम राखणारा जीवनमार्ग कसा शोधून काढायचा हाच आमच्यापुढे प्रश्न आहे. कोणती नवी ध्येये किंवा नव्या जगाला अनुरूप होतील अशा रीतीने फेरबदल करून कोणती जुनी ध्येये आम्हाला जनतेपुढे ठेवता येतील आणि जनतेला कशा रीतीने जागृत आणि कार्यप्रवृत्त करणे आम्हाला शक्य होईल हा प्रश्न आमच्यापुढे आहे.'

पंडितजींना जाणवलेली ही रस्सीखेच, ओढाताण अजूनही चालूच आहे आध्यात्मिक धारणा कायम ठेवून आधिभौतिक गरजा भागवणारा जीवनमार्ग अद्याप तरी आपल्याला सापडलेला नाही; पण नवीन नवीन लोक, संस्था-संघटना हा मार्ग शोधण्यासाठी पुढे येत आहेत हेही भाग्य कमी नाही. अशीही शक्यता आहे की, जो मार्ग उद्या, भविष्यात सापडेल तो पूर्णत: नेहरूंचाही नसेल व गांधीजींचाही नसेल. या दोन्ही टोकांना जवळ आणणारा एखादा नवाच पर्याय पुढे येईल. तो येईल तेव्हा येवो. शोध, धडपड, नवे प्रयोग चालू राहणे हेच आज तरी महत्त्वाचे आहे निदान 'माणूस'ने तसे मानले. गेली बावीस वर्षे अशा किती तरी धडपडींची, प्रयोगांची शोधप्रयत्नांची ओळख 'माणूस'ने वाचकांना करून दिली आहे तसा 'माणूस' एकाकीच मोठी संस्था, पक्ष-संघटना वगैरे काहीही मागे नाही. तरीही बावीस वर्षे ही ओळखयात्रा अखडपणे चालू राहिली. वाचकांनी चांगली साथ दिली म्हणून. ही साथसंगत यापुढेही चालू राहावी, ही विनंती. **– संपादक**


*With Best Compliments From*

**SHREEPAD INDUSTRIES**

Mfrs of Kumaun Brand
Magnetic & Engineering Tools


Add : Parvati Industrial Estate
Pune 411 009 (INDA)

Phone No. (0212) 441765

*With Best Compliments From*

**Hotel International**
Kolhapur
517 A/1, Shivaji Park, Kolhapur
Phone–25156

Provides well furnished, with running hot & cold water, piped music, intercom 22 rooms
and
Cater Indian, Tandoori, Punjabi, Mogalai, Chinese & Continental Cuisions
in
Well decorated dining hall & specious lawn
With
Well stocked permit room



# त्यांची माझी मैत्री

**शोभा भागवत**

परवा एक अनोळखी माणूस दाराशी आला.

दारातच उभा राहून चौकशी करत होता· माझ्या नवऱ्याकडे आला होता तो !

'भागवतसाहेब आहेत का घरात ?'

'नाही. मुंबईला गेलेत !'

'केव्हा परत येतील ?'

'सोमवारी सकाळी येतील !'

'मी सोमवारी नऊ वाजता येऊ का ?'

'हो. या ना. नक्की भेटतील ! काही निरोप सांगू का ?'

'मी ठाण्याहून आलो होतो मुद्दाम त्यांना भेटायला !'

'ठाण्याहून ? काय नाव आपलं ?'

तो क्षणभर काही बोलेना. हा का घुटमळला बरं ? विचार करत असावा–तेवढ्यात म्हणाला–

'अग, तू मला ओळखलं नाहीस का ?'

त्यानंतर एक–दोन सेकंदच–

अरे, तू विजय का ?'

तिसरीचा वर्ग डोळ्यांसमोर आला. खाकी चड्डी, पांढऱ्या सदऱ्यातली अनेक मुलं आठवली न् त्यात हा चेहरा. मग खूप गप्पा झाल्या. तो अमका कुठे असतो ? तमकी भेटते का ? शाळेतल्या बाई–सर–आणखी अनेक !

विजय गेल्यावर मला वाटलं लहानपणी एका शाळेत होतो म्हटलं की केवढी आपुलकी वाटते आपल्याला. अनोळखी माणसाचा चक्क मित्र बनतो, गप्पा होतात !

पण खुद्द लहानपणी मात्र सगळा आनंदच असतो !

पहिली दुसरीतलं फारसं काही आठवत नाही; पण तेव्हा बहुतेक मुलं भांडतात म्हणून मुलांशी मैत्री नको असं मुलींचं मत आणि मुलींशी खेळता येत नाही म्हणून मुलींशी मैत्री नको असं मुलांचं मत असतं.

तिसरी–चौथीच्या वयात थोडी गंमत यायला लागते. मग मुलं जवळून चालली की, मुलीनी काही आवाज काढणं, लक्ष वेधून घेणं, मुलीच्या घोळक्याला मुलांनी चिडवणं सुरू होतं.

आमचे एक गुरुजी होते. त्यांनी वर्गात ताकीदच दिलेली होती, मुलांशी बोलायचं नाही, मुलाकडे पहायचं नाही. मुलांना शिवायचं नाही. मुलांनाही तशीच ताकीद होती. हा त्याना त्यांच्या भाषा, गणित, इतिहास, भूगोल विषय शिकवण्याइतकाच महत्त्वाचा विषय वाटायचा. इतर विषय आम्हाला कळावेत म्हणून ते शिकवायचे. हा 'विषय' मात्र कळू नये अशी काळजी घ्यायचे !

तेव्हा रस्त्यानी वर्गातला एखादा मुलगा जाताना दिसला तरी आम्ही त्याच्याकडे मोकळेपणाने पहायचो नाही, मग बोलणं आणि शिवणं तर दूरच !

शाळा सगळी अशीच संपली असती; पण दहावीत आमचे वर्गशिक्षक म्हणून जे आले ते इतरापेक्षा फार वेगळे होते. ते म्हणायला लागले, आपल्या वर्गातल्या मुला–मुलींनी मोकळेपणान बोललं पाहिजे. एकमेकाना मदत केली पाहिजे एकमेकांच्या घरी गेलं पाहिजे. बोलणार नाही वगैरे वेडेपणा चालणार नाही! त्यानी आम्हाला मग एकेका बाकावर एक मुलगा एक मुलगी असं पण बसवलं होतं.

तेव्हा हा केवढा चर्चेचा विषय होता इतर वर्गातल्या मुलींमध्ये ! त्या पाणी प्यायच्या निमित्ताने आमच्या वर्गात डोकावून पण जायच्या कधीकधी !

माझ्या वर्गात एक पहिल्या नंबराचा मुलगा होता. तो आमच्या जवळपासच रहायचा. एकदा माझ्या वडलानी त्याला रस्त्यावरून जाताना हाक मारली. तो नको नको म्हणत असताना त्याच्या पाठीवर हात ठेवून त्याला घरी आणलं. शाबासकी दिली अभ्यासाबद्दल. इतरही काही बोलले असावेत; पण त्या प्रकारात मला इतकी लाज वाटली होती आणि उद्या मैत्रिणी काय म्हणतील अशी भीतीही वाटली होती !

पण कुठेतरी तो घरी आला म्हणून बरही वाटलं होतं. वडील म्हणाले होते, अग जसे आपले भाऊ तशी वर्गातली मुलं. त्यांना काय लाजायचं ? पण शाळेच्या वयात भावाबरोबर कधी रस्त्यानी जायची वेळ आली तरी लोक काय म्हणतील असं मनात असायचं आणि भाऊही शक्यतोतर बहिणीबरोबर जाणं टाळायचेच.

तुम्ही आम्ही सगळेच खरं तर यातून गेलेलो असतो. मुलगा आणि मुलगी एकमेकाशी बोलले तर कुठल्याशा कॉलेजात शिपाई शिट्टी वाजवतो म्हणे. ही शिट्टी आपल्या मनात फार लहानपणापासून शिरलेली असते, आणि आजूबाजूला शिपाई नसला तरीही ती शिट्टी वाजते.

मोकळी मैत्री होऊ शकत नाही त्यामुळे तिला मग इतर वळणं लागतात. अमकीचा नवरा तमका अशा परस्पर जोड्या ठरवून चिडवाचिडवी होते. गंमत म्हंजे मुलंही अशा जोड्या ठरवून चिडवत असतात. असं ज्याच्या बद्दल चिडवलेलं असत त्याच्याबद्दल खास जिव्हाळा मनात असतो.

अगदी लहानपणापासून अगदी आजवरच्या मित्राना आठवायचं म्हटलं तर मला वाटतं ज्यानी आपल्यावर प्रेम केलं, आपल्यालाही ज्यांच्याबद्दल जिव्हाळा वाटला, प्रेम वाटलं असे अनेक मित्र आपल्याला मिळालेत. मुलाकडे पहायच नाही, त्यांच्याशी बोलायचं नाही, ह्या लहानपणच्या वळणातून आपण हळूहळू मुक्त झालो, पुरुषाकडे पुरुष म्हणून न पहाता माणूस म्हणून पहायला शिकलो. हा प्रवास, त्यातले अनुभव आठवायला आवडतात.


प्रत्येक काळात, परिस्थितीत प्रेम व्यक्त करण्याच्या पद्धती वेगळ्या होत्या. प्रत्येकाला व्यक्तिमत्वाच्या आठवणीही वेगळ्या आहेत. ह्या मित्रांमधे काही वयानी लहान आहेत. तर काही वडलाच्यापेक्षाही मोठ्या वयाचे मित्र आहेत, आते मावस चुलतभाऊ आहेत, सर आहेत, नवऱ्याचे मित्र आहेत, मैत्रिणीचे नवरे आहेत. ऑफिसमधले सहकारी आहेत, अगदी थोडा काळ काही निमित्तानं भेटलेले; पण कायमचे मित्र बनलेले, पत्रमैत्रीनं जवळ असणारेही आहेत. कधी प्रवासात भेटलेलेही लोक आठवतात. त्याना मित्र म्हणावं की नाही, कुणास ठाऊक. कारण कधीही पुन्हा ते भेटत नाहीत; पण त्या दोन तीन तासात कधी इतकं छान मनापासून बोलणं होतं. अगदी छोट्या खेड्यात राहणाऱ्या कधी निरक्षर कधी किंचित शिकलेल्या लोकाशीही एस्. टी. च्या प्रवासात अशा छान गप्पा झालेल्या आठवतात.

असं ज्याच्या ज्याच्याशी जुळतं, मोकळं मनापासून काही बोलणं होऊ शकत तो मित्र ! प्रत्येकाचा स्वभाव वेगळा, आपल्याशी असलेलं नातं वेगळं, आपल्याकडून असलेल्या अपेक्षा वेगळ्या, आपल्याकडे पाहण्याची दृष्टी वेगळी असतेच. आपलंही कुणाशी काय बोलायचं ते ठरत जातं. कुणाशी साहित्याबद्दल, कुणाशी समाजाबद्दल, कुणी राजकारणातलाच असतो, कुणी खूप घरगुती, कुणाच्या भावनाचा सूर आपल्याशी जुळतो, कुणाशी अगदी नवऱ्याबरोबरच्या भांडणाबद्दलसुद्धा बोलता येतं, कुणाकडून नुसतं कौतुकच ऐकायचं असतं, तर कुणी थट्टामस्करीसाठीच असल्यासारखा असतो, कुणी एखादा हसतखेळत आपले दोष नेमकेपणानं टिपणारा असतो.

प्रत्येकाशी असं नातं वेगळं असतं. कुणाबरोबरचं नात फुलतं, कुणाबरोबरचं तसच राहतं आपल्याही वागण्याचा काटा प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वानुसार इकडे तिकडे झुलत असतो. पण त्यात फार तफावत नाही असू शकत. कारण आपलेही काही आडाखे असतात. आवडीनिवडी असतात.

मित्र म्हणजे तो आपल्याला समजून घेणारा हवाच. थोडफार कौतुक करणाराही हवा हे कौतुक बोलूनच दाखवावं लागतं असं नाही. नजरेत शिरून थट्टा मस्करी करणारा हवा; पण त्याचबरोबर गंभीरपणाचाही समज असलेला हवा. त्याला आपल्याबद्दल विश्वास हवा, तसा आपल्याला त्याच्याबद्दलही. काही चुकलं तर लगेच परखडपणे सागणाराही हवा. अप्रियस्यच पथ्यस्य असं बोलू शकणारा हवा. माझा लहानपणापासूनचा एक मित्र आहे आता आम्ही फारसे भेटतही नाही. पत्रं लिहावीत असही वाटत नाही; पण जेव्हा केव्हा भेटतो तेव्हा वाटतं मधे इतका वेळ गेला तरी आपली मैत्री जशीच्या तशीच टवटवीत आहे. त्याच्याइतका विश्वास टाकणारा, प्रेम करणारा, समजून घेणारा क्वचितच भेटतो.

मित्रांच्या बाबतीत मनात एक अट असते. आपल्याकडे निव्वळ बाई म्हणून बघणारा माणूस मित्र होऊ शकत नाही. काही माणसाची नजर नेमकी नको तिथेच स्थिरावत असते, अंगावरून फिरत असते. त्याच्याशी सलग बोलणंही कठीण जातं. मग मैत्री तर



पत्रमैत्रीही...

दूरच. क्वचित खूप जवळच्या आणि चागल्या मित्राबद्दल तर अनेकदा असा अनुभव येतो की, तो पुरुष आहे. त्यामुळे वागण्यात, बोलण्यात काही अंतर ठेवायला हवं, हेही विसरायला होतं. मैत्रिणीशी असावी तितकीच जवळीक त्याच्याबद्दल वाटते. तो त्याच्या नितळ दृष्टीचा परिणाम असतो.

हेसुद्धा जरा गमतीशीरच आहे; पण बाई म्हणून आपल्याकडे बघणारा माणूस मित्र होऊ शकत नाही; पण तरीही आपल्या बहुतेक पुरुष-मित्राबद्दल, स्त्री-पुरुषातल एक नैसर्गिक आकर्षणही असतं.

सहलीला जाताना प्रवासात मैत्रिणीच्या जवळ बसणं आणि मित्राच्या जवळ बसणं यात किंचित फरक असतोच. पाय घसरून पडताना मैत्रिणीनं हात देऊन सावरणं आणि मित्रानं हात देण यात मित्रान हात देण्यान काही तरी वेगळ वाटतं.

मात्र याला शारीरिक किंवा लैंगिक आकर्षण नाही म्हणता येणार. कारण घसरून पडताना धरलेला हात जर आणखी काही वेळ त्यानं तसाच धरून ठेवला तर ते ह्या मैत्रीत बसणारं नसत ! बरं हा मित्र आपला नवरा म्हणून आपल्याला आवडला असता का ? असा प्रश्न स्वत.ला विचारला तर उत्तर नाही येतं.

माझे एक सध्या सत्तर वर्षांचे असलेले छान मित्र आहेत. ते सागत होते त्यांनी जवळजवळ त्याच्याच वयाच्या त्यांच्या मित्राच्या बायकोला विचारलं होतं, 'आम्हा पुरुषांना कायम अनेक स्त्रियांबद्दल आकर्षण वाटत असतं तसं तुम्हालापण वाटतं का ?'

या बाईही म्हणाल्या, 'वाटतं की. त्यात पुरुष आणि बाई असा वेगळेपणा का करायचा ? आम्हालाही अनेक पुरुषाबद्दल आकर्षण वाटत, फक्त बोलता येत नाही !',

हे मोकळेपणानं मान्य करण्याची आपली प्रथा नाही. जिथे परपुरुषाशी बायकोनं, मुलीनं बोललेलही चालत नाही, लगेच सशय घेतला जातो, ती घरं त्या नैसर्गिक आकर्षणाच्या तरल सुखाला पारखी होतात. मग त्या आकर्षणाला विकृत वळणही लागतात.

साहित्यात अनेकदा आपण अशा अव्यक्त आकर्षणाबद्दल वाचतो, त्यातून येणारं गुदमरणं अनुभवतो. स्त्री-पुरुषामधले हे लोखंडी पडदे कमीजास्त प्रमाणात सगळीकडेच दिसतात. अगदी खूप शिकलेल्या, पुढारलेल्या कुटुबातही. अमेरिकेत आमच्या ओळखीच्या भारतीय डॉक्टराकडे पार्टी होती. नवराबायको दोघही डॉक्टर. १०–१५ लोक जमल्याबरोबर डॉक्टरबाई म्हणाल्या, 'आता तुम्ही पुरुष–पुरुष वर जा, आम्ही बायका-बायका खाली बसतो !' असं का याचा विचार करताना जाणवल की, विशेषत: परदेशात असताना भारतीय सस्कृती टिकवण्याची फार मोठी जबाबदारी आपल्यावर असते असं काही लोक मानतात. मग त्यासाठी भारतातून खास पंचाग नेणं, पाडव्याला गुढी उभारण्यासाठी खण, चवू नेणं, देव नेणं, निराजनं नेण, तसंच हे स्त्री पुरुषानी वेगळं-वेगळं बसणं असावं. आमचा एक भाविक मित्र तर अमेरिकेत त्याच्या घरी गणपतीच्या मूर्तीसमोर रुचिरा पुस्तकातलं रंगीत मोदकाचा फोटो असलेलं पान उघडून ठेवायचा. ह्या सास्कृतिक उपासमारीपेक्षा गणपतीला कॉर्नफ्लेक्सचा नैवेद्यही चालला असता कदाचित. आमच्या मित्रानी केलेली ही गणपतीची उपासमार मला प्रातिनिधिक वाटायची.

मुलामुलीची मोकळी मैत्री होऊ शकत नाही त्यामुळे तरुणपणी मुलीची स्वप्नं रंगविण्यात, मुलीविषयी विचार करण्यात किती वेळ जातो याची कबुली जेव्हा नवऱ्यानं मला दिली होती तेव्हा खूप नवल वाटलं होतं. ही उपासमार, हा मोकळेपणाचा

अभाव कधीकधी जन्मभर साथ देत राहतो आणि सरळपणे स्त्री-पुरुष एकमेकांकडे पाहूसुद्धा शकत नाहीत. कधी ह्या आपल्या 'गुणा'चं भांडवलही करतात.

माझ्या कॉलेजमधला एक मुलगा परवा भेटला तेव्हा म्हणाला,

'तू दिसली होतीस मागे एकदा.'

'मग हाक का नाही मारलीस ?'

'तुझे मिस्टर बरोबर होते !'

'मग काय झालं ?'

'म्हटल त्यांना आवडतं का नाही कोणास ठाऊक !'

'अरे, त्याला आवडतं माझ्या मित्रांना भेटायला' असं मी म्हटल्यावर तो विचारात पडला

ही भीती अनेकाच्या मनात असते. याउलट 'हा आता ओळख दाखवतो की काय !' अशी भीतीही अनेक मुलीच्या मनात असते, नवरा बरोबर असताना !

हे जसं घरच्या, समाजाच्या दडपणातून घडत, तस आधुनिकतेच्या दडपणातूनही वेगळ्या प्रकारे घडतं. आपल्या मुलाला मैत्रिणी आहेत आणि मुलीला 'मित्र आहेत याचं प्रदर्शन करायला पालक इतके उत्सुक असतात ! त्यात मुलाची मैत्रीण दिसायला वगैरे जरा बरी असली तर फारच छान. मनात हा हिच्याशी लग्न करेल की तिच्याशी याचे अदाजही चालू असतात.

अशी 'केलेली' मैत्री कधी माणूस समजून घेण्यासाठी नसतेच. त्यात आपण प्रेमात पडलो आहोत या कल्पनेच्याच मुलं इतकी प्रेमात असतात की मैत्री दूरच राहते.

अगदी असच मुलीचही होतं; पण अजूनही मुली आपण होऊन मुलांशी मैत्री करण्याइतक्या धीट नसतात. खुद्द मुलानाही अशा धीट मुली आवडत नाहीत.

स्त्रीच चारित्र्य ही समाजात चवदार चर्चेची बाब आहे याचं दडपण मुलीवर येतं. याउलट मैत्रीचा बाजार माडणाऱ्याही काही मुली असतात. पुढचा अंदाज घेऊन, आपलं स्त्रीत्व पणाला लावून हे मैत्रीचं जाळं पसरतात आणि स्वार्थ साधून घेतात. अशा व्यवहाराला मैत्री का म्हणावं ?

शाळा-कॉलेजच्या वयात मुलामुलीना मोकळेपणानं भेटण्याची, भटकण्याची संधी मिळायला हवी. मुलगे कसे असतात हे कळल्याशिवाय कशा प्रकारचा मुलगा आपल्याला नवरा म्हणून आवडेल हे कसं कळावं ? अर्थात मैत्री करायची ती हा अंदाज घेण्यासाठी असं नव्हे. मैत्री हा आयुष्यातला एक स्वतन्त्रच आनंद आहे; पण जेव्हा विसाव्या वर्षीसुद्धा मुलगी 'माझं मी लग्न ठरवण्यात धोका पत्करणार नाही. कसा नवरा हवा ते माझ्यापेक्षा माझ्या आईवडलाना जास्त चागलं कळतं ते अनुभवी आहेत.' अस म्हणते तेव्हा असं वाटतं की, ही मुलगी चार जणांना जवळून ओळखत असती तर असा असा हवा तसा तसा नको एवढ तरी बोलू शकली असती.

बहुधा ह्या वयातल्या मुलांच्याही बायकोबद्दलच्या कल्पना दिसण्याभोवतीच घुटमळत असतात. आमच्या नात्यात मला आठवतं एक लग्नाळू मुलगा मला सुधावहिनीसारखा रंग, मीनावहिनीसारखे केस आणि नलूवहिनीसारखे डोळे असलेली बायको हवी असं म्हणायचा तिथ स्वभावाचं वर्णन येऊ शकत नाही कारण कुणा मुलीचा स्वभाव माहीत कुणाला असतो? स्वप्नातल्या धुक्यातून दिसणारी गोष्ट मुलीचं किंवा मुलाच दिसणं एवढीच असते. मैत्री हा अपरिचित प्रात असतो न् तो तसाच राहतो.

कशी होते ही मैत्री ? आपोआप होते का ? की जाणीवपूर्वक करावी लागते ? कधी आपोआप होते. काही माणसंच अशी असतात की, त्याच्याविषयी विश्वासच वाटतो. खूप जुनी ओळख असल्यासारखे एकमेकाना समजून घेतल जातं. गप्पा रगतात, मतं जुळतात. मग आठवतं If you like what I like and if you hate what I hate, I do not count whether you like me or hate me. विचार भावना जुळण्यातून मैत्रीपण जुळत जाते.

मग या मैत्रीआड वय, प्रात, देश, जात, धर्म काहीही येऊ शकत नाही. आमचे एक वयाने बरेच मोठे मित्र आहेत. त्यांच्याशी बोलताना ते त्याच वय कधीच जाणवू देत नाहीत. बरोबरचेच वाटतात. एवढच नाही तर आठवडाभर ते भेटले नाहीत तर आम्हाला चैन पडत नाही. मुलाच्या खोड्यापासून कामातल्या प्रश्नांपर्यंत कुठल्याही विषयावर त्याच्याशी बोलता येतं. त्याचा आधार वाटतो.

अमेरिकेतल्या ऑफिसातला माझा एक मित्र त्याला विसरणं केवळ अशक्य ! त्याचही लग्न झालेलं होतं. माझंही. आमच्य गप्पात एकमेकाच्या नवरा-बायकोबद्दलही खूप बोलण व्हायचं मला फुलं आवडतात म्हटल्यावर त्यानं लक्षात ठेवून कितीदा वेगवेगळ्या ऋतूतली खास फुल आणली ! तिथून निघताना म्हणाला, 'मी पत्र पाठवण्यात एक नबरचा आळशी आहे. त्यापेक्षा एकदम कधी तरी तुझ्या दारातच उभा राहीन. मला भारताबद्दल खूप आकर्षण आहे आणि एक लक्षात ठेव – Whatever you forget Shobha, do not forget your smile. I love it.' त्यानं ज्या प्राजळपणे, निरागसपणे हे म्हटलं ते आठवलं की स्वप्नात असल्यासारखच वाटतं.

मग मनात येतं म्हणजे आपल्याला चागल म्हणणारे लोकच आपल्याला आवडतात का ? तसं नाही. एखादा मित्र असाही असतो ना की तो आपल्याला कधी चागलं म्हणतच नाही आपले दोष नेमके टिपतो; पण त्यावद्दलही जिव्हाळ्यान बोलतो. आपल्या स्वतःशीच अधिक ओळख करून देतो.

खऱ्या मित्राच्या सहवासात आपण स्वतःला अधिक कळतो, आवडतो. मित्र आपल्या गुणाना जाग आणून देतो. एरवी मुक्तपणे चागल म्हणणारी, दाद देणारी, वाइटाला वाईट म्हणणारी माणसं मिळतात कुठे आपल्याला ? आपापला स्वार्थ न् मोठेपणा यापलीकडे मोठी समजली जाणारी माणसंही जाऊ शकत नाहीत. अशा वेळी अशा जवळच्या मित्राचं साहचर्य हा मोठा आधार असतो, आपणही तो आधार द्यावा लागतो. अनेकदा ह्या मोकळ्या मैत्र्या लग्नानतर दुरावतात. जोडिदाराच्या मनात सशय घर करतो. खरं तर लग्नाआधीचे बायकोचे मित्र किंवा लग्नानंतरचेही स्वतन्त्रपणे तिचे असलेले मित्र याचा नवऱ्याना राग येण्याचं कारणच नाही; पण कधी तरी ताण येतात. मित्राबद्दलच्या आपल्या भावना नेमक्या व्यक्त करता आल्या तर नवरा आणि मित्र यांची आपल्या मनातली स्थानं वेगवेगळी असतात हे पटायला हरकत नाही. मात्र मित्र नवऱ्यापेक्षा सरस ठरू लागला तर पचाईत होतेच. त्यामुळं मुळात नवरा-बायकोत चागली मैत्री असली तरच मैत्रीचा अर्थ समजू शकतो ! बायकोला हवं

असलेलं सगळं प्रेम, सगळं मानसिक, बौद्धिक साहचर्य आपण देऊ शकू असा समर्थपणाचा आव नवऱ्यांनी कशाला आणायचा? एका माणसावर हे ओझं फार होतं.

मला आठवतं नवीनच ओळख झालेल्या एका माणसानं माझ्या मैत्रिणीला मोरपिसांचा खूप मोठा गुच्छ देऊन एक दिवस चकित केलं होतं. ती अतिशय तरल संवेदना असलेली, भाबडी, सरळ! इतकी भारावून गेली! म्हणाली, 'हे माझ्या नवऱ्याला कधी का सुचलं नाही ग?'


नवरा-बायको एकमेकांच्या फार जवळ येऊन जी जीवनातली गंमत घालवतात ती असे मित्र मिळवून देतात.

मित्राबद्दल आणि मैत्रीबद्दल लिहिता लिहिता असं जाणवायला लागलं की, सगळेच अनुभव काही छान नसतात. कित्येकदा मैत्री तुटते, मैत्री जुळतच नाही कधी माणसाच्या मनाचा तळ सापडतच नाही. ५०-५० वर्षं एकत्र राहूनही नवरा-बायको जसे एकमेकांना परकेच राहतात तसंच मैत्रीबद्दल वाटतं. कितीही विचार केला, बोललं, लिहिलं, अनुभवलं तरी अजून बरंच शिल्लक आहे, अज्ञात आहे असच वाटत. आपलच मनसुद्धा कधी तरी परकं वाटतं.

मित्र तरी सगळे सारखे कुठे असतात? मित्रामित्रात फरक असतोच. कुणी आपल्याला १० मिनिटं भेटायला आवडतो, कुणी अर्धा तास, कुणी दोन तास, कुणी खूप वेळ. ही वेळाची मर्यादा ओलांडली तर खूपदा बोलता बोलता त्या मित्राच्या पलीकडची भिंत आरपार दिसू लागते इतका कंटाळा येतो. अर्थात् नेहमी बोलावंच लागतं असं कुठे आहे? नुसतं एकमेकाच्या सान्निध्यात अबोलपणे बसूनही खूपसा संवाद होऊ शकतो.

हा संवाद, ही मुला-मुलींची, स्त्री-पुरुषाची मोकळी मैत्री होण्यासारखं वातावरणच आपल्या समाजात नाही. हॉटेलात एका टेबलाभोवती रोज अड्डा टाकला म्हणून काही त्याला मैत्री म्हणत नाहीत. ऑफिसच्या निमित्तानं रोज आठ तास बरोबर काढले म्हणजे काही मैत्री होत नाही. एकमेक दिसायला आवडले impression पडलं म्हणूनही मैत्री होत नाही.

दडपणांमधून, वेगवेगळ्या गंडांमधून माणसांचं वागणं इतकं गढूळ होतं की,



मनं निर्व्याज असतील तर मैत्रीही फेसाळत राहते.

त्यातून अनेकदा मैत्रीचा तळ दिसतच नाही-

काही माणसांचे डोळे नेहमी परीक्षकाचेच डोळे असतात. ते सतत काही तरी शोधत असतात, अदाज घेत असतात, तुम्हाला जोखत असतात. ते मनापासून प्रेम करू शकत नाहीत. अशा माणसांशी मैत्री होत नाही.

काहींचं स्वत:वरच इतकं प्रेम असतं की, त्यांना दुसऱ्याशी घेणंच नसतं. त्यांच्याशीही मैत्री कठीण जाते.

काहींच विश्व फारच मर्यादित असतं. त्यांच्याशी सूर जुळतच नाही.

काही सगळ्या मैत्रीचा, आपुलकीचा आव तर आणतात; पण अंतरीचा जिव्हाळा कधी स्पर्श करत नाही. मग तीही मैत्री अधातरीच राहते. मूळच धरत नाही.

काहींना आपण किती हुषार आहोत याचं प्रदर्शन करण्याची इतकी घाई असते की, त्यांच्यापासून थोडं लांबच रहावंसं वाटतं.

काहींच्या जीवनात इतर माणसाशी असलेल्या सबंधात इतकी गुतागुत अन् रहस्यं असतात की, ते इकडच तिकडं न सांगणं, सगळं न सागण, काही लपवणं, ही तारांबळ करावी लागते. अशा माणसाशी माझं फारसं जमू शकत नाही

मैत्रीच्या निमित्तानं तुम्हाला कोणी वापरून घेऊ पहातं आहे असं वाटायला लागलं की मैत्री संपतेच मग ते वापरून घेणं तुमच्याकडे वारंवार येण्याच्या स्वरूपात असत, कधी सतत आपली दु:खं तुमच्याजवळ सांगणं असतं किंवा तुमच्याशी असलेल्या मैत्रीचं प्रदर्शन इतरत्र करणं असतं किंवा हक्कानं गळ घालून काम करून घेण्यात असतं.

कधी मैत्रीच्या डोलाऱ्याच्या तळाशी शारीरिक अभिलाषाही असते.

अशा मैत्र्या नितळ नसतात म्हणून त्या टिकतही नाहीत.

अर्थात् वर्षानुवर्षं टिकली म्हणजेच ती मैत्री खरी असं नसतं. आपल्या मित्राला किंवा मैत्रिणीला कचऱ्याची पेटी बनवून आपल्या दु:खांचे बोळे सतत त्यात टाकत राहणं याला मोकळेपणा नाही म्हणता येणार. त्याचे ताण दुसऱ्या माणसावर येत असतात हेही मित्राला समजायला हवं. चांगल्या मित्राला समजतं !

माझ्या एका मित्रानं मैत्रीच्या सुरुवातीलाच विचारलं होतं मला तुला वारंवार भेटायला, तुझ्याशी बोलायला, तुझ्याकडे यायला आवडतं; पण मी तुझ्या मैत्रीचा स्वार्थानं फायदा तर घेत नाही ना ? तुला ते नको वाटेल तेव्हा मोकळेपणाने सांग. मला स्वतःला तुझ्यावर लादायचं नाही. त्याच्या अशा म्हणण्यानेच आमची मैत्री पक्की झाली !

हे मैत्रीतलं अवधान कायम राहतं. का ? की, खूप जवळचे मित्र एकमेकांना गृहीत धरू लागतात ? काहीसा हक्क गाजवण्याचा प्रकारही व्हायला लागतो. असं होऊ नये !

नवऱ्याला मित्र बनवावं; पण चांगला मित्र नवरेपणा गाजवू लागला तर त्याला तिथेच थांबवावं. हक्क गाजवून आपले भावी जीवन मर्यादित करण्याचा अधिकार कुणा-नाही देऊ नये. कोणी तो घेऊही नये !

मैत्रीत शारीरिक स्पर्शाचा बाऊ करावा का ? नितळ मैत्रीत खरं तर हा प्रश्नच येणार नाही. मात्र मनावरचे संस्कार इतके पक्के असतात की, स्पर्शानं मनातली शिट्टी वाजू लागतेच. कधी यात आसपासच्या लोकांच्या नजरा बोलतात !

एकदा आमचं एक मित्र–जोडपं आमच्याकडे आलं होतं. त्यातली बायको ही माझ्या नवऱ्याची चांगली मैत्रीण. ह्या जोडप्याचे काही मतभेद होते. त्यांच्यात गंभीर ताणतणाव होते. बोलता बोलता त्यांचं भांडण सुरू झालं आणि मग बायको असहाय्यपणे रडू लागली. मी जवळ गेले. तिला जवळ घेतलं. पाठीवरून हात फिरवला. तिला शांत केलं. ते गेल्यावर माझा नवरा म्हणत होता, ‘तू हे करू शकलीस; पण माझ्या मनात येऊनही मी नाही करू शकलो. तिला काय वाटेल, तिच्या नवऱ्याला काय वाटेल, तुला काय वाटेल याचा नकळत मनात विचार





**Offer your guests a lavish Spread of colors, forms and finishes.**

Let them wonder who made this stunning variety possible. Tell them it's Neoluxe.

Neoluxe has changed India's standard of decorative laminates and its commitment continues in creative laminates.

Neoluxe offers you imported designs like wood-grains, marble, natural cane, wood, ivory, cork, fabric etc.


And a wide range of finishes too! Glossy, Satin, Matt, Suell, One or Two tones with three dimensional effect, leather and wood-touch and photo and metal finishes too. You would wonder there could be so many varieties!

Authorised Dealer

**ARTWOOD**

'Ashapuri', 270/1 Pandit Jawaharlal Nehru Marg
Pune 411 002. Phone : 447775, 447968, 447961

Mona Ads.



काही नजरा शरीरभर फिरत राहतात.

येतो आणि वाटतं 'समाजाचं दडपण' असं आपण म्हणतो; पण ते आपल्या इतक्या जवळच्या माणसांचंही दडपण असतं. स्वतःच्या मनाचंही असतं हे जाणवलं!'

स्पर्शाभोवती एवढे प्रचंड खंदक आपण का खणून ठेवलेत?

कदाचित या स्पर्शातूनच पुढे शारीरिक संबंध येतील आणि अनाचार माजेल अशी भीती सगळ्याच्या मुळाशी असते. मोकळेपणा, स्वातंत्र्य, स्त्री–पुरुषांची जवळीक म्हणजे स्वैराचार अशी समीकरणं मानणारे अनेक महाभाग आपल्याला दिसतात. आपण मैत्रीची अनेक अंग मान्य करतो; पण लैंगिक संबंध हेही त्याचं एक अंग असू शकतं असं काही थोडी माणसं म्हणतात ते आपण मान्य करत नाही!

लैंगिक संबंध हे मात्र शरीरापुरते मर्यादित नसतात. मनं जुळतात, भावना गुंततात आणि माणसं जवळ येतात. कधी एखाद्या मित्राची, मैत्रिणीची ती गरज असते ती पुरी केली पाहिजे असं दुसऱ्याला वाटतं आणि मैत्रीला एक वेगळं अंग लाभतं!

कुणी म्हणतात की, मित्र–मैत्रिणीत कधीतरी हे सहजपणे घडून जातं. त्यामागे फार मोठा विचार नसतो. नंतरही ते फारसं लक्षात रहात नाही. मनाला लागत नाही!

असं कसं होतं? होऊ शकतं?

ह्या सगळ्याबद्दल मला स्वतःला असं वाटतं की, ही सहजपणे घडणारी गोष्ट नाही. अशा बाबतीत अगदी समाजाचं दडपण नाही. अशी कल्पना केली तरी स्वतःच्याच मनाची, आपल्या इतरांशी विशेषतः नवऱ्याशी किंवा बायकोशी असलेल्या मैत्रीची एवढी प्रचंड बांधिलकी आपण मानत असतो की, ही गोष्ट सहज घडू शकत नाही. घडली तर मनाची प्रचंड ओढाताण अपरिहार्य असणार!

मग एवढं दडपण सोसून, स्वतःच्या चिरफळ्या उडवून सुख मिळवायचं ते खरंच सुख राहतं का? एवढी प्रचंड किंमत मोजायची का?

पण किती तरी गोष्टींची किंमत करताच येत नाही जीवनात! माझ्या अनेक मित्रांशी–मैत्रिणींशी या विषयावर खूप मोकळं बोलणं झालेलं आहे. त्यावरून वाटतं प्रत्येकाच्या गरजा, प्राधान्य कशाला या गोष्टी ठरलेल्या असतात त्याप्रमाणे माणूस निर्णय घेतो. कधी विचारपूर्वक निर्णय घेण्याइतका अवधी, उसंतच नसते. वावटळीत सापडल्यासारखी माणसं प्रसंगात सापडतात. असं जगताना इतरही क्षेत्रात अनेकदा होत नाही का? सर्व निर्णय विचारपूर्वक थोडेच घेतो आपण? सगळं पूर्वनियोजित थोडंच असतं? कित्येकदा तर लग्न, नोकरी, धंदा, मूल, योगायोगानं, अपघातनंही घडून येतात. सगळ्याला काटेकोर नियम नसतात हेच खरं. ज्याचे त्यानंच नियम शोधायचे असतात. तेवढं स्वातंत्र्य जाणत्या माणसाला जबाबदारीनं घेता येतं. आपल्या जवळच्या माणसांना दुखवू नये म्हणून तो हे संबंध टाळतो तर कधी एखादा म्हणतो त्यात काय आहे? एवढा बाऊ काय करायचा त्याचा?

मला त्यातल्या बाजू समजू शकतात; पण शारीरिक अभिलाषेपायी जवळ येणं आणि केवळ त्यासाठीच चिकटून राहणं याला मी मैत्री म्हणणार नाही.

मात्र स्त्री-पुरुषमैत्रीबद्दल लोकमत इतकं पक्कं तयार आहे की, जवळीक दिसली रे दिसली की, यांचे शारीरिक संबंध असणारच असं गृहीतच धरलं जातं. अशा चर्चा करणारे सांस्कृतिक बलात्कारच करत असतात आणि हा बलात्कार सिद्ध करण्याची जबाबदारी मैत्री असलेल्या स्त्री-पुरुषांवर येते. चर्चा करणारे मोकळेच राहतात.

अशी आमची मैत्री अतिशय चांगली मैत्री आहे हे सिद्ध करण्याची वेळ कुणावर येऊ नये. माझ्या मते मैत्री स्त्रीशी की पुरुषाशी हा प्रश्नच नाही आणि चांगली मैत्री की, वाईट मैत्री हाही प्रश्न नाहो. मैत्री एक तर असते नाही तर नसते. असली तर ती चांगलीच असते; पण दुःख याचं वाटतं की, आपल्या बहुसंख्य किडलेल्या न् खुरटलेल्या मनांना मैत्री समजूसुद्धा शकत नाही. मग मैत्री होणं दूरच!

ह्या मैत्रीच्या संदर्भात कृष्ण–द्रौपदीचं नातं मला नेहमी विचारात पाडतं. कृष्णानं द्रौपदीला थाळी दिली, तिला वस्त्रं पुरवली, त्याचं बोट कापलं तर तिनं आपला भरजरी पदर फाडला. सोळा हजार एकशेआठ बायका

असलेला कृष्ण न् पाच नवरे असलेली द्रौपदी नवरा–बायकोच्या नात्यापलीकडचं काही नातं त्यांना हवंसं वाटलं. ते निर्माण झालं त्याही काळात !

एरवी माणसं आपापले कुटुंबीय आणि नातेवाईक यांच्याशी व्यावहारिक संबंध ठेवण्यापलीकडे जात नाहीत. आपापली कवचं सांभाळून एकमेकांना टकरा देत राहतात. मित्रांची गरजही त्यांना भासत नाही. ते म्हणतात – नसले मित्र तर काय बिघडलं ? कशाला हवेत मित्र ?

मित्र नसले तर अर्धंच जग कळेल, समजेल. कदाचित अर्धंही नाही कळणार ! निकोप समाजात माणसांचे असे तुकडे पडू नयेत. समाजात लहान मोठी, तरुण-वृद्ध स्त्री-पुरुष सर्वांना एकत्रपणे रहाता आलं पाहिजे. एकमेकांशी संवाद साधता आला पाहिजे. प्रत्येकाच्या वाढीला भरपूर जागा ठेवता आली पाहिजे. अनुभवांना कायम आपल्या मनाचा दरवाजा खुला राहिला पाहिजे.

पुरुषांशी मैत्री हाही एक अनुभव आहे. जीवनाची अधिक जवळून ओळख पटवणारा, व्यक्तिमत्त्वात भर घालणारा, व्यक्तिमत्त्व समृद्ध करणारा विवाहसंस्था आपण मान्य केली. अजूनही ती टिकली पाहिजे असं आपण म्हणतो. ती मोडकळीला आली, स्त्रिया स्वतंत्र होताहेत म्हटलं की, आपला जीव गुदमरतो; पण ह्या विवाहाच्या मुळाशी स्त्री–पुरुषातलं सामंजस्य, मैत्री, शारीरिक व्यवहारापलीकडचं उदात्त नातं, जवळीक, एकमेकांचा लळा, आपुलकी ह्याबद्दल आपण कधीच ' आग्रह ' धरला नाही. खरं तर याच्याशिवाय जीवन रुक्ष आहे ! ज्यांना कधी जवळचे मित्र मिळाले नाहीत, मैत्रिणी मिळाल्या नाहीत त्यांनी आयुष्यातलं फार मोठं समाधान गमावलं ! मैत्रीची ही हिरवळ, हे बहरलेले फुलांचे ताटवे जीवनाला सौंदर्य देतात, अर्थ देतात, उत्कटता देतात; पण हे ताटवे जादूनं फुलत नाहीत आपल्या जिवाचं रान करण्याची तयारी लागते. ही हिरवळ फुलवायची तर आपल्या हृदयात भरपूर ओलावा असावा लागतो आणि नुसता ओलावाच नाही तर धैर्यसुद्धा लागतं !

आता कुणी म्हणेल आमच्या फार मनात असतं मैत्रिणी असाव्यात मित्र असावेत; पण मिळतच नाहीत. कोणी मैत्री करतच नाही. मित्र-मैत्रिणी असे सहज मिळत नाहीतच. मिळवावेच लागतात ! त्यासाठी आपल्या मनाची दारं खुली असावी लागतात काही बदलायची, काही देण्याची, घेण्याची तयारी लागते माणसातल्या माणूसपणाबद्दल मनात कुतूहल, आदर असावा लागतो. त्याच्याकडे केवळ बाई, सुंदर बाई, आकर्षक; देखणा पुरुष म्हणून बघून चालत नाही. ती मूर्तिकाराची गोष्ट माहीत आहे नं ?

तो म्हणतो दगडात मूर्ती असतेच. मी फक्त दगडाचा नको असलेला भाग उडवून टाकतो. आपल्याही व्यक्तिमत्त्वाला, स्वभावातला, जीवनाच्या दृष्टिकोनातला अडणारा भाग दूर केला, माणसामाणसांच्या नात्यातले अडथळे, भिंती दूर केल्या तरी मैत्री साकार होते. माणसांना भेटण्याची, त्यांच्या जवळ जाण्याची त्यांना समजून घेण्याची समज निर्माण करावी लागते. कधी मैत्री होते; पण ती टिकविता येत नाही. माणसांना जपता येत नाही. कधी त्यांचा स्वार्थ, कधी आपलाही आड येतो. कधी मैत्री तुटते.

उध्वस्तपणाला तोंड द्यावं लागतं. मनस्ताप होतो. असं का व्हावं याची उत्तरं मिळत नाहीत; पण हे सगळं मानवी असतं. त्यातून माणसं कळत जातात. या सगळ्यात स्वतःला जसंच्या तसं शाबूत ठेवता येत नाही. आपलेही टवके उडत असतात; पण ते जगण्याला आकार देतात. अर्थ देतात.

मैत्रीत कधी स्वतःचे टवके उडू न दिलेल्या सांभाळलेल्या गुळगुळीत दगडांपेक्षा हे आकार, अर्थ अधिक लोभसवाणे वाटतात.

मैत्रीचे अनेक पदर, अनेक छटा, त्यातलं स्वप्न आणि त्यातलं सत्य, त्यातला उल्हास आणि त्यातली विषण्णता, त्यातलं जगणं, त्यातलं मरणं, त्यातलं भोगणं, त्यातलं सोसणं, त्यातली कोवळीक, त्यातला व्यवहार, त्यातला स्वार्थ, त्यातला त्याग, त्यातून येणारी प्रसन्नता तर कधी वेड लागेपर्यंत वाटेचाला येणारी उदासीनता, मोह पाडणारं सौंदर्य, थरकाप उडवणारी कुरूपता, त्यातली खोली, त्यातला उथळपणा हे सगळं अनुभवायलाच हवं ते सगळं शब्दात पकडणं अवघड आहे.

म्हणूनच एवढं लिहूनही असं वाटतं आहे की अजून खूप राहिलंय लिहायचं ! □




**माणूसची ' वासंतिक ते वर्षारंभ ' विशेषांक मालिका या अंकाबरोबरच संपत आहे.**
**आता थोडी विश्रांती पाहिजेच ! म्हणून माणूसचे जून महिन्यातले यानंतरचे तीन अंक निघणार नाहीत.**
**आता अंक एकदम २ जुलैचा !**

**– व्यवस्थापक**

पळसवाडी–मराठवाड्यातलं एक छोटसं गाव.
गावातल्या एका पडीक काटेरी गायरानात भिल्ल, लमाण, चाभार या सारखी मागासलेल्या जमातीची मंडळी बियाणं पेरायचा प्रयत्न करत होती; पण गावातल्या जमीनदारांचा याला विरोध. कारण एकच, 'ही कोण घेड लागून गेली जमीन कसायला? ' फॉरेस्ट खात्याच्या जमिनीवर अतिक्रमण केल्याच्या वहिमावरून यातली काही मंडळी जेलमध्ये जाऊन आलेली. बाहेर आल्यावर काय व्हायचं ते होऊ दे या इराद्यानं उभी ठाकली, आणि भारत सेवक समाजाच्या काही कार्यकर्त्यांनी या लोकाना हात दिला, ज्वारीचं बियाणं आणून दिलं आणि शेतीसाठी एक नवी योजना या लोकाच्या समोर ठेवली–सहकारी शेती. सध्याच्या दुष्काळी रखरखाटात या नवीन उपक्रमाची ही विशेष नोंद.

# पळसवाडीची सहकारी शेती

संजय संगवई

दौलताबाद, वेरूळ ही नावं नित्य परिचयाची. वेरूळपासून अदाजे पाच मैलावर एक प्रयोग चालू आहे. यामध्ये कुठलेही ग्लॅमर, रोमॅंटिसिझम नाही. मराठवाड्यातल्या तळतळून भाजत असलेल्या फुफाट्यातनं, बाभळीच्या काट्यातनं आखतवाडी फाट्यापास्नं आत जातानाच दुष्काळ जाणवू लागतो. समोर म्हैसमाळ डोगराची राग पसरलेली. कुठ लमाण, कैकाडी, भिल्लाची बायापोरं वावरातनं, काट्याकुट्यातन फिरत होती. डाव्या बाजूला जरा निरखून पाहिलं तर एक पाझर तलाव. लोक सागतात की, बांधल्यानंतर लगेच पहिल्या पावसात हा बाध वाहून गेला. त्याच्या शेजारच्या पळसवाडी–गावच्या गायरानात आपण उभे असतो.

साधारणतः १९७८–७९ सालापासून इथले भिल्ल, लमाण, चाभार, महार आदी मागासलेल्या जमातीची मंडळी मजुरीबरोबर काहीतरी पोटाला आधार असावा म्हणून काटेरी झुडुपाची रानं उखरत होती. मूठपसा बियाणं पेरायचा प्रयत्न करीत होती. गावात अंदाजे ४०० उबरा. बहुतेकजण 'जाति'-वन्त शेतकरी, जमीनदार. खर तर या गायरानात कोणीही गुरं चारीत नव्हत. गुरचराई झाल्यानतरचं पसरलेलं हे काटेरी रान! परंतु 'सास्कृतिक' गुर्मी फार मोठी असते–ही जमीनदार मंडळी म्हणू लागली–

'ही कोण घेडं लागून गेली जमीन कसायला?' झालं, 'फारिष्ट' खात्याचं नुकसान केल्याच्या वहिमावरून चार–पाच जणानी जेलमध्ये दोन-चार आठवडे काढले. भकास उन्हात रापून गेलेल्या दल्लू लमाणाचा चेहरा बोलत होता–

'सायेब, किती दिसापास्न रान उखरत होतो! जेलामदी जाऊन आलो. आता मात्तर मागं न्हाय फिरायच. होऊंद्या काय व्हायाच ते.'

१९७९ नंतर ८२ साल उजाडलं. ही लमाण, भिल्ल मडळी सारखी प्रयत्न करीतच होती एका सेवाभावी सस्थेची काही कार्यकर्ती-मडळी शेजारच्या गावात आली मग ही तीस–पस्तीस माणसं चालत तिकडे गेली. त्याना सगळी कथा सागितली. म्हणाली–'तुम्ही फक्त पाठीशी असा. थोडा हात द्या.' कार्यकर्ते तयार झाले.

## १५ दिवसात पेरणी....

१९८२ सालचा तो पावसाळा प्रचंड घाईगर्दीचा गेला. त्याआधीच्या दोन महिन्यात या २५-३० माणसानी, त्यांच्या बायापोरानी जवळजवळ शंभर एकराच रान तोडलं. शंकर सागत होता–

'पुरुष–दोन–पुरुष भारे तयार झाले. दोन–तीन दिवस मजुरीलाही जात नव्हते. रिकाम्या पोटी आम्ही १५ दिवसात गायरान थोडं-फार साफ केलं.'

भारत सेवक समाज (सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी)च्या एका अत्यंत धडपड्या कार्यकर्त्याने इतर कार्यकर्त्यांच्या मदतीने या लोकाना ज्वारीचं बी आणून दिलं. दोन बैलजोड्या उपलब्ध करून दिल्या. औरंगाबादच्या 'ऑक्सफार्म' या संस्थेकडून परतफेडीच्या बोलीवर हे साहित्य आणले गेले पेरणी झाली. पाऊस बेताचाच आला. ज्वारीबरोबर थोडी करडी पेरली गेली.

पेरणी तर झाली. आता कामाची वाटणी कशी? सहकारी तत्त्वावर काम करण्याचा निश्चय करणं सोपं; परंतु कामाच्या वाटपाबद्दल प्रश्न आल्यावर मात्र फाटाफूट सुरू होते. या कामकऱ्यांनी असं ठरवलं की, नांगरट, पेरणी, बियाणं याबावत समान मालकी; परंतु काम सोपं व्हावं म्हणून प्रत्येकानं दीड–दोन एकराचा, पाच एकरापर्यंतचा निगराणीसाठीचा हिस्सा वाटून घ्यावा.

पाऊसकाळ संपला. पोटरीएवढं पीक उभं राहिलं. गावकऱ्यांना परत जाग आली. तलाठ्याने अतिक्रमणाची नोंद केली. जप्तीची धमकी दिली. गावातील काही लोकानी पिकात जनावरं घालण्याची भीती दाखवली. तसं केलंही.

या शेतांतूनच गावाला जाण्याचा गाडीरस्ता काढण्याचा हट्ट धरला. अनेकानी काही कारण नसताना सदर जमीन फॉरेस्टखात्याची आहे, म्हणून ती ताब्यात घेण्यात यावी असे अर्ज तहसीलदार वगैरे अधिकारी

मंडळीकडे पाठविले. बऱ्याच जणांनी सदर जमीन 'पडीक' असून वनखात्याने ताब्यात घ्यावी व 'वनविकास' करावा असा सल्ला दिला.

'आम्ही पोटाला लागलो, आम्हाला काम मिळालं हे याना पाहवत नाही. आम्हाला जगून द्यायाच नाही यांना–'

असं भिवसन म्हणत होता. गावातील शेतकऱ्यांना आता हव्या त्या दरात मजूर मिळत नाही म्हणून तर या धमकावण्या होत्याच. त्याहीपेक्षा 'सांस्कृतिक अभिमान' असतोच ना!

ही कसणारी मंडळी म्हणाली–

'साहेब, आम्हाला भाडण विकत घ्यायचं नाही. आमची घरं गावातच आहेत. फार थोडी जणं उघड्यावर राहतात. आम्हाला गावात राहायचंय. समजुतीनं राहायची इच्छा आहे. त्यांना काय जे करायचं ते सरकारदरबारी करा. आम्हाला प्रत्यक्ष त्रास देऊ नका.' त्या वेळी दशरथ भिल्ल अंगावर कुऱ्हाड पेलून 'तारेत' ओरडला होता–

'अरं कोन येतंय पुडं...घालतो ×× चा मुडदा!' त्याला इतरांनी सावरलं. म्हणाले, 'जरा तिकडंमच काम हाये.'

हे सर्व या लोकांनी भारत सेवक समाजाच्या कार्यकर्त्यांच्या बळावर चालवलं होतं. ही कष्टकरी माणसं शेतावर असताना शिकलेले, पुण्यात काही काळ राहिलेले हे युवक तहसीलदार, कलेक्टर, तलाठी वगैरे माणसांना भेटत राहिले. पोलीसठाण्यातून चकरा मारत होते. गायरान-जमिनीवर पीक काढलं तर 'अतिक्रमण' होते! मग कसं करायचं? कार्यकर्ते म्हणाले, 'आधी पीक तर घ्या. पुढचं पुढं. गावाला एवढ्या गायरानाची गरजच कुठे होती!'

## २३ जणांना १०० एकर

ही अंदाजे १०० एकरावरची जमीन रस्त्याच्या उजव्या बाजूला नऊ भिल्लांच्या एका गटाची ३५ एकर. डाव्या बाजूला पाझर तलावापर्यंत लमाणांच्या ७ कुटुंबाची ३५ एकर, तर त्याच्यापुढे चांभार, दलित, मुस्लिम अशा ७ जणांची अंदाजे तीस एकर जमीन आहे.

मागे भूदान-आंदोलनात पळसवाडीच्या ९ दलिताना (महार) ५२ एकर जमीन दान करण्यात आली. तो दानपट्टा अजून त्यांच्यापाशी आहे; परंतु ही मंडळी आपसातच फुटली होती. कुरघोडी करीत होती. १९८३ वर्षापर्यंत इकडली सहकारी शेती यशस्वी झाली हे पाहून त्यांनी आम्हालासुद्धा अशीच मदत द्या म्हणून भारतसेवकसमाज कार्यकर्त्यांकडे विनती केली; परंतु हे शंभर एकरवाले म्हणतात–त्याना जमीन कसायची नाही. फक्त बैल विकून खायच आहे!

हंगाम सरल्यावर परत एकदा पळसवाडीला जाणं झाल. ही शेती यशस्वी झाली. सुमारे १२५–१५० पोती ज्वारी आली. ज्यानं जितक्या जमिनीची मशागत केली, तितकी बटाई मिळाली. आज सर्वजण खुषीत आहेत. या वर्षी अधिक नेटानं रान पिकवू असं म्हणताहेत. या त्यांच्या योजनेत 'पानवाली' नावाची बिनधास्त मुस्लिम महिला सामील झाली. ती म्हणते–

'मेरा बेटा छोटा है, मुझे और कोई नही।' स्वतः खुरप्यानं तिनं अर्धा एकर रान खुरपलं आणि हाताने दाणे टाकले. कारण 'फारिष्ट'च्या चौकीदारानं नांगर–पाभर जप्त करून नेले! अशी ही बया. तिच्याबरोबर एक कैकाडी, एक लमाण वगैरे चार विधवा महिला आहेत. त्यानीही हाच कित्ता गिरवायचा ठरवलंय. या शेतकऱ्याना आता ८ बैलजोड्या हव्यात, नागर–पाभर असा सरंजाम हवा आहे. कार्यकर्ते प्रयत्न करीत आहेत.

–पण

## पेच...

इथूनच खरा प्रश्न सुरू.

दहा-बारा जणांच्या मेळाव्यात केरबा भडाभडा बोलत होता.

'परतेकाला अमुक इतकी जमीन दिली का तो त्याचं त्याचं काम करतो. उमाळ्यानं माझी जिमीन म्हून राबतो. आसं सर्वाबरोबर काम नीट होत नाहीत, टाळाटाळ होती, परभाऱ्या कारभार हुतो. स्वतःची जिमीन असली तर सर्व ठेपशीर!'

मी अडवलं! 'पण राव, दोन-अडीच एकरांवर वेगळं वेगळं पाभर-नांगर, बैलजोडी, बियाणं वगैरे परवडंल का?'

केरबा व इतर दोघेतिघे थांबतात विचार करतात म्हणतात–

'न परवडाया काय झालं. आम्ही हप्ते बी फेडू. सगळं परवडतय.'

शेजारी पाझर तलाव होता. ही जमीन इतकी सुपीक! पुढेमागे उसाची बागायती करता येईल. आपल्या पोराबाळांना जमीन देता येईल. असा विचार या घोरणी डोळ्यांमध्ये घोळत होता.

लगेच एक जण उसळला–

'आरं पन तुमी आसं वायलं-वायलं झाल्यावर गाववाले तुमाला राहू देतील व्हय! अरं आपल्यात एकी हाय, म्हून गाववाल हितं वाकडं बगत न्हाईत!'

–खरं तर 'गिरामीण' सिनेमा-कादंबरीतच वाचायला मिळणारा हा आवेश, मचूळ झालेला; पण शंकरनं असा उपरोधात्मक निर्विकारपणे अस वाक्य टाकलं की, ही 'बंडखोर' माणससुद्धा क्षणकाळ टरकली–

खरंच की!

–परंतु त्यांची कुरबुर चालूच होती.

–शेवटी एक म्हातारा म्हणाला,

'सायेब मनावर धिवू नोका. ही यडी मान्सं लहान पोरावानी आज रातीला भाडत्यात, उद्याच्याला गळ्यात गळा घालून एक हुतात, तुमी काय काळजी करू नका असो. त्ये गावातल याइले एक ठेवतील त काय?'

बरोबचे कार्यकर्ते म्हणाले अहो आम्ही याना ओळखतो. हे भाडतात; पण नंतर एक होतात. अनेक बैठकी घेऊन त्याच्यातीलच समजुतदार मडळीना आम्ही सहकारी शेतीचा आर्थिक व संघटनात्मक फायदा पूर्णपुणे पटवून दिला. शंकर चव्हाण, शामलाल वगैरे लोक त्यांना चुचकारतील. दोन–तीन भडक डोकी आहेतच. इत्यादी. परंतु शेवटी अपरिहार्यपणे वेगळा मार्ग स्वीकारण्याचं आतापासूनच घाटत आहे तर!

## दोलायमान

कार्यकर्त्यांची पंचाइत अशी की कायद्यानं प्रत्येकाला वेगवेगळी जमीन वाटून दिली तर पाणी बारा वाटा धावेल. त्याचच नुकसान होईल. कायद्यानं शेतकरी संस्था रजिस्टर केली तर सर्व कायद्याच्या भानगडी सुरू होतील. भाडणं कोर्टकचेऱ्या, निवडणुका इत्यादी प्रकार. सर्वांनी एका अनौपचारिक परस्पर समझौत्यानं सहकारी शेती करावी.

तरच काही खरं आहे. सगळं प्रकरण कायद्याच्या कक्षेत गेल्यावर बाहेरचे कटकटी उपस्थित करतील, आतले फुटतील. उगीच गोंधळ वाढेल.

—तरी पण आता या सर्व प्रकाराला कायदेशीर स्वरूप द्यावेच लागेल. म्हणून या शेतकऱ्यांच्याच मुलांकडून काही समजुतदार हुशार पोरांना प्रमोटर्स करून शेतकरी संस्था चालवायची असा कार्यकर्त्यांचा विचार आहे.

## शरद जोशी, इकडे पहा

शेतकऱ्यांच्या जीवनमानात सुधारणा व्हावी म्हणून शरद जोशी एक आंदोलन लढवीत आहेत. उत्पादनखर्चानुसार किंमत हे त्यांचे तत्त्व बरोबरच आहे. परंतु वारसाहक्कामुळे शेतीचे विभक्तीकरण व तुकडीकरण (सब डिव्हिजन—फॅगमेंटेशन) झाले. जितकी लहान जमीन तितके उत्पादनखर्चाचे प्रमाण जास्त होईल— आणि ही परिस्थिती अटळ आहे. यासाठी शेतीमधला उत्पादनखर्च आवाक्याबाहेर जाऊ नये, शेती परवडावी म्हणून लहान शेतकऱ्यांनी सामूहिक शेती—सहकारी शेती यापैकी एकाचा मार्ग




स्वीकारणे हितावह होईल. शेतकरी संघटनेला लहान शेतकऱ्यांची' अत्यल्प-भूधारकांची खरोखरच काळजी असेल तर सामूहिक सहकारी शेती हा त्यांचा एक कार्यक्रम का असू नये. यामुळे मोठ्या प्रमाणावरील शेतीचे सर्व फायदे मिळतील, आणि जमीनदारीही दूर राहील.

हे सर्व ठीक—परंतु पळसवाडीतल्या तेवीस कष्टकऱ्यात आतापासूनच वेगळ्या मार्गाचे वेध लागताहेत त्याचे काय? खरं तर यामध्ये वागणे असे काय आहे? आजपर्यंत अर्धपोटी राहिलेल्यांनी स्वतंत्र जमिनीची मागणी का करू नये असे विचारले तर त्याचे नैतिक उत्तर काय? परंतु त्या अर्धपोटींसाठीच सामूहिक शेती एकमेव उपाय आहे. ते वेगळे झाले की गेलेच!

## सहकारितेची अनेक क्षेत्रे

सरतेशेवटी ही शेती फुलविणाऱ्या भारत समाज सेवकांची दखल घेतलीच पाहिजे. ना. गोखल्यांच्या या संस्थेचे मराठवाड्यातील कार्य खरोखरच कौतुकास्पद आहे. कुठेही घोषणाबाजी नाही, 'खालच्या' समाजावर उपकार करीत असल्याची भावना नाही, पत्रकबाजी तर नाहीच. समाजाचे एक कार्यकर्ते मनोहर धनुरे स्वत: दौलताबादला राहून ही शेती व त्या कष्टकऱ्यांना मार्गदर्शन करतात. घरचा बऱ्यापैकी असलेला हा माणूस केवळ संस्थेसाठी सर्व घालवून बसलाय संस्थेच्या उद्दिष्टाप्रमाणेच कुठेही केवळ चूषहौस म्हणून संघर्षाला आवतण द्यायचे नाही मुख्य उद्देश आहे ते आपले काम व्हावे. मुख्य उद्देश निरर्थक स्टंटबाजी नाही. आपल्या कामासाठी आवश्यक वाटले तर मोर्चे, निदर्शने, पत्रके यांचा अवलंब जरूर करावा. परंतु केवळ साधन म्हणून स्वत:चे पोकळ पुरोगामित्व प्रदर्शित व्हावे म्हणून कार्याची शिडी करायची हा प्रकार अजूनपर्यंत तरी इथे नाही हे खरोखरच स्पृहणीय आहे.

भारतसेवक समाजातर्फे मनोहर धनुरे यांनी अनेक कार्यकर्त्यांच्या मदतीने दौलताबादला ५ सहकारी वीटभट्ट्या सुरू केल्या त्यात एक महिला सहकारी भट्टी आहे नंद्राबादला एक सहकारी वीटभट्टी आहे. सुलीभंजनला बांबू व्यवसायातील ५ मातंगांची सहकारी संस्था आहे. खुल्दाबादला दोरव्यवसाय, पळसवाडीला चर्मोद्योग व्यवसायाच्या सहकारी संस्था आहेत. टाकळीला १३ भिल्लांची मत्स्यव्यवसाय संघटना तर १० जणांची सामूहिक शेळीपालन संघटना स्थापली आहे.

ही सर्व कामे अत्यंत योग्य पद्धतीने चालली आहेत. असे सकृद्दर्शनी तरी दिसते.'

या कार्यामुळे पुरोगामीपणाची मक्तेदारी घेऊन बसलेल्या काही वाचीवीर संघटनांना शह वाटतोय. धनुरेंना याबाबत स्पष्ट विचारलं की, तुमची काही वेगळी विचारसरणी आहे म्हणून तुम्हाला या पुरोगाम्यांचा विरोध होतो का?

धनुरे तळतळून म्हणतात— 'नाही हो. ते विचारसरणी, प्रचार, पक्ष असं यात मी काहीच करत नाही! तुम्ही प्रत्यक्ष बघा. मी फक्त काम करतो. बाकी एकही प्रचारकी शब्द किंवा कृती करीत नाही. हा विरोध जो होतो, तो केवळ आपल्या स्थानाला धक्का बसल्याने होत आहे. विचारसरणीचा वगैरे यात काहीच संबंध नाही.'

हे प्रकरण मात्र फारच रंगतदार आहे. विशेषत: औरंगाबादेतील पुरोगामी प्रकरण महाराष्ट्रात अनोखे ठरावे असे आहे. व्यक्तिगत राग-लोभ-अहंकारातून व असहिष्णुपणातून इथले पुरोगामित्व ठरत असते. त्याचे किस्से, त्यातील अनेक 'वैचारिक' धागेदोरे 'धडपडी' यांचा स्वतंत्र अभ्यास करणेच उचित होईल.

□

तर सहकारी शेती इथपर्यंत आली.

एक वर्ष यशस्वी झालं. पुढच्या काळासाठी उत्साह आहे. अंतर्गत घडामोडींवरून तर चीनमधील खाजगीकरणाची बीजे दिसतात. पुरोगाम्यांच्या विरोधाला पाहता आपल्या व्यक्तिगत विरोधाला विचारसरणीचे लेबल लावणाऱ्या भोंदू कम्युनिस्ट राष्ट्रांचीच आठवण होते.

तरी शंकर चव्हाण हसत म्हणतो— अहो, चालायचंच. डोसक्याला डोसकी लागायचीच! आमाला नवं हत्यार गवसलंय. त्ये काय फुकाफुकी सोडू!

□

५ जून : पर्यावरण दिनानिमित्त

# स्टॉकहोम पर्यावरण परिषदेनंतरची अकरा वर्षे

प्रा. सुरेश गजेंद्रगडकर

'अकरा वर्षांपूर्वी १९७२ च्या जूनमध्ये जागतिक राष्ट्रसंघटनेने स्टॉकहोममध्ये एक आतरराष्ट्रीय सभा आयोजित केली होती. विषय होता पर्यावरण (ह्यूमन एन् व्हायरन्मेंट) किंवा परिसर. खरे तर ही सभा घेण्याची सूचना केली होती स्वीडनने १९६८ मध्ये स्वीडनला तीन प्रदूषणाचे प्रश्न भेडसावत होते

यूरपमधील हवेच्या प्रदूषणाचे स्वीडनमध्ये होणारे हे परिणाम. पहिला आम्लपावसाचा, दुसरा बाल्टिक समुद्राच्या प्रदूषणाचा आणि तिसरा त्यांच्या परिसरातील पाण्यातील मासे व हवेतील पक्षी ह्याच्यामध्ये कीटकनाशके व जतुनाशके आणि धातू (पाऱ्यासारखे) ह्याचे भीतिदायक वाढते प्रमाण.

ह्या तिन्ही प्रश्नाची उकल आतरराष्ट्रीय परिषदेविना होणे शक्य नव्हते. कारण ह्या प्रदूषणास अनेक राष्ट्रे कारण होती व त्यांनी एकत्र येऊन काही निर्णय घेतल्याखेरीज स्वीडनचे भय दूर होणार नव्हते. इतर देशांच्या मनात असेच आणखी काही आंतरराष्ट्रीय प्रश्न होते. उदाहरणार्थ कॅनडा व अमेरिका ह्याच्यामध्येही आम्लपावसाविषयी कोणामुळे कुणाचे किती नुकसान होते ह्याविषयी वाद होताच.

ह्याच काळात सर्वच पाश्चिमात्य राष्ट्रात प्रदूषणाच्या घोर परिणामाची जाण झाली होती. अमेरिकेसारख्या देशात विद्यार्थीवर्गातही प्रदूषणाविरुद्ध प्रचड लाट उसळली होती बिनसरकारी कार्ययंत्रणा एकत्र येऊन कायद्याच्या आधारे ह्या प्रदूषणविरोधी कार्यास मदत करत होती. वर्तमानपत्रे, रेडिओ, दूरदर्शन ह्याद्वारेही मोटारी, कारखाने व त्यामुळे होणारे हवा, पाणी, जमीन, स्वास्थ्य ह्या सर्वांवरील दूरगामी अनिष्ट परिणामाची जाणीव पुढारलेल्या देशात होत होतीच.

ह्याच काळात पॉलएह्र्लिकसारख्या लेखकानी मागासलेल्या देशाचे प्रश्नही–विशेषत: लोकसख्येचा–जगासमोर माडले.

स्टॉकहोमच्या आतरराष्ट्रीय सभेसाठी वातावरण तयार झालेलेच होते.

१९७२ च्या जूनमध्ये स्टॉकहोम येथे ही परिषद भरवली. 'पर्यावरण' ह्या एका विषयावर भरलेली आंतरराष्ट्रीय पातळीवरची ही पहिली परिषद. खरे म्हटल्यास अशा परिषदेत इतर राजकारण येऊ नये; परंतु रशियाने पूर्वजर्मनीच्या प्रश्नाचे भाडवल केले व रशिया व रुमानिया वगळता पूर्वयूरोपमधील राष्ट्रे ह्यानी भाग घेतलाच नाही तरीही ११३ राष्ट्रानी भाग घेतला होता.

### मागासलेल्या राष्ट्रांचे प्रश्न

ह्या परिषदेच्या वेळी मागासलेल्या राष्ट्रांमध्ये एक प्रकारचा अविश्वास निर्माण झाला होता. कारण पुढारलेल्या राष्ट्रांइतका हा प्रश्न आपल्याकडे तीव्र नाही असा त्यांचा समज होता व मागासलेल्या राष्ट्रांचे मागासलेपण हे गरिबीमुळे असण्याने गरिबी नाहीशी करण्यासाठी उद्योगधंदे, नैसर्गिक सपत्तीचा वापर ह्या गोष्टी अत्यावश्यक ठरतात. तेव्हा मागासल्याचे मागासलेपण कायम ठेवण्यासाठी हा पुढारलेल्या राष्ट्राचा जणु कट आहे, अशी भूमिका मागासलेल्या राष्ट्राची होती. ह्या आतरराष्ट्रीय परिषदेमुळे जे नियम येतील ते मागासलेल्या राष्ट्राना अधिक जाचक ठरून त्यामुळे त्याच्या उत्पादनावर परिणाम होईल, आयात–निर्यातीवर परिणाम होईल. आतरराष्ट्रीय बाजारातील प्रवेशावर व आतरराष्ट्रीय कर्जांवर बधनकारक ठरतील इत्यादी अनेक शका राष्ट्रप्रमुखाच्या मनात (त्या त्या देशातील समाजानुरूप) उभ्या झाल्या व त्या अत्यत स्पष्ट भाषेत माडल्याही गेल्या. ह्याचा परिपाक म्हणून ह्या परिषदेचे मुख्य सचिव (सेक्रेटरी जनरल) नेमले गेलेले मॉरिस स्ट्रॉग ह्यानी पर्यावरणाचा प्रश्न मागासलेल्या देशांच्या दृष्टिकोनातून समजवून घेणे व आपला दृष्टिकोन त्याना समजावून त्याची भीती दूर करणे ह्यासाठी १९७१ मध्ये (४-१२ जून) स्वित्झर्लंडमध्ये सत्तावीस आतरराष्ट्रीय तज्ज्ञाची बैठक बोलावली. त्यातून निष्पन्न काय झाले ह्याविषयी दुमत असले तरी पर्यावरणविषयक कायदे ह्यांचा देशाच्या वाढीविरुद्ध बडग्यासारखा वापर होणार नाही ह्याची काळजी घेतली जावी असे आवाहन केले गेले आणि मुख्य म्हणजे मागासलेल्या देशाना विश्वासात घेण्याचा हेतू साध्य झाला असे म्हणण्यास हरकत नाही !

### स्टॉकहोमची परिषद

ह्या स्टॉकहोमच्या परिषदेतही मागासलेल्या राष्ट्राच्या प्रतिनिधीनी विकासास खीळ न पडता पर्यावरणाविषयी विचार व्हावा, गरिबी हेच मोठे प्रदूषण इत्यादी विचार माडले. पुढारलेल्या राष्ट्रानी चैनीसाठी वापरलेली नैसर्गिक सपत्ती व मागासलेल्या राष्ट्राने गरज भागवण्यासाठी वापरलेला साठा ह्याची तुलना करणे चुकीचे आहे. श्रीमंत राष्ट्रानी गरीब राष्ट्राना विकासासाठी मदत केली पाहिजे, अशा पद्धतीची भाषणे झाल्यावर 'विकासासह प्रदूषण-नियत्रण' ही कल्पना मूर्त स्वरूपात आणण्यासाठी विविध ठराव समत करण्यात आले. जी तत्त्वे पाळण्यात येतील असे ठरवले ती तर कुणालाही मान्य व्हावीत अशी निरुपद्रवी आहेत.

उदा. 'सध्याच्या व भावी पिढीच्या सुखासाठी पृथ्वीवरील नैसर्गिक सपत्तीचा जपून वापर केला पाहिजे !' त्यामुळे आजही ही मान्य होतील.

स्टॉकहोमच्या परिषदेनंतर गेल्या दहा वर्षांत अनेक घटना घडल्या. कुठल्याही निकषावर हे मान्य व्हावे की, स्टॉकहोमच्या परिषदेने आतरराष्ट्रीय परिषदांचा फायदा लोकांना समजावून दिला व सामंजस्याने ठरवायच्या मुद्द्यावर अभ्यास करण्यासाठी अशा परिषदांचा

फायदा होतो हे कळल्यामुळे खालील आनुषंगिक विषयांवर आंतरराष्ट्रीय परिषदा झाल्या. लोकसंख्या (बुखारेस्ट, १९७४) अन्न (१९७४ रोम) मानवी वसतिस्थाने (व्हॅंकूव्हर १९७६) पाणी (मार डेल प्लाटा १९७७) वाळवंटे (नैरोबी १९७७) शास्त्र व विज्ञान (व्हिएन्ना १९७९) पुनर्नूतनीकरणीय ऊर्जा (नैरोबी १९८१) अशा सात महत्त्वाच्या विषयावरील परिषदांना स्टॉकहोम परिषदेने जन्म दिला. १९७२ मध्ये, खास पर्यावरणाचा कार्यक्रम राबवण्यासाठी एक युनायटेड नेशन्स एन्व्हायर्नमेंट प्रोग्रॅम नावाची संस्था नैरोबी येथे स्थापिली. सध्या डॉ. मुस्ताफा कमाल होल्बा हे त्याचे प्रमुख आहेत. १९८२ मध्ये यु. एन्. ई. पी. चो खास सभा झाली. नैरोबीत आणि लंडनमध्ये पर्यावरणावर आंतरराष्ट्रीय सार्वजनिक सुनावणी (public Hearing) झाली.

ह्या दहा वर्षांत सर्व जगभर पर्यावरणाच्या शुद्धतेचे महत्त्व पटले आहे. अनेक विकसनशील राष्ट्रांत प्रदूषणाविषयी कायदे आले. भारतासारख्या देशात पर्यावरणाचे खाते निर्माण झाले. ही सर्व चिन्हे जागरूकतेची आहेतच. आज केनियासारख्या देशाचा राष्ट्रपती 'गरीबीमुळे नैसर्गिक संपत्तीचा उगीच वायफळ नाश होतो. तेव्हा नैसर्गिक संपत्तीचा योग्य वापर होण्यासाठी गरीबी नष्ट करायची ती पर्यावरणाचा समतोल न बिघडवता' असे म्हणतो. 'हे स्टॉकहोमने शिकवले व स्टॉकहोमची शक्ती आपण विसरता कामा नये.' तेही कृतज्ञतेने म्हणत राहतो.

ज्या स्वीडनच्या आम्लपावसाच्या बाल्टिक समुद्राच्या व कीटकनाशकारी दूषितकांच्या प्रश्नामुळे ही परिषद भरली होती, त्या प्रश्नावर स्वीडन, नॉर्वे व यूरपमधील राष्ट्रे ह्यांच्या एकत्र चर्चा सुरू झाल्या. तसेच अमेरिका व कॅनडा ह्यांच्यामध्येही अनेक समित्यांच्या सहाय्याने काही निष्कर्षास ती दोन राष्ट्रे आली आहेत. सागरी प्रदूषणाविषयीही कायदे व त्यांची अंमलबजावणीविषयी दहा वर्षांत (विशेषतः तेलामुळे होणाऱ्या) प्रगती झाली आहे.

## थोडेसे दोषदिग्दर्शन

स्टॉकहोम परिषदेत घडले ते सारेच आदर्श घडले व गेल्या दहा वर्षांत योग्य मार्गानेच सर्व वाटचाल झाली आहे असे म्हणणे चुकीचे ठरेल. प्रथम स्टॉकहोम परिषदेतच काही गोष्टी चुकीच्या पद्धतीने चर्चिल्या गेल्या. पहिली माझ्या मते मोठी चूक म्हणजे प्रदूषणाच्या प्रश्नाचा किंवा पर्यावरणाचा साकल्याने विचार केला नाही. पाणी हवा, जमीन, ऊर्जा, मासेमारी, जंगले इत्यादींचा वेगवेगळा विचार केला गेला. त्यामुळे पर्यावरणाच्या शुद्धतेसाठी आवश्यक असलेली सर्वसमावेशक दृष्टी ही परिषद देऊ शकली नाही. एका प्रकारच्या दूषितकांना आवरत असता वेगळ्या प्रकारचे प्रदूषण निर्माण होत असते. (उदा. पाण्यातील पदार्थ काढताना, त्याचा गाळ टनावारी निर्माण होतो) त्याचाही विचार करणे अत्यावश्यक आहे. ही जागरूकता, ह्या जाणिवेचे भान ह्या परिषदेने दिले नाही.

ह्यामुळेच प्रदूषण नाहीसे करणे ह्याऐवजी पर्यावरण सुखावह करणे ही भावना निर्माण करण्याची गरज होती, ती भावना निर्माण झाली नाही.

दुसरे म्हणजे ज्या विकसनशील, मागासलेल्या देशांच्या प्रश्नाविषयी बोलले गेले, त्यांचे खरे सुरुवातीचे प्रश्न सोडवण्याबाबत एक


## माणुसकीचा झरा—

हरिजनोद्धाराच्या कामी बँका खूप चांगली कामगिरी बजावू शकतील हे स्वातंत्र्यवीर सावरकरांसारख्या दूरदृष्टीच्या नेत्याने १९२८ सालीच जाणले होते. त्यांनी आपल्या रत्नागिरी-पर्वात काही हरिजन तरुणांना बँकेकडून कर्ज मिळवून देऊन मंगलकार्यासाठी लागणाऱ्या बॅण्डचा नवीन व्यवसाय सुरू करून दिला होता.

मिंटीने स्थापनेपासूनच हरिजन तरुणांना निरनिराळ्या स्वयंरोजगारासाठी प्रवृत्त केले आहे त्याचीच ही झलक—

| | | | |
|---|---|---|---|
| शेती व्यवसायासाठी | —आठरा हजार | हरिजनांना | अर्थसहाय्य |
| वहातुक व्यवसायासाठी | —एक हजार | –,,– | –,,– |
| छोटया कारखान्यासाठी | —पंध्रराशे | –,,– | –,,– |
| किरकोळ दुकानदारीकरिता | —चार हजार | –,,– | –,,– |
| छोटी हॉटेल्स, सायकल दुकाने, पिठाचीगिरणी, बँड इ.सारख्या छोटया व्यवसायासाठी | सात हजार | –,,– | –,,– |
| डॉक्टर, वकील, आर्किटेक्ट यासारखे स्वतंत्र व्यवसायिक | पाच हजार | –,,– | –,,– |



मिंटी म्हणजेच महाबँक
महाबँक म्हणजेच माणुसकीचा झरा—

**बँक ऑफ महाराष्ट्र**

[ भारत सरकारचा उपक्रम ]

वाक्यही त्या ठरावात नाही. मागासलेल्या (व पुढारलेल्या देशांतील काही भागात ) देशांत मोठा प्रश्न हा पिण्याच्या स्वच्छ पाण्याचा व स्वच्छतेचा आहे. तेव्हा त्याविषयी काही विचार झाला नाही.

( आता १९७७ साली पाण्याविषयक भरलेल्या परिषदेनुसार विचार सुरू झाला व १९८१ ते १९९० हे ' पाणीपुरवठा व स्वच्छता ह्या विषयास वाहलेले दशक ठरले आहे. ह्या काळात जगातील सर्व लोकसंख्येस किमान लागणारे स्वच्छ पाणी मिळेल अशी कार्यवाही अपेक्षित आहे. )

आणि ह्याच प्रकारच्या ' श्रीमंत ' राष्ट्रांच्या अरेरावीमुळे (उदा. ब्राझील) जंगलतोडीसारख्या विषयावर काही निश्चित ठोस निर्णय घेता आले नाहीत. इथे सर्व राष्ट्रांना अद्यापि आपण सर्वार्थाने एकमेकांवर अवलंबून आहोत याची जाणीव झाली नसल्याचे लक्षात येते. ' एक जगही भावना, एक सत्य म्हणून नव्हे तर आत्यंतिक गरज म्हणून राष्ट्रांनी आपलीशी केली पाहिजे हे राष्ट्रप्रमुखांना कळत नाही. ' आमच्या जंगलाचे आम्ही काही काय वाटेल ते करू ! ' हे म्हटल्यावर आमच्या खाणींचे आम्ही काय वाटेल ते करू. इ. उत्तरे प्रत्येक देशाने देणे स्वाभाविकच येते. म्हणजेच जो भावना निर्माण होण्यासाठी ही परिषद भरली होती तो हेतू काही राष्ट्रांनी दूर फेकला ह्याचीही नोंद होणे आवश्यक आहे.

तसेच पुढारलेल्या राष्ट्रांनी आपली तंत्रे, मागासलेल्या राष्ट्रांवर लादण्याचे अनेक दुष्परिणाम दिसत असताही ' उपयोजित तंत्राकडे, (Appropriate Technology) दहा वर्षांपूर्वी लक्ष गेलेले नव्हते.


आज इतर कारणांमुळे आयोजित तंत्राकडे विशेष लक्ष दिले जात आहे. तरीही आंतरराष्ट्रीय परिषदेने काही केले नाही. आजही अनेक मागासलेल्या राष्ट्राना उपयोजित तंत्राचा अवलंब करण्यासाठी मदत करण्याऐवजी अत्यंत पुढारलेले तंत्र वापरण्याची सवय करण्यामागे ही पुढारलेली राष्ट्रे अहमहमिकेने लागली आहेत. ह्यामुळे विकसनशील राष्ट्रांचा पैसा हा वाया जात आहे हे लक्षात घ्यावयास हवे.

कित्येक विकसनशील देशांची अन्नपरिस्थिती व दरडोई उत्पन्न दोन्ही गेल्या शतकात खालावल्याचे लक्षात येते.

यू. एन. ई. पी किंवा कुठल्याही यंत्रणेने गरीब मागासलेल्या देशांच्या पर्यावरणाची काळजी केली नाही. ज्या वेळी विकसिन राष्ट्रांना प्रदूषणसमस्येच्या भीषणतेमुळे काही रासायनिक कारखाने काढणे अयोग्य वाटले त्यावेळी त्यांनी निर्लज्जपणे ते कारखाने मागासलेल्या देशांत काढले. म्हणजे ' माणुसकीची भावना सोडून केवळ पैशाच्या दृष्टीने मेली तर भारतातील माणसे मेली तिथे कठोर कायदे व त्यांचे निष्ठुर पालन नाही तेव्हा भारतात असे कारखाने काढले तरी चालेल आणि भारतासारखे देशही ' डॉलर्स ' परकीय चलन ह्या माहाने पर्यावरणाचा विचार न करता अशा कारखान्यांना परवानगी देते ! ह्यामुळ ' गरीबी हे महान प्रदूषण आहे. ' अशा टोळघा घेणाऱ्या वाक्यामागे दडलेली ' गरीबांवरच प्रदूषण लादण्यात येते व ' गरीबच (अधिक गरीब होत) प्रदूपणाचे बळी ठरतात ' ही दोन सत्ये आपल्यास भोगावी लागतात.

एक गोष्ट खरी की, जागरूकता आली. तरी कुठलाही पर्यावरणात्मक निर्णय हा राजकारण्यांच्या हाती असतो विशेषतः मागासलेल्या देशात अत्यंत किळसवाणे (भारत, पाकिस्तान, बंगलादेश इ. इ. ) राजकारण चालू असते अशा देशातल्या राजकारणी लोकांना पर्यावरणाच्या अशुद्धतेची कारणे व त्याचे भीषण परिणाम, पर्यावरण व्यवस्थापनाची दिशा ह्यांचे सम्यक ज्ञान करून देण्याची योजना आखण्याची गरज आहे. ह्यासाठी यू. एन. ई. पी. सारख्या संस्थांच्या सहाय्याने त्या त्या राष्ट्रांतील विविध भागांतील, स्तरावरील राजकारणी व समाजकारणी लोकांच्या सभा शास्त्रज्ञ-तंत्रज्ञ-पर्यावरण तज्ज्ञ ह्यांच्या सहकार्याने घेतल्या पाहिजेत. त्या त्या देशांतील भाषांतून हे ज्ञान यू. एन. ई. पी. कडची माहिती सर्व पुढाऱ्यांकडे पोचते झाले पाहिजे. म्हणजे पुढच्या दशकाचे शेवटी १९९१ ला पाण्याच्या प्रश्नाबरोबरच प्रदूषणाच्या प्रश्नाचाही समाचार घेतल्याचे समाधान मिळेल. ह्यासाठी समाजाने आपली जबाबदारी उचलणे आवश्यक आहे. सामान्य माणसाची जागरूकता हा खरा केंद्रबिंदू आहे. सामान्य माणसाने प्रदूषणाविषयी अत्यंत सावध असणे आवश्यक आहे ज्या वेळी राजकारणी राष्ट्रांतील पुढारी हे केवळ स्वार्थ पाहून राष्ट्राच्या प्रदूषणविरोधी भूमिका न घेता कारखानदारांबरोबर संगनमत करून पर्यावरणाचे संतुलन बिघडवण्याचे कृत्य करण्यास तयार होतील त्या वेळी बिनसरकारी संघटनांना, समाजातील प्रत्येक थरातील माणसाला ह्यास विरोध करणे आवश्यक ठरेल. ' चिपको ' सारखी आंदोलने प्रत्येक राष्ट्रात, राष्ट्रातील प्रत्येक विभागात होणे आवश्यक ठरेल. स्टॉकहोमच्या परिषदेचे सूत्र होते– ' माणूस हा सर्वात महत्त्वाचा ' आणि ते जर जपायचे असेल तर पर्यावरण एक आहे ही संकल्पना रुजली पाहिजे भिडली पाहिजे नाही तर विकसनशील राष्ट्रे ही प्रदूषणाची केंद्रे बनवण्याची विकसित राष्ट्रांतील स्वार्थी गटाची खटपट सार्थकी लागेल आणि पुढल्या दहा वर्षांनंतरचा लेख हा प्रदूषणाने घडवलेल्या मृत्यूच्या नावाविषयी लिहावा लागेल.

□



aay's 83/131

सोन्या–चांदीचे व्यापारी

# मे. यशवंत विठ्ठल मराठे प्रा. लि.

ज्युवेलर्स

स्टेशन रोड, ठाणे

फोन नं. : ५९ ४७ ३५

# गडकरी एजन्सीज्

' आधार ', लक्ष्मी रोड, पुणे ३०.

फोन नं.: ४४४९३२ / ४४४७०९

: अधिकृत विक्रेते :

□ MEI स्टार्टर्स □ क्रॉम्पटन स्विचगिअर्स


□ KSB पंपस् □ किर्लोस्कर पंपस्

: असोसिएटस् :

विजया ट्रेडर्स
पुणे

अलाईड इलेक्ट्रिक
पुणे

# रंगीत भिंती घराला शोभा देतात...




क्राउन रंगीत टीव्ही
घर बोलकं
करतात !



PROGRAF

**CT-701F**

CROWN-TV

*With Best Compliments from*

**TOURIST HOTEL**

Station Road, Kolhapur–1

Phone–25364

25365

with Extn.

इसब, खरुज, नायटा गजकर्ण,

इ. त्वचारोगांवर गुणकारी



**क्षतदिव्य**

आयुर्वेदिक मलम

प्रमुख विक्रेते

आफ्रिका ड्रग हाऊस, पुणे-३०.

KALPAK-1

**With Best Compliments From**

**ठाकूर सावदेकर आणि कंपनी लिमिटेड**

३७७ गुरुवार पेठ, पुणे ४११ ००२

आपल्या नित्य परिचयाची पुण्याची सुप्रसिद्ध

**लंगर-विडी**

ओढण्यास मधुर व लज्जतदार असते !

**V - PLA**

**PRODUCTS**

All Kinds of Plastic Articles

'Parijat' 4/1 Karve Road, Erandavane,

PUNE–411 004

*Phone : 57577*

**deccan**

**LUXURY SERVICE**

Phone: OFF. 50305

RESI.

*Proprietors*

*Sudhakar Jadhav*

*C. N. Jagtap*



NEAR LUCKY RESTAURANT

F. C. ROAD, POONA-4

*NEW LUXURY CARS ON HIRE*

*DAY & NIGHT SERVICE*

आयुर्वेदाचा प्राचीन व आपल्या संग्रही असला पाहिजे असा महान ग्रंथ

**मराठी चरक संहिता**


संपादक : प्रा. डॉ. पां. ह. कुलकर्णी

१२ खंडाच्या एका संचाची किंमत रु. तीनशे पन्नास.

सवलतीत रु. दोनशे फक्त

सागर प्रकाशन

१२९३ सदाशिव, पुणे – ४११ ०३०




# “ चेकॉव्हच्या सहवासात मॅक्झीम गॉर्की ”

‘ अँटन चेकॉव्ह : सिलेक्टेड वर्क्स ’ या पुस्तकासाठी मॅक्झिम गॉर्की यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेचा
स्वैर अनुवाद : **रघुपती भट्ट**

कुशुक-कोई इथे त्याची थोडीशी जमीन आणि एक पांढरं दुमजली घर होतं. तिथे त्यानं मला एकदा आमंत्रित केलं होतं. आपली इस्टेट मला दाखवताना तो सारखा उत्साहानं बोलतच होता.

‘ माझ्याकडे भरपूर पैसा आला की, मी खेड्यामधल्या आजारी शिक्षकांसाठी एक विश्रामधाम बांधणार आहे. भरपूर प्रकाश येणारी इमारत. बरं का, भरपूर प्रकाश, मोठ्या खिडक्या, उंच छत. त्यात मी एक ग्रंथालय, सर्व प्रकारची वाद्यं, मधुमक्षिकाघर, एक फळबाग, फूलबाग ठेवणार आहे. तिथेच मी शेती, पर्यावरण या विषयांवर व्याख्यानं वगैरे ठेवीन. असं बरंच. शिक्षकांना सगळं माहिती पाहिजे बाबा ! ’

तो मध्येच थांबला. खोकला आणि माझ्याकडे एक तिरपा कटाक्ष टाकून त्यानं त्याचं लाघवी स्मित केलं. त्याचं म्हणणं लक्षपूर्वक ऐकायला लावण्याची जादू त्या स्मितात होती.

‘ माझ्या स्वप्नांना ऐकायचा तुला कंटाळा येतोय का ? मला याविषयी बोलायला आवडतं. रशियाच्या ग्रामीण भागासाठी चांगल्या हुशार, तज्ज्ञ शिक्षकांची किती भयानक गरज आहे हे तुला माहीत

हवं होतं. रशियामध्ये आपल्याला शिक्षकांसाठी अगदी अपवादात्मक वातावरण तातडीनं निर्माण केलं पाहिजे. कारण आपल्याला कळत की, लोकाना सर्वांगीण शिक्षण मिळाल नाही तर राष्ट्र एखाद्या कच्च्या विटाच्या इमारतीप्रमाणं कोसळेल. शिक्षक नट हवा, कलावंत हवा, आपल्या कामावर आत्यंतिक प्रेम करणारा हवा. आपले शिक्षक म्हणजे अगदी अकुशल, अर्धवट शिकलेले. ते खेड्यात शिकवायला जाताना हद्दपारीला निघाल्यासारखे जातात. ते उपाशीपोटी, तुडवले गेलेले असतात. आपला घास काढून घेतला जाईल याची त्यांना भीती वाटत असते आणि शिक्षक कसा पाहिजे तर खेडुताच्या सर्व प्रश्नाना उत्तर द्यायची त्याची तयारी हवी, तरच खेडूत त्याच्या ज्ञानाचा आदर करतील, त्याचं ऐकतील त्याच्यावर कोणी ओरडणार नाही, त्याचा अपमान करणार नाहीत. आपल्याकडे प्रत्येकजण, गावातला पोलीस, मोठे दुकानदार, पुजारी, शाळाचे आश्रयदाते आणि शाळा सुधारण्यापेक्षा सर्क्युलरं पाठवीत राहणारे शिक्षणाधिकारी, शिक्षकाचा अपमान करत असतात. लोकाना शिक्षण देण्याची जबाबदारी असणाऱ्याला किरकोळ दमड्या पगार म्हणून देणं हास्यास्पद आहे लक्षात घे, असा मनुष्य अंगावर फाटके कपडे घालून, कुबट पडक्या इमारतीत कुडकुडत राहणं, स्टोव्हच्या धुरानं गुदमरणं, सतत सर्दीपडशानं आजारी पडणं, तीस वर्षांच्या आत टी बी, संधिवातासारख्या रोगाची शिकार होणं हे अक्षरशः न सहन होणारं आहे. आपल्या सर्वांना ही लाजिरवाणी गोष्ट आहे. ९।१० महिने आपले शिक्षक संन्याशाचे जीवन कंठतात. त्याच्याबरोबर बोलायला कोणी नसत. एकटं जीवन कंठून विनापुस्तकाचे, विनाकरमणुकीचे ते मठ्ठ होतात त्यातून त्यानी मित्राना बोलवलच तर लोक म्हणतात ते 'माणूसघाणे' आहेत. खास मूर्खांना घाबरवणारा चतुर माणसाचा शब्द. हे सगळं उबग आणणारं आहे. मानवजातीसाठी थोर आणि अतिशय महत्त्वाचं काम करणाऱ्या माणसाची ही थट्टा आहे तुला सांगतो, जेव्हा मला एखादा शिक्षक भेटतो तेव्हा त्याच्या भित्रेपणानं, अजागळपणानं मला कससंच होतं. मला असं वाटत की, शिक्षकाच्या या केविलवाण्या स्थितीला मीच जबाबदार आहे अगदी मनापासून वाटतं!'

क्षणभर थांबून त्यानं मान हलवली आणि तो हलकेच म्हणाला, 'आपला रशिया किती विचित्र, घाणेरडा देश आहे!'

त्याच्या टपोऱ्या डोळ्यांत विलक्षण खिन्नता दाटली, डोळ्यांभोवती वर्तुळं जमा झाली. नजर त्यामुळं जास्त एकाग्र झाली. त्यानं आजूबाजूला पाहिलं आणि पुन्हा तो गमतीत आला.

'बघ, मी तुला मोठ्या वर्तमानपत्राच्या एखाद्या मोठ्या विषयाचा मजकूर सांगितला. चल, तुझ्या सहनशीलतेबद्दल तुला मी चहा पाजतो!'

ही त्याची पद्धत होती. एकीकडे तो अतिशय जिव्हाळ्यानं, तळमळीन बोले आणि लगेच स्वतःची आणि त्या बोलण्याची थट्टा करे. त्या विषादपूर्ण हास्याच्या गाभ्यात शब्दांची आणि स्वप्नाची किंमत ठाऊक असणाऱ्या माणसाची जिज्ञासू वृत्ती जाणवत असे. त्या हास्याला त्याच्या आकर्षक नम्रपणाची, अंतःस्फूर्त तरलपणाची किनारही असे.

आम्ही शांतपणे घराकडे चालत गेलो. तो अतिशय उबदार आणि प्रसन्न दिवस होता. सूर्यप्रकाशात चमकणाऱ्या लाटाचा आवाजही ऐकू येत होता दरीमध्ये एक कुत्रा कसल्या तरी आनंदाने भुंकत होता. चेकॉव्हनं माझा हात धरला आणि खोकत खोकत मला म्हणाला,

'ही अतिशय लाजिरवाणी आणि वाईट गोष्ट आहे; पण खरी आहे. कुत्र्याचा हेवा करणारे पुष्कळ लोक आहेत......'

आणि हसतहसत तो पुढे म्हणाला,

'मी आज सगळं वेडगळपणे बोलतो आहे. मी म्हातारा होत असलो पाहिजे.'

¤

अधूनमधून मला त्याचा निरोप मिळे.

'ऐक. एक शिक्षक आलाय ..तो आजारी आहे. त्याला बायकापोरं आहेत. तुला त्याच्यासाठी काही करणं शक्य नव्हतं, नाही का? मी त्याची तात्पुरती व्यवस्था केलीय.'

किंवा

'हे बघ गॉर्की, एका शिक्षकाला तुला भेटायचय. तो अंथरुणाला खिळून आहे. तू त्याला भेटायला जाणार नाहीस का?'

किंवा

एका शिक्षिकेला काही पुस्तकं हवी आहेत......'

काही वेळेला मला हा 'शिक्षक' त्याच्या घरी दिसायचा. स्वतःच्या अवघड परिस्थितीनं शरमलेला, खुर्चीवर अगदी टोकाला बसलेला, घामानं डवरलेल्या चेहऱ्यानं शब्द निवडून, सुसंस्कृतपणे, हळुवारपणे बोलण्याचा प्रयत्न करणारा किंवा एखाद्या बुजऱ्या परिचिताप्रमाणे, आपण मूर्ख वाटू नये याची धडपड करणारा, त्यासाठी अँटन पावलोव्हिचला नुकतेच सुचलेले प्रश्न विचारणारा.

अँटन पावलोव्हिच त्या अर्थशून्य बडबडी लक्ष देऊन ऐके. त्याच्या खिन्न डोळ्यात एक स्मित उमटे, चेहऱ्यावरच्या सुरकुत्यांमध्ये एक हालचाल उमटे आणि आपल्या प्रेमळ धीरगंभीर आवाजात तो बोले. शब्द इतके साधे आणि दैनंदिन जीवनातले असत की, ऐकणारा पाहुणा धीर चेपून त्याचे शहाणे दिसण्याचे प्रयत्न संपवी आणि त्यामुळं खरोखरी शहाणा बने

ह्या शिक्षकांपैकी एक मला आठवतो– उंच, सडपातळ, पाढुरका, निस्तेज चेहरा असलेला, लांब बाकदार नाकाचा असा तो अगदी विषण्णपणे मान खाली घालून अँटन पावलोव्हिचच्या समोरच्या खुर्चीवर एकटकपणे त्याच्याकडे पहात कण्हत होता.

'शिकवण्याच्या काळातील जीवनमानातून मिळालेल्या ठशातून एक मानसिक वर्तुळ तयार होते ज्यामुळे सभोवतालच्या जगाकडे पाहण्याच्या वस्तुनिष्ठ दृष्टिकोनाची शक्यताच नाहीशी होते. जग म्हणजे दुसरे काही नाही तर आपली त्याबद्दलची कल्पना...'

इथं त्यान एखादा दारुडा जसा बर्फावरून घसरतो तसं तात्त्विक विषयावर विवरण केलं.

'यला सांगा,' चेकॉव्हनं शांतपणे मायाळू स्वरात विचारलं, 'तुमच्या भागातल्या मुलाना कोण मारतं?'

'काय? मी? मुलाना मारतो? कधीच नाही!'

आणि त्यानं दुखावलेल्या माणसाप्रमाणं धापा टाकायला सुरुवात केली.

'नाराज होऊ नका !' अँटन पाव्हलोव्हिच त्याला समजावण्यासाठी स्मितहास्य करीत म्हणाला, 'असं मी म्हणालो का? पण तुमच्या भागातल्या मुलाना कोणी तरी मारत असं वर्तमानपत्रात वाचल्याचं मला आठवतंय.'

आपला घामान डवरलेला चेहरा पुसत तो शिक्षक खाली बसला. आपल्या चिरक्या आवाजात तो म्हणाला,

'होय तस घडल होतं. तो मकारोव्ह. त्यात आश्चर्य नाही. ते चमत्कारिक आहे; पण समजण्यासारख आहे. त्याचं लग्न झालंय, त्याला चार मुलं आहेत. त्याची बायको आजारी आहे. तो स्वत ही रोगग्रस्त आहे त्याचा पगार २० रुबल्स. शाळा म्हणजे एक खोली–बंदीखान्यासारखी. अशा परिस्थितीत कोणीही देवदूतांनासुद्धा किरकोळ चुकीबद्दल बेड्या घालतील आणि विद्यार्थी काही देवदूत नाहीत. विश्वास ठेवा!'

आणि हाच मनुष्य, जो काही क्षणापूर्वी चेकॉव्हला मोठे मोठे शब्द वापरून प्रभावित करू पाहत होता, आता अगदी साध्या रागड्या शब्दात बोलत होता. त्या शब्दातून रशियन खेड्यातल्या शापित आणि दारुण जीवनावर प्रकाश पडत होता.

निरोप घेताना त्या शिक्षकान चेकॉव्हचे वाळलेले, छोटे हात आपल्या हातात घेऊन दाबले.

'मी तुम्हाला भेटायला जाताना वरिष्ठाना भेटायला गेल्यासारखा गेलो,' तो म्हणाला, 'माझे पाय कापत होते तरी मी फुगून आलो होतो. मी काही तरी आहे हे तुम्हाला दाखवायचा निश्चय करुन आलो होतो. जाताना मात्र मी एक सर्व काही समजणारा चागला मित्र मिळवून जातो आहे. सर्व काही समजणे म्हणजे किती मोठी गोष्ट आहे! मी तुमचा आभारी आहे. मी जातोय. जाताना एक मौलिक विचार घेऊन जातोय मोठी माणस साधी असतात, त्याना सर्व काही जास्त समजत. आम्ही ज्या छोटया माशासमवेत राहतो त्याच्यापेक्षा ती आम्हा गरिबाच्या जवळ असतात. गुड बाय मी तुम्हाला कधीच विसरणार नाही!'

त्याची नाकपुडी थरारली, त्याच्या ओठावर स्मित झळकलं आणि तो अनपेक्षितपणे म्हणाला,

'वाईट माणसे कमनशिबीसुद्धा असतात, मरोत ती!'

तो गेल्यानतर त्या दिशेकडे पाहात पाव्हलोव्हिचने स्मित केलं आणि म्हणाला, 'चागला माणूस आहे. जरी त्याला आता शिकवता येणार नसलं तरी.'

'का?'

'त्यानी त्याची शिकार केलीय. त्याला हाकललाय!'

रशियामध्ये प्रामाणिक मनुष्य म्हणजे लहान मुलाना भिववण्यासाठी बागुलबुवा असतो ना तसाच काही तरी...

□

मला अस वाटतंय की, अँटन पाव्हलोव्हिचच्या सान्निध्यात येणारा प्रत्येकजण साध, प्रामाणिक बनण्याचा प्रयत्न करी आणि मी पाहिलय की, लोक पुस्तकीपणा, नाटकीपणा, रशियन लोक युरोपियन वाटण्यासाठीची धडपड (रानटी लोक जसे सुसस्कृततेचे वेश पांघरतात) त्याच्यापुढे टाकून देत, नाटकीपणाचा, दिखाऊपणाचा अँटन पाव्हलोव्हिचला तिटकारा होता. मला जाणवलंय की, असा मनुष्य दिसला की, त्याला त्या बेगडीपणापासून मुक्त करण्यासाठी अँटन पाव्हलोव्हिचला ऊर्मी येई, त्याच खरं स्वरूप त्याला दाखवण्यासाठी तो धडपडे. अँटन पाव्हलोव्हिच आयुष्यभर अतर्यामीच्या अँटनचे जीवन जगला, अतर्यामी मुक्त. त्याच्याकडून किंवा खरं म्हणजे अँटन चेकॉव्हकडून ज्या अपेक्षा केल्या गेल्या त्याची पर्वा न करणारा असाच तो होता उच्च विषयावरची सभाषण त्याला आवडत नसत अशी सभाषणं साध्या हृदयाच्या रशियन लोकाना त्यात चतुराई नसली तरी त्याचा फोलपणा बाजूला ठेवून आवडतात. अगावर घालायला कपडे नसले तरी वर्तमान बाजूला ठेवून मखमली भविष्याचा विचार करणारी सभाषणं

## प्रत्येकानं आपल्या भाषेतच बोललं पाहिजे!

स्वत: अत्यत साध्या असणाऱ्या चेकॉव्हला साध, प्रामाणिक, वास्तव सगळ आवडायच. इतराना ते आवडावं यासाठी त्याच्या काही पद्धती होत्या.

एकदा झकपक पोशाख केलेल्या तीन स्त्रियानी त्याला भेट दिली. खोली भरून त्याच्या रेशमी वस्त्राची सळसळ आणि त्यांच्या उंची अत्तराची दरवळ भिरभिरत होती. त्याच्या समोरच्या खुर्चीवर तोऱ्यात बसून, राजकारणात विलक्षण रस असल्याचा आव आणीत त्यानी प्रश्न विचारले

'युद्ध कसं संपल असं तुम्हाला वाटतं अॅन्टन पाव्हलोव्हिच?'

थोडसं खोकून, विचार करण्यासाठी थाबून अँटन पाव्हलोव्हिचनं प्रेमळ स्वरात उत्तर दिल–

'शाततेमध्ये, शंकाच नाही!'

'त्यात शका नाही; पण कोण जिंकेल? ग्रीक की तुर्क?'

'मला असं वाटतं की, बळकट असणारी बाजूच जिंकणार!'

'आणि कोणती बाजू बळकट आहे अस तुम्हाला वाटतं?' तिघीनी एका सुरात विचारलं.

'ज्या बाजूला चागलं खायला मिळतं, चागलं शिक्षण मिळतं ती.'

'किती चतुर बोलतात नाही?' त्यातील एक ओरडली.

'आणि तुमच मत कोणाला? ग्रीक की तुर्क?' दुसरीनं विचारल.

अॅन्टन पाव्हलोव्हिचन तिच्याकडे स्नेहान पाहात आपल्या हुकमी स्मितातून उत्तर दिलं–

'मला फळाची गोळी आवडते, तुम्हाला?'

'आवडतात तर!' त्या उत्सुकतेन म्हणाल्या

'त्याची चव किती मस्त असते!' दुसरीन भर टाकली.

आणि मग तिघीनी त्या विषयावरच आपल सखोल ज्ञान पाजळत चर्चेला सुरुवात केली. आतापर्यंत कधीही विचार न केलेल्या ग्रीक आणि तुर्कापेक्षा, ताण न देणारा हा विषय त्याना बरा वाटत होता.

जाताना त्यानी अँटन पाव्हलोव्हिचला वचन दिलं,

'आम्ही तुम्हाला फळाच्या गोळ्याची एक पेटी पाठवू!'

'तुमच संभाषण छान झाल,' त्या गेल्यावर मी शेरा दिला.

अँटन पाव्हलोव्हिच हसला.

'प्रत्येकानं आपल्या भाषेतच बोलल पाहिजे!' तो म्हणाला.

आणखी एकदा एक तरुण देखणा वकील त्याच्याकडे आला होता. चेकॉव्हच्या समोर उभा राहून मान हलवत तो आत्मविश्वासपूर्वक बोलत होता.

'तुमच्या 'मिस्क्रिएंट' मध्ये तुम्ही एक अतिशय गुतागुतीची

समस्या आणली आहे. तुमच्या डेनिस ग्रिगोरेवमध्ये मला जर सहज दुष्ट प्रवृत्ती आढळली तर समाजहिताच्या दृष्टीनं त्याला कायद्याच्या हाती सोपवणं माझं कर्तव्य आहे; पण तो रानटी आहे, आपल्या कृत्यामध्ये गुन्हेगारी आहे याची त्याला कल्पना नाही. मला त्याच्या-बद्दल वाईट वाटतं. तो अविचारानं वागणारा आहे म्हणून त्याला सहानुभूती दाखवली तर तो पुन्हा नट ढिले करून रेल्वेचा घातपात करणार नाही अशी ग्वाही समाजाला मी कशी देणार ? हा प्रश्न आहे. काय करता येईल याबद्दल ?'

तो थाबला. खुर्चीवर बसून त्यानं अँटन पाव्हलोव्हिचकडे एकाग्र नजर लावली. त्याचा गणवेश नवा होता. त्याची बटणंसुद्धा एखाद्या नव्यानं धार्मिक झालेल्या माणसाप्रमाणं आत्मविश्वासानं आणि मूर्ख-पणानं चमकत होती.

'जर मी जज्ज असतो, ' अँटन पाव्हलोव्हिच गंभीरपणे म्हणाला, 'तर डेनिसला मी निर्दोष सोडलं असतं !'

'कोणत्या आधारावर ?'

'मी त्याला म्हणालो असतो, अजून तू गुन्हेगारीत निर्ढावलेला नाहीस. जा डेनिस, पक्का निर्ढाव !'

तो वकील हसला; पण झटकन परत गंभीर झाला.

'नाही, आदरणीय अँटन पाव्हलोव्हिच, ज्या समाजाच्या हित-संबंधाचं मी संरक्षण करतो, त्यामध्येच ही तुम्ही निर्माण केलेली समस्या सोडवता येईल. डेनिस रानटी आहे हे खरं आहे; पण तो गुन्हेगार आहे यातच सत्य सामावलेलं आहे.'

'तुम्हाला ग्रामोफोन ऐकायला आवडतं का ?' अँटन पाव्हलो-व्हिचनं अचानक विचारलं.

'आवडतं खूप आवडतं. तो एक आश्चर्यकारक शोध आहे.' त्या तरुणानं झटकन उत्तर दिलं.

'आणि मला ग्रामोफोन आवडत नाही.'

'का ?'

'काय आहे, ग्रामोफोन भावनेशिवाय बोलतो, गातो. त्यातून येणारे आवाज रिक्त, निर्जीव वाटतात आणि तुम्हाला फोटोग्राफी आवडते ?'

तो तरुण फोटोग्राफीचा आत्यंतिक चाहता निघाला. 'ग्रामोफोन' या आश्चर्यकारक शोधामध्ये अजिबात रस न घेता त्यानं फोटो-ग्राफीवर बोलायला सुरुवात केली. चेकॉव्हनं त्याची आवड बरोबर हेरली होती. पुन्हा एकदा गणवेशाच्या आत दडलेला एक चैतन्यशील तरुण एखादा कुत्रा जसा सदैव शिकारीवर असतो तसा जीवनाकडे तारुण्याच्या उन्मादानं पाहात असलेला मला दिसून आला.

त्याला निरोप दिल्यावर अँटन पाव्हलोव्हिच मला खिन्नपणे म्हणाला, 'न्यायाच्या पाठीमागं असणारे असे फोडच माणसाची नियती हिरावून घेतात !'

थोडं थाबून तो पुढं म्हणाला,

'आणि वकिलांना मासेमारीचा छंद असतो. विशेषतः खाण्यासाठी.'

¤

'उथळपणा' उघडयावर आणण्याची कला त्याला अवगत होती. ज्या माणसाची जीवनमूल्ये उच्च असतात आणि ही मूल्ये साधेपणा, सुसंवाद आणि सौंदर्य यांच्याबद्दलच्या प्रेमातून स्फुरलेली असतात. त्यानाच ही कला साध्य होते. 'उथळपणा'च्या बाबतीत तो अगदी कठोर, निर्दय असा न्यायाधीश होता.

कोणी तरी एकदा त्याच्या समोर म्हणाले की, कोठल्या तरी एका प्रसिद्ध मासिकाच्या संपादकानं कारण नसताना एका रेल्वेगार्डचा अपमान केला होता. आपल्या हाताखालच्या लोकाना नेहमी वाईट वागणूक देणारा हा संपादक प्रेम आणि सहानुभूती याच्या आवश्यकते-नुसार हिरीरीने बोले.

'साहजिक आहे.' अँटन पाव्हलोव्हिच हसत म्हणाला, 'तो सरदार घराण्यातल्या आहे, संस्कृतीत वाढलाय... धर्मगुरूच्या कॉलेजमध्ये वाढलाय. त्याचे वडील उंची बूट वापरत; पण हा साधेच घालतोय !'

ज्या टोनमध्ये जे शब्द आले त्या शब्दांनी त्या सरदाराला एक-दम खालच्या पातळीत सामान्य करून टाकले.

'एकदम असामान्य मनुष्य' एका पत्रकाराविषयी बोलताना तो म्हणाला, 'त्याचं लिखाण उच्च दर्जाचं, लोकाभिमुख गोड असतं. आपल्या बायकोला तो सर्वांसमक्ष मूर्ख ठरवतो. त्याचे नोकर कुबट खोलीत झोपतात आणि त्याना सधिवात होतो.'

'तुमचं त्या अमक्या-अमक्याबद्दल काय मत आहे, अँटन पाव्हलोव्हिच ?'

हां, फार चागला मनुष्य.' अँटन पाव्हलोव्हिचनं खोकत सांगि-तलं, 'त्याला सगळं माहिती आहे तो खूप वाचतो. त्यानं माझी ३ पुस्तकं नेली आणि परतच केली नाहीत ! जरा विसराळू आहे. एक दिवस तुम्हाला सागेल की, तुम्ही फार चागले आहात आणि पुन्हा कोणाला तरी सांगेल की, तुम्ही तुमच्या रखेलीच्या नवऱ्याचे काळे पट्टे असणारे सिल्कचे पायमोजेच चोरले होते !'

कोणी तरी एकदा म्हणत होते की, एका प्रसिद्ध मासिकाचे गंभीर विभाग फारच अवघड आणि कटाळवाणे असतात.

'ते लेख वाचत जाऊ नकोस !' अँटन पाव्हलोव्हिचनं विश्वास-पूर्वक सागितलं ते सहकारी साहित्य आहे श्री. गोरे, ताबडे आणि काळे ते लिहीत असतात. एक जण लिहितो, दुसरा त्यावर टीका लिहितो आणि तिसरा त्या दोघाच्या लिखाणातल्या तर्कदुष्टतेचं समर्थन करतो. एखाद्यानं पत्त्याचे डाव स्वतःशीच खेळण्यासारखं आहे ते. वाचकाना हे का हवंय हे त्यापैकी कोणीच विचारात घेत नाही.'

एकदा एक चागली दिसणारी, टिपटाप पोशाख केलेली, निरोगी प्रकृतीची स्त्री भेटायला आली. तिनं चेकॉव्ह पद्धतीनं बोलायला सुरुवात केली.

'अँटन पाव्हलोव्हिच, आयुष्य किती नीरस आहे. प्रत्येक गोष्ट घाणेरडी– लोक, आकाश, समुद्र, फुलंसुद्धा मला घाणेरडी वाटतात. माझं हृदय कळवळतं की आशा करण्यासारखं जगात काही नाही. जसा काही एखादा रोगच !'

'तो रोगच आहे !' अँटन पाव्हलोव्हिच उत्साहानं म्हणाला, अगदी तसंच आहे. लॅटिनमध्ये त्याला रोगग्रस्त देखावा म्हणतात.'

त्या स्त्रीच्या सुदैवानं तिला लॅटिन समजत नव्हतं किंवा तिनं समजत नसल्याचं ढोंग तरी केलं.

'टीकाकार म्हणजे शेत नांगरणाऱ्या घोडयांना त्रास देणाऱ्या माशांसारखे असतात.' तो मिश्किलपणे हसून म्हणाला, 'घोडयाचे स्नायू एखाद्या फिडलच्या तारेप्रमाणे ताणलेले असतात. एखादी माशी



कधी कधी त्याचे खिन्न थट्टेखोर डोळे
अतिशय कठोर, थंड बनत.

घुं घुं करीत त्याचा चावा घेते. घोड्याची त्वचा थरारते. तो आपली शेपटी हलवतो. माशी का घोंगावते ? कदाचित तिलाही माहीत नसेल. कदाचित ती अस्वस्थ असेल. आपल्या अस्तित्वाची तिला जाणीव करून द्यायची असेल. 'मी सुद्धा जिवंत आहे बरं !' ती म्हणत असावी, बघ, मला घोंगावता येतं. मी कशाबद्दलही घोंगावू शकते.' माझ्या कथेवरची परीक्षणं मी गेली २५ वर्षं वाचतो आहे; पण त्यामध्ये एखादा महत्त्वाचा मुद्दा किंवा चांगला सल्ला असल्याचं मला आठवत नाही. एकच एक चांगला परीक्षक म्हणजे स्कॅबिचेव्हस्की. मी दारू प्यायलेल्या अवस्थेत एखाद्या खड्ड्यात मरेन असं भाकित करून मला प्रभावित करण्यात यशस्वी ठरलाय !'

त्याच्या त्या करड्या खिन्न डोळ्यांत एक थट्टेखोरपणा नेहमी दिसे; पण प्रसंगी हे डोळे अतिशय कठोर, थंड, एकाग्र बनत. मग त्याच्या आवाजात एक कठोरपणा येई. अशा वेळी मला वाटे की, हा नम्र, प्रेमळ माणूस कसल्याही अन्यायाविरुद्ध न डगमगता आवाज उठवेल.

काही वेळा मला असं वाटलंय की, इतरांबद्दल एक निराशा, एक उदासीनता त्याच्या दृष्टिकोनात होती.

'रशियन म्हणजे विचित्र प्राणी आहे.' तो एकदा म्हणाला, फार काळ तो आपल्या हातात काही धरू शकत नाही. तरुण असताना जे काही मिळेल ते घेण्याचा प्रयत्न करतो; पण तो ३० वर्षांचा होई-पर्यंत चोथ्याच्या ढिगाशिवाय त्याच्याकडे काही राहात नाही. एखाद्याला चांगलं जीवन, माणसाचं जिणं जगायचं असेल तर त्यानं खूप कष्ट घेतले पाहिजेत. प्रेमानं आणि श्रद्धेनं हे कष्ट घ्यायला हवेत आणि आमच्या देशात ते कसं व्हावं समजत नाही. एखादा इंजिनियर चार–दोन चांगली घरं बांधली की, आयुष्यभर पत्ते खेळण्यात, नाही तर नाटकं बघण्यात दिवस घालवतो. डॉक्टरची प्रॅक्टिस बसली की, शास्त्राचा आणि त्याचा संबंध संपतो, वैद्यकीय समाचाराच्या पलीकडे तो वाचत नाही आणि ४० वर्षांचा होईपर्यंत सगळे रोग सर्दीपासून होतात याबद्दल त्याची खात्री पटलेली असते. आपल्या कामाचं महत्त्व पटलेला एकही अधिकारी मला भेटलेला नाही. ते बहुतेक राजधानी किंवा एखाद्या मोठ्या शहरात तळ ठोकतात. एखादा अहवाल शोधून झिमियेव आणि स्मॉर्गोनकडे परिपूर्तीसाठी पाठवतात आणि या अहवालानं ज्याचं स्वातंत्र्य आता झिमियेव आणि स्मॉर्गोनकडे आलेलं असतं, त्यांच्याबद्दल त्या अधिकाऱ्यांना, एखाद्या निरीश्वरवाद्याला नरकातल्या हालाची जेवढी काळजी असते तेवढीच काळजी असते. एकदा नाव झालं की, वकीलसाहेबांना सत्याची भीड राहत नाही, ते मग मालमत्तेच्या हक्कांचे फक्त संरक्षण करतात. उंची खातात, घोड्यावर पैसे लावतात आणि सगळ्या कलांचे स्वतःला कदरदान समजतात. एखाद्या नटानं दोन–तीन चांगल्या भूमिका केल्या की, त्याला भूमिकांचा अभ्यास करण्याची गरज राहात नाही. एखादी हॅट घालून तो मग स्वतःला प्रतिभावंत समजू लागतो.

रशिया म्हणजे आळशी लोकांची भूमी बनलीय. लोक भरपूर खातात, पितात. दिवसा झोपून घोरत राहातात. घरात शिस्त यावी म्हणून लग्नं करतात आणि सामाजिक प्रतिष्ठेसाठी रखेली ठेवतात. त्यांचं मानसशास्त्र म्हणजे कुत्र्याचं मानसशास्त्र आहे. त्यांना मारा! ते मुकाट कण्हतील आणि आपल्या घरात परततील. त्यांना कुरवाळा, ते उताणे पडून शेपूट हलवतील!'

या शब्दामागे एक थंड, विषादयुक्त उपहास ठळक दिसत होता; पण असं कठोर बोलताना जर एखादा अवमानित झाला तर अँटन पाव्हलोव्हिचला दयाही येई. तो मग त्याच्या बाजूनं बोले.

'हे बघा. तो म्हातारा आहे. त्यानं सत्तरी गाठलीय.'

किंवा

'तो अजून लहान आहे. त्याच्या अवखळपणानं तसं होतं.'

आणि असं बोलताना मला त्याच्या चेहऱ्यावर कधी घृणा दिसली नाही.

¤

तारुण्यातला उथळपणा म्हणजे मजेदार असतो, क्षुल्लक असतो; पण हळूहळू तो त्या व्यक्तीभोवती पसरतो, एखाद्या धुराप्रमाणे, विषाप्रमाणे त्याच्या रक्तात, मेंदूत भिनतो. मग तो एखाद्या हॉटेलच्या धुरकटलेल्या काहीही न उठलेल्या किंवा न वाचता येणाऱ्या बोर्डासारखा बनतो.

पहिल्यापासून अँटन पाव्हलोव्हिचनं या थिल्लरपणाच्या समुद्राबद्दल, त्यातून निर्माण होणाऱ्या शोकपर्यवसायी विनोदाबद्दल कठोरपणे लिहिले आहे. त्याच्या विनोदी वाटणाऱ्या गोष्टी वाचल्या तर लक्षात येईल की, लेखकानं 'दुष्ट' प्रवृत्तीबद्दल आपल्या विनोदी प्रसंगातून आणि शैलीतून किती शरमिंदेपणानं लिहिलंय.

एखाद्या कुमारिकेची मुग्धता त्याच्याकडं होती. अगदी उघडपणे आणि जोरदारपणे लोकांना आव्हान देणं त्याला जमलं नाही. 'जरा चांगलं वागा रे!' त्याचा वृथा विश्वास होता की, चांगलं वागण्याची गरज लोकांना आपसूक पटेल. थिल्लर आणि घाणेरडं टिपून जे वाईट आहे ते त्यानं कवीच्या उच्च भाषेत, विनोदाच्या स्मितातून मांडलं आणि अंतर्यामीची त्याची कटु भावना त्याच्या कथामध्ये क्वचितच जाणवते.

'अल्बीयनची मुलगी' वाचताना वाचकवर्ग हसतो. कदाचित एका सुस्थितीत वाढलेल्या एका जमीनदाराचा एका सगळ्या गोष्टीत नवख्या असणाऱ्या दुःखी व्यक्तीबद्दल तिटकारा त्यांच्या लक्षात येत नसेल आणि चेकॉव्हच्या सगळ्या गमतीदार गोष्टीमध्ये मला एका-एका खऱ्याखुऱ्या तळमळीच्या माणसाचा प्रेमळ, सभ्य असा उसासा, स्वाभिमान जपण्यास असमर्थ असणाऱ्याबद्दलच्या दयेचा उसासा, जे लोक बळापुढं मान तुकवतात, गुलामगिरीचं जिणं जगतात, जगण्यासाठी आवश्यक तेवढ्याची गरज मानून फक्त सत्ताधीश आणि बलिष्ठ यांचा मार तेवढा ज्यांना जाणवतो त्यांच्याबद्दलचा उसासा ऐकू येतो.

आयुष्याच्या क्षणभंगुर लहरीची शोकांतिका चेकॉव्हएवढी कोणालाच समजली नाही. मध्यमवर्गीयांच्या कुबट जीवनाचं अगदी वास्तव आणि लाजिरवाणं असं जीवन, इतकं खरेपणानं आजवर कोणत्याच लेखकानं मांडलं नव्हतं.

थिल्लरपणा हा त्याचा शत्रू होता. आयुष्यभर तो त्याच्याशी झगडला, त्याचा त्यानं उपहास केला. आपल्या लेखणीनं त्यानं त्याचं शल्यविधान केलं. सगळ्या गोष्टी अतिशय व्यवस्थित दिसल्या तरी थोड्याशा थिल्लरपणाचाही त्याला वास येई आणि जेव्हा त्याचा, एका कवीचा मृतदेह एका वॅगनमधून मास्कोला पाठवण्यात आला तेव्हा थिल्लरपणानं पुन्हा उचल खाल्ली.

ती हिरवी वॅगन म्हणजे मला आपल्या शत्रूकडे पाहून थिल्लरपणानं केलेलं राक्षसी हास्य वाटतं आणि 'पिवळ्या' वर्तमानपत्रांच्या आठवणी. वरवरचं दुःख या सगळ्यात मला 'थिल्लरपणानं' आपल्या शत्रूच्या मृत्यूत केलेला आनंद दिसला.

¤

चेकॉव्हचं साहित्य वाचताना मला हिवाळ्यातला एखादा वाईट दिवस पाहिल्यासारखं वाटतं. हवा पारदर्शक, निष्पर्ण वृक्ष शान्तपणे उभे, घरं एकमेकाला चिकटून उभी, लोक निरुत्साही, निस्तेज असे. सगळं नवखं, एकाकी, स्तब्ध, दुर्बल. दुरावा, निळसर, पोकळ, फिकट, आकाशाला मिळून गोठलेल्या मातीवर थंडीचा उसासा टाकणारा असा; पण लेखकाचं मन स्वच्छ सूर्यप्रकाशाप्रमाणे. रुळलेले रस्ते, निर्घृण मार्ग आणि घाणेरड्या घरात राहणाऱ्या बिचाऱ्या लोकानी आळसावलेल्या जीवनात निरर्थक मरण्याची धडपड उजळवून टाकतं. त्यामध्ये एखाद्या मांजराप्रमाणे नाराज असलेली 'डार्लिंग' एक गोड, नम्र मुलगी जी अगदी मन लावून एखाद्या गुलामाप्रमाणे प्रेम करते. तिच्या गालावर एखादी चपराक लावा ती कुईपण करणार नाही. तिच्या पाठीमागे ओल्गा आहे 'थ्री सिस्टर्समधली' तीसुद्धा प्रेमाला आसुसलेली; पण आपल्या भावाच्या, थिल्लर भावाच्या बायकोच्या लहरीपुढे मान तुकवणारी आहे. तिच्या बहिणीची आयुष्यं बरबाद होतात तेव्हा ती रडण्यापलीकडे काही करू शकत नाही, एकटं जगू शकत नाही. तेव्हा उथळपणाच्याविरुद्ध एक आवाज तिच्यात तयार होतो.

आणि हे चेरी ऑर्चर्डमधील आसवानी थरलेली रानेवस्काया आणि ऑर्चर्डची पूर्वीची मालकमंडळी आहेत मुलासारखी स्वार्थी आणि म्हाताऱ्यांसारखी कुचकामी जी अगोदरच मरायला पाहिजे होती अशी ती. आपल्याभोवती काय चाललंय हे न कळणारी रडतात, भेकतात बाडगुळासारखीच; पण जीवन जगायला असमर्थ आहेत. बिनउपयोगाचा विद्यार्थी ट्रॉफीमोव कामाचं महत्त्व सांगतो आणि निष्क्रियासाठी काम करणाऱ्या वऱ्याबरोबर पोकळ संवाद मारीत वेळ घालवतो.

'द थ्री सिस्टर्स'चा नायक वर्शिनिन तीनशे वर्षानंतर येणाऱ्या सुखाच्या दिवसाची स्वप्नं पाहतो आणि आपल्या भोवतीच विश्व कोसळत असल्याचं त्याच्या लक्षातच येत नाही. त्याच्या समोरच सॉलीयोनी कंटाळा घालवण्यासाठी गरीब बॅरन टुसेनबाशला मारायला सज्ज होतो तेही त्याला दिसत नाही.

प्रेमाच्या गुलामाची एक लांबलचक रांग आळशीपणा, मूर्खपणा, लौकिकाची भूक दाखवित वाचकासमोरून जाते. जीवनाच्या गडद भीतीचे गुलाम, भविष्याच्या अनिश्चित आशेनं सभोवताल मरत पुढे सटकतात, जणू काही वर्तमानात त्यांना जागाच नाही.

त्या करड्या वातावरणात कधी बंदुकीचा आवाज ऐकू येतो.

कोणी तरी इवानोव्ह किंवा ट्रेपलोवनं काय करायचं ते कळून आत्महत्या केलेली असते.

बरेचसे दोन शतकानी येणाऱ्या सुखी जीवनाचं स्वप्न पाहात असतात. त्यानी काही केलं नाही तर भविष्यकाळ उज्ज्वल कोण करणार हे कोणी विचारीतच नाही.

आणि मग या मठ्ठ भासलेल्या नपूसकाजवळून एक शहाणा मनुष्य जातो. या सर्व त्याच्या भूमीतल्याच कष्टी जीवाकडे सहानुभूतीचा कटाक्ष टाकतो आणि त्याना आपल्या सभ्य कळकळीच्या आवाजात. अतःकरणपूर्वक तळमळीनं सांगतो, 'सभ्य गृहस्थानो, तुम्ही कसलं निरर्थक जिणं जगताय!'

## मी हे जग किती सुंदर बनवलंय!

पाच दिवस झाले ताप आहे; पण विश्रांतीची इच्छा नाही बाहेर पाऊस कोसळतो आहे. फोर्ट इनोच्या बंदुका धडधडत आहेत. रात्रीच्या वेळी ढगाना स्पर्शणारा सर्चलाइट दिसतो युद्ध या महाभयानक विकाराची सतत आठवण करून देणार आहे हे सगळं.

मी चेकॉव्ह वाचतोय जर तो दहा वर्षांपूर्वी मेला नसता तर युद्धानं त्याला मारलं असतं. माणसाबद्दलचा द्वेष त्याच्या रक्तात भिनवून त्याला मारलं असतं. मला त्याची अंत्ययात्रा आठवली.

मास्कोनं अत्यंत प्रेम केलेल्या या लेखकाची शवपेटी 'शिंपले' असं मोठ्या अक्षरात लिहिलेल्या एका हिरव्या वॅगनमधून आणण्यात आली. लेखकाचं अंत्यदर्शन घ्यायला आलेला समुदाय स्टेशनपासून चुकून जनरल केलरच्या मान्चुरियाहून आणलेल्या शवपेटीमागून गेला. एका लेखकाला शवभूमीत नेताना सैन्याचा बँड का वाजवला जातोय याचं सगळे आश्चर्य करीत होते. चूक समजल्यावर काही मोकळ्या दिलाची माणसं मनमुराद हसली. चेकॉव्हच्या अंत्ययात्रेला फक्त शभरच माणसं होती. माझ्या आठवणीत नवऱ्याप्रमाणे नवे बूट आणि टाय घालून आलेले दोन वकील आहेत. त्यातला एक व्ही. ए. मॅक्लाकोव आपल्या कुत्र्याच्या हुशारीबद्दल सांगत होता आणि दुसरा कोण होता कोणास ठाऊक! तो आपल्या उन्हाळ्यासाठी बांधलेल्या बंगलीची आणि सुंदर वातावरणाची बढाई मारत होता आणि जांभळा ड्रेस घातलेली एक बाई शेजारच्या चष्मा घातलेल्या म्हाताऱ्याला हातात लेस धरून सांगत होती.

'तो किती गोड होता आणि इतकं मस्त बोलायचा...'

तो म्हातारा विश्वास बसत नसल्याचं दाखवीत खोकला. तो दिवस अतिशय रखरखीत आणि धुळीचा होता. अंत्ययात्रेच्या पुढच्या बाजूला एक पोलिसअधिकारी एका पांढऱ्या घोड्यावर बसून चालला होता. एका थोर आणि प्रतिभाशाली लेखकाच्या स्मृतीला काळिमा फासणारं आणि थिल्लर अशा या सगळ्या गोष्टी होत्या.

¤

वृद्ध ए. एस. सुवोरिन्व्हला लिहिलेल्या एका पत्रात चेकॉव्ह लिहितो.

'जीवन जगण्यासाठी केलेल्या रुक्ष लढ्यात आनंद मारणं, उदासीनता निर्माण करणं यासारखी उग्गस आणि रसहीन गोष्ट दुसरी नाही!'

ह्या शब्दांची अभिव्यक्ती रशियन आहे आणि चेकॉव्हची नाही असं मला वाटतं. सगळं काही असलेल्या आणि कामावर प्रेम न करणारी माणसं जेथे आहेत अशा रशियामध्ये लोक विचार करतात रशियन लोक शक्तीचं कौतुक करतात; पण त्यावर विश्वास ठेवत नाहीत. क्रियाशील प्रवृत्तीचा जॅक लंडनसारखा लेखक रशियामध्ये अशक्य आहे. जॅक लंडनची पुस्तकं रशियामध्ये लोकप्रिय आहेत; पण रशियन लोकाना त्यानी कार्यप्रवृत्त केलेलं नाही, फक्त त्यांच्या कल्पनाशक्तीला खाद्य पुरवलय; पण चेकॉव्ह त्या दृष्टीनं रशियन नव्हता. त्याच्या तरुणपणातल्या झगड्यामध्ये पावाच्या पापुद्र्यासाठी मोठ्या तुकड्यासाठी रंगहीन, आनंदहीन अशी क्षुल्लक चिंता होती इतरांसारखीच. आनंद नसलेल्या या चिंतामध्ये त्याची सगळी ताकद खर्च झाली. त्याची विनोदबुद्धी यातूनही त्यानं कशी जोपासली याचं मला आश्चर्य वाटतं. त्यानं पाहिलेलं जीवन म्हणजे अन्न आणि सौख्य यासाठीची कंटाळवाणी धडपड होती. त्याळलं नाटय आणि शोकांतिका सामान्यत्वाच्या एका पडद्यानं लपवली. इतरांसाठी राबायची त्याला जेव्हा गरज राहिली नाही तेव्हाच या नाटयांकडे बारकाईनं त्याला पाहता आलं.

संस्कृतीसाठी कामाचं महत्त्व चेकॉव्हएवढं पटलेला मला दुसरा भेटला नाही. त्याच्या घरगुती बाबीत, वस्तूवरच्या प्रेमात, वस्तु निवडताना मला ते जाणवलय. वस्तु गोळा करण्याचा त्याला छंद होता; पण त्या निर्माण करणाऱ्या माणसाच्या सर्जनशील प्रतिभेचं कौतुक करण्याचाही त्याला कंटाळा नव्हता. त्याला बांधायला, बागा उभ्या करायला, जमिनीची निगा ठेवायला आवडायचं. त्यात त्याला काव्य दिसे. त्यान स्वतः लावलेल्या झाडांची वाढ तो वात्सल्यानं न्याहाळत असे. अट्कामधील घर बांधताना तो कितीएक काळजीत होता त्या वेळी म्हणाला,

'जगातल्या प्रत्येकानं आपल्याला शक्य असेल तेवढं काम आपल्या जमिनीत जर केलं तर जग किती सुंदर बनेल!'

मी त्या वेळी 'वॉसिली बुस्लायेव' हे लिखाण (नाटक) लिहिण्यात दंग होतो. वॅसिलीचं अभिमानपूर्वक असलेलं स्वगत मी त्याला वाचून दाखवलं.

'जर माझ्यात अधिक ताकद असती,
मी माझ्या गरम श्वासानी बर्फ वितळवलं असतं.
जगभर हिंडलो असतो, जमिनी नांगरल्या असत्या.
मोठमोठी गाव, शहरं शोधली असती.
चर्चेस बांधून फळबागा लावल्या असत्या.
जग एखाद्या सुंदर मुलीप्रमाणे दिसेल.
वधूप्रमाणे मी मग हातात हात घेईन.
ही जमीन मी छातीशी कवटाळेन
आणि अशीच उचलून प्रभूकडं देईन.
बघा देवा, ह्या जगाकडं बघा.
मी ते किती सुंदर बनवलंय.
एखाद्या धोंड्याप्रमाणे तुम्ही आभाळातून फेकलत.
मी त्याला एखाद्या हिऱ्याप्रमाणे घडवलंय.
त्याकडे पहा, तुमचं हृदय आनंदानं भरू द्या.
सूर्याखाली ते कसं हिरवंगार चमकतय.
मी हे आनंदानं तुम्हाला देईन.
पण नाही—मला ते अत्यंत प्रिय आहे!'

चेकॉव्हला हे स्वगत अतिशय आवडलं. खोकत खोकत तो मला आणि डॉ. ए. एन. ॲलोविसनला म्हणाला,

'छान...फारच छान...वास्तव, मानवी जीवनाशी प्रामाणिक. सगळ्या तत्त्वज्ञानाचा अर्थ त्यातच आहे. माणूस या जगात राहायला आला. तो हे जग राहण्याजोगे सुंदर बनवेल!' आपले डोळे निश्चयाने हलवीत तो म्हणाला, 'तो नक्कीच बनवेल!'

पुन्हा एकदा वॅसिलीच स्वगत त्यान मला वाचायला लावलं आणि खिडकीतून बाहेर पाहात लक्षपूर्वक ऐकलं.

'शेवटच्या दोन ओळी चालणार नाहीत. त्या उद्धट आहेत, अनावश्यक आहेत!'

¤

आपल्या साहित्यकृतीबद्दल तो फार थोडं आणि तेही नाइलाज झाला तर बोले आणि अशाच नवयुवतीच्या लाजाळूपणे तो टॉलस्टॉयबद्दल बोले असं म्हणता येईल. कधी तरी मजेत आला की, हसत एखाद्या कथेच सूत्र ऐकवी. ती बहुतेक गमतीदार असे!

'मी म्हणतो मी एका निरीश्वरवादी शिक्षिकेची कथा लिहीन. ती डार्विनची भक्त असते. अंधश्रद्धा आणि गैरसमज यांच्या विरुद्ध झगडण्याची आवश्यकता तिला पटलेली असते आणि एका चेटूकघरात ती काळ मांजर भाजायला जाते. एका माणसाचं प्रेम जिंकण्यासाठी तिला त्या मांजराच्या फासळीचं हाड हवं असतं. अशा प्रकारे इच्छापूर्ती करणारी हाडं असतात बरं...!'

आपली नाटकं 'मजेदार' आहेत असं तो म्हणे आणि तो मजेदार नाटकं लिहितो याबद्दल त्याची बालंबाल खात्री होती. साव्वा मोरोझोन जेव्हा हेकटपणे म्हणाला, 'चेकॉव्हची नाटकं काव्यात्मक सुखान्तिका म्हणून सादर कराव्यात!' तेव्हा तो चेकॉव्हचेच शब्द पुनरुच्चारीत होता.

पण एकंदरीत साहित्याकडे त्याचे मनापासून लक्ष असे. विशेषत: नवोदित साहित्याकडे. बी. लाझारेव्हस्की, एन. ऑलीगर आणि इतर अनेकांची हस्तलिखितं त्यानं अतिशय सहनशीलतेनं वाचली.

'आपल्याला अजून खूप लेखक पाहिजेत!' तो म्हणाला. 'साहित्य हे आपल्या दैनंदिन जीवनात अजून नवं आहे. अगदी निर्वाचितांनासुद्धा! नॉर्वेमध्ये प्रत्येक २२६ माणसामागे एक लेखक आहे आणि इथं दहा लाखात एक आहे!'

त्याच्या आजारपणामुळं त्याचा स्वभाव कधीकधी एकदम खराब, माणूसघाणा बने. अशा वेळी तो अतिशय चिकित्सक, टीकाखोर बने. त्याच्याबरोबर जमवून घेणं मग कठीण बने!

एकदा सोफ्यावर झोपून कोरडं खोकत तो थर्मामीटरशी खेळत म्हणाला,

'मरण्यासाठी जगण्यात काही चव नाही; पण तुम्ही तुमची वेळ भरण्यापूर्वी मरणार आहात हे समजून जगण्यात एक उन्माद आहे!'

आणखी एकदा उघड्या खिडकीत बसून दूरवरच्या समुद्राकडे पाहात तो एकदम चिडून म्हणाला,

'आपल्याला चांगल्या हवेत, चांगलं पीक घेत, एखादं सुंदर प्रेमप्रकरण चघळत, एकदम श्रीमंत होण्याची किंवा पोलीसप्रमुख होण्याची स्वप्नं पहात जगायची सवय लागलीय; पण शहाणं व्हायची आशा बाळगणारा मला अजून भेटला नाही. आपण म्हणतो नवा झार आला की, सुधारेल सगळं आणि दोनशे वर्षांनी अजून चांगलं बनेल; पण हा 'उद्या' चांगला करण्यासाठी कोणीच प्रयत्न करत नाही.


*With Best Compliments*

**New Kaka Halwai Sweet Centre**

**Famous for delicious Bangali Sweets**

Opp. Aayurwed Rasashala
Karve Road
Pune 411 004
Phone–53803



Phone : 2442

**DIAMOND GROUP**

Ward 9, H. No. 637/1, Station Road,
ICHALKARANJI

*For Quality*
**Warping, Sizing, Weaving, Bleaching and Mercersing**

**Mali Brothers**

एकंदरीत आयुष्य दररोज अधिकच गुंतागुंतीचं बनत, आपल्या चालीनं सरकतंय, लोक दिवसेंदिवस बथ्थड होत आहेत आणि जीवनापासून दूर एकाकी पडणाऱ्यांची संख्या वाढतेय !'

थोडं थांबून, कपाळावर आठ्या घालीत तो म्हणाला, 'धार्मिक मिरवणुकीतल्या लुळ्या-पांगळ्या भिकाऱ्यांसारखी !'

तो डॉक्टर होता आणि डॉक्टरांचा आजार हा त्याच्या पेशंटच्या आजारापेक्षा भयानक असतो. पेशंटला नुसतं जाणवतं; पण डॉक्टरला जाणवण्याबरोबर रोगाचे, शरीराचे दुष्परिणाम चांगलेच माहीत असतात आणि अशा केसमध्ये ज्ञानामुळंच मृत्यू जवळ येतो !

हसताना त्याचे डोळे छान दिसायचे. एखाद्या स्त्रीचा हळुवार-पणा, कोमलता, स्नेहार्द्रता त्यात होती आणि त्याच्या आवाज न करता हसण्यात एक मोहकता होती. हसताना तो अगदी मनमुराद हसायचा. एवढं खळखळून हसणारा दुसरा मी पाहिला नाही !

पाचकळ गोष्टींना तो कधी हसायचा नाही.

एकदा तो त्याचे आकर्षक, सहानुभूतिपूर्ण हास्य करीत मला म्हणाला,

'टॉलस्टॉय तुझ्या बाबतीत एवढा चंचल का आहे ठाऊक आहे ? त्याला तुझा हेवा वाटतो. सुलेर्झिटस्कीला तू जास्त आवडत असावास असं त्याला वाटतं. अगदी खरं. तो काल मला म्हणाला, का माहिती नाही पण गॉर्कीचं आणि माझं जमणार नाही. सुलर त्याच्याबरोबर राहातो हे मला आवडत नाही. सुलेरच्या दृष्टीनं ते वाईट आहे. गॉर्की निर्दय आहे. सक्तीनं संन्यास घ्यायला लागलेल्या आणि त्यामुळं सगळ्या जगाबद्दल वाईट मत असलेल्या एखाद्या धर्म-शास्त्राच्या विद्यार्थ्याप्रमाणे तो आहे. त्याचं मन जासुदाचं आहे. तो कोठून तरी कॅनानसारख्या परक्या भूमीत आलाय. तो प्रत्येक गोष्ट न्याहाळत असतो जणू काही त्याच्या देवापुढं त्याला त्याचा अहवाल द्यायचा असतो आणि त्याचा देव म्हणजे राक्षसी प्राणी आहे. खेड्या-तल्या म्हाताऱ्यांना ज्यांचं भय वाटतं त्या जलदेवता किंवा वनदेवते-सारखा.

चेकॉव्ह मला हे सांगून डोळ्यांतून पाणी येईपर्यंत हसला आणि मग पाणी पुसत पुढं म्हणाला,

मी म्हणालो, 'गॉर्की चांगला माणूस आहे !' पण तो म्हणाला, 'नाही, नाही. मला ते सांगू नकोस. त्याचं नाक बदकाच्या शेपटी-सारखं आहे. फक्त कमनशिबी लोकांची नाकं तशी असतात. तो बायकांना आवडत नाही आणि बायकांचं कुत्र्यांसारखं असतं. त्यांना चांगला माणूस झटकन कळतो. सुलरला निरिच्छ प्रेमाची देणगी आहे. त्या दृष्टीनं तो असामान्य आहे प्रेम करायला जमलं तर सगळंच जमलं...'

थोडा वेळ थांबून तो म्हणाला, 'होय, त्या म्हाताऱ्याला हेवा वाटतोय. विलक्षण आहे की नाही तो ?'

टॉलस्टॉयबद्दल जेव्हा तो बोलायचा तेव्हा एक हळुवार हास्य त्याच्या डोळ्यांत उमलायचं आणि तो एखाद्या गूढ, अनाकलनीय गोष्टींबद्दल बोलत असल्याप्रमाणे आवाज कमी करायचा, जसं काही ती गोष्ट अगदी जपून वात्सल्यानं हाताळायला हवी असं त्याला वाटायचं.

तो नेहमी ठासून सांगायचा की, टॉलस्टॉयची बारीक, अनपेक्षित, परस्परविरोधी विधानं टिपायला कोणी एकरमानच नाही !

'तू ते करायला हवंस' सुलेर झिटस्कीला तो खात्रीपूर्वक म्हणाला, 'टॉलस्टॉयला तू फार आवडतोस. तो किती तुझ्याबद्दल सांगत असतो आणि नेहमी तुझ्याबद्दल चांगलं बोलत असतो.'

आणि सुलरबद्दल मला म्हणाला,

'फार शहाणा मुलगा आहे.'

किती योग्य बोलला तो.

¤

एकदा टॉलस्टॉय चेकॉव्हच्या कथेची स्तुती करताना मी ऐकलं, बहुतेक 'द डार्लिंग' बद्दल असावं.

'एखाद्या सद्गुणी मुलीनं विणलेल्या लेससारखं आहे ते.' तो म्हणाला. 'जुन्या जमान्यात अशा विणकर मुली असायच्या. त्या आयुष्यभर आपली सुखाची स्वप्नं एखाद्या आकृतीत विणायच्या. त्यांच्या या लेसला संदिग्ध, स्वच्छ, प्रेमाच्या भावनांच्या गाठी असायच्या.' डोळ्यांत पाणी आणून अगदी खऱ्याखुऱ्या भावनेनं टॉलस्टॉय बोलला.

पण त्या दिवशी चेकॉव्हला ताप आला होता आपलं डोकं खाली झुकवून तो बसला होता. त्याचे गाल आजारानं काळे-निळे पडले होते. शांतपणे तो आपला चष्मा पुसत होता. काही काळ तो बोल-लाच नाही आणि शेवटी एक निःश्वास टाकून तो हळूच आणि अवघडलेल्या स्वरात म्हणाला, 'त्यात मुद्रणदोष आहेत !'

चेकॉव्हविषयी खूप लिहिता येईल; पण ते नेमकं आणि जवळून जाणारं हवं ते मला जमत नाही. त्यानं 'द स्टेपी' जशी अगदी सुवासिक, खुल्या हवेची रशियन पद्धतीची अगदी वैचारिक आणि हलवून टाकणारी लिहिली तसं लिहायला हवं. ती गोष्ट त्यानं जशी स्वतःसाठी लिहिली होती तशी

अशा माणसांच्या स्मृती फार चांगल्या असतात. आनंदलहरी भेटल्याचा आनंद होतो. त्यातून जीवनाला एक स्वच्छ अर्थ मिळतो.

माणूस या विश्वाचा कणा आहे.

आणि त्याचे दोष ? तुम्ही विचाराल त्याचे दोष ?

आपल्या सहकाऱ्याच्या प्रेमाचे आपण भुकेले असतो आणि जेव्हा भुकेलेलो असतो तेव्हा अर्धवट भाजलेला पावसुद्धा गोड लागतो !

□


रौप्य महोत्सवाकडे वाटचाल करणारी
परळमधील जुनी विश्वासू महाराष्ट्रीयन पेढी
ज्वेलर्स स्थापना: १९६०
एम. व्ही. पेंडुरकर ॲण्ड सन्स
१ हुसेनी चेंबर्स,
आचार्य दोंदे मार्ग,
मुंबई-४०००१२
फोन : ८८२१५५१
B.Y.P.



# सावरकरांची मूक साहित्यिक प्रेरणा

**प्रा. स. शि. भावे**

**को**णत्याही कलावंताची कलानिर्मिति-मागील प्रेरणा जाणून घेणे हे काम कठिणच म्हणावयास हवे.

या प्रेरणा अनेक असतात, अनेक प्रकारच्या असतात. त्यातल्या काही ज्ञात, तर उरलेल्या अज्ञात असतात. या प्रेरणा एकमेकीत इकक्या घट्ट गुंतलेल्या व घुसून बसलेल्या असतात की, त्या वेगळया–सुटया करणे जवळजवळ अशक्यच असते.

अशा गुंत्यातून एखादी पद्धती शोधून पाहणे अथवा एखाद्या प्रमेयाच्या बांधणीत साऱ्या प्रेरणा गोवणे, हे काम अशक्यप्राय असले तरी ते आकर्षक, किंवहुना आव्हानात्मक असते. सावरकरांच्या साहित्यनिर्मितीमागील प्रेरणांची संगती शोधण्याचा प्रस्तुत उपक्रम म्हणजे कठिण कामाचे आव्हान स्वीकारून पत्करलेले एक साहस आहे. या साहसात काही प्रतिशत यश जरी मिळाले तरी तेही श्रेयस्करच म्हणावे लागेल.

या प्रेरणा निश्चित करण्यासाठी कोणाकोणाची साक्ष काढावी व कोणाकोणाची साक्ष विश्वसनीय मानावी, हाही विचारकाची कसोटी पाहणारा प्रश्न ठरतो. अनुयायांची, निकटवर्तीयांची किंवा स्वतः कलावंताची साक्ष देखील या प्रकरणी निर्विवादपणे साधार मानता येत नाही. सुप्रसिद्ध चित्रकार पिकासो याच्या वृद्धकाळातील कबुलीचे उदाहरण या दृष्टीने बोलके आहे. पिकासोची खास सूचक शैली चित्रकलेच्या तंत्रात व तत्त्वात क्रांतिकारक मानली जात होती व आजही मानली जाते. ही शैली विशेष आशयघन आहे असे स्वतः पिकासोलाही वाटत होते, असे परवापर्यंत मानणाऱ्या भाष्यकारांना पिकासोने आपल्या कबुलीने चांगलेच पेचात टाकले. आपली ही वेगळी, सूचक शैली म्हणजे पोरकट लहरी वृत्तीचा स्वैर

आविष्कार होता असे त्याने प्रकट केल्यावर, त्या शैलीत गहन प्रेरणा शोधणारे मर्मज्ञ समीक्षक व भाष्यकार अगदीच अडचणीत सापडले. सावरकराच्या प्रेरणाबाबत अंदाज बांधणारे अशा अडचणीत सापडण्याचा संभव कमी खरा; पण अशी शक्यता अजिबात नाकारता येणार नाही, हेही तितकेच खरे.

पिकासोच्या तुलनेने सावरकराच्या साहित्यात निर्मितिहेतू अधिक स्पष्ट आहे हा हेतू बऱ्याच प्रमाणात वस्तुनिष्ठ व सामाजिक आहे. आपल्या या हेतूची सावरकराना सुस्पष्ट जाणीव आहे. या दृष्टीने सावरकराना सामाजिक बांधिलकी मानणारे वैचारिक व ललित साहित्यिक असे ठामपणाने म्हणता येईल.

गंमत ही की, व्यंकटेश माडगूळकरांच्या समंजस भूमिकेची कीव करणारे आजचे बांधिलकीवाले सावरकराच्या बांधिलकीचा गौरव करताना दिसत नाहीत किंवा साहित्यातील नैतिकतेचा आग्रह धरून पु. शि. रेग्याना व गगाधर गाडगीळाना मोडीत काढणारे नवमीमासक सावरकराची नैतिकता गौरवताना आढळत नाहीत.

बांधिलकीवाल्याचा हाच मोठा व खरा पराभव नेहमी होत असतो. सर्वच बांधिलक्या समान महत्त्वाच्या असे तत्त्व, स्वतःच्या विशिष्ट बांधिलकीमुळेच, त्याना स्वीकारता येत नाही. यामुळे 'बांधिलकी हवी' या तत्त्वाचा सकोच 'आमची विशिष्ट बांधिलकी हवी' या सूत्रात होतो आणि बांधिलकीची निकोप ताकद कमी होते, ही व्याजबांधिलकी म्हणजे एक विकृतीच होते.

¤

या संदर्भात विशेष महत्त्वाची आणि थोडीफार आश्चर्याची गोष्ट म्हणजे सावरकराच्या बांधिलकीचा निकोपपणा त्याच्या साहित्यात कायम राहिला आहे.

खरे तर सावरकराची जीवननिष्ठा असीम उत्कट. अशा उत्कटतेतून अतिरेक निर्माण होण्याचा सभव अधिक. सावरकराच्या साहित्यात उत्कटता उत्तुग आहे; पण अतिरेक नाही. कारण त्याची निष्ठा अनाग्रहाच्या निर्मळ तात्त्विक पायावर उभी आहे

समर्थ हिंदू समाज आणि समर्थ हिंदू राष्ट्र या सावरकराच्या प्रखर निष्ठा आपण सर्वच ओळखतो; पण या निष्ठाचा आधुनिक, इहवादी, शास्त्रशुद्ध व बुद्धिवादी—म्हणजेच पुरोगामी आशय मात्र आपण स्पष्टपणे ओळखतोच असे नाही.

मघाशी एक गमत पाहिली. आता दुसरी पाहू या. यदा जो तो सावरकराच्या पुरोगामित्वाची ग्वाही देत आहे काही वर्षांपूर्वी यापैकी कोणी अशी भरघोस ग्वाही दिली असती की नाही, कोण जाणे. दोनच वर्षांपूर्वी 'माणूस'मध्ये 'सेक्यूलर समाज प्रबोधक सावरकर' असा प्रस्तुत लेखकाचा लेख प्रसिद्ध झाला होता त्या वेळीही त्यातील प्रतिपादन तसे अनोखे व एकाकीच होते काळाचा म्हणून महिमा असतो तो असा सध्याच्या जन्मशताब्दिवर्षात समाजात प्रबोधनाला अनुकूल वातावरण आहे. या प्रबोधनाच्या परिभाषेत सावरकरांची भूमिका माडण्याचे नवे वारे सुरू झाले आहेत एका परीने होते आहे हेही चागले आहे स्वाभाविकपणे आतून न बदलणारे भोवतालच्या वातावरणाच्या रेट्याने बदलले तरी ते परिवर्तनच आणि तेही स्वागतार्हच— ही स्वत सावरकराचीच भूमिका येथे उत्तम उपयोगी पडेल

¤

. .तर, हिंदू समाजाचे विघटन आणि तत्परिणाम पारतत्र्य याची सावरकराना विशेष तीव्र चीड आहे. कादबरी व नाटक यातून मुख्यत. ही चीड प्रकट झाली आहे

हिंदूमध्ये सामाजिक एकता व दृढता नाही याची सावरकराना तीव्र खत आहे 'मला काय त्याचे ?' या कादंबरीच्या मथळ्यातच ही खंत व्यक्त झालेली आहे एका हिंदूवर अन्याय होत असता दुसरा हिंदू उदासीन राहतो, मदतीला धावून जात नाही, याबद्दल सावरकराच्या मनात जो सताप खदखदत होता त्याचे उद्रेक या कादबरीत ठिकठिकाणी आहेत.

सावरकराचे व्यक्तित्व प्रमाथी आणि उत्कट होते. म्हणून नुसती खत त्याना पुरेशी होत नाही खतीचे रूपातर त्याच्या मनात स्फोटक संतापात होते. अस्पृश्यता ही हिंदू समाजाला लागलेली कीड—तिचा धिःकार 'संगीत उ.शाप' या नाटकात प्रतिक्षणी आहे. श्रीकृष्णाच्या मुखात जी शापवाणी वैनायक वृत्तात प्रकट झाली आहे ती पाहावी :—

'हे महार तुमचे, त्या हिणविता तुम्ही
जगताचेची महार व्हाल तुम्ही जैं,
धर्मबंधु छळ करिता तुमचिया अशा
दुष्ट अहतेचा तै दड तुम्हाला
लागलेचि द्यावा मोजूनि पै नि पै'

यातील 'दुष्ट अहता' हे विश्लेषण लक्षात घेण्याजोगे आहे. 'संन्यस्त खड्ग' हे नाटक अहिंसेच्या अतिरेकाचे दुष्परिणाम सागण्यासाठी लिहिलेले; पण त्यातही या दुष्ट अहंतेचे वर्णन आहेच. सिद्धार्थ म्हणतात—

'गावातील कुत्र्याच्या पाठीवरून प्रेमाने हात फिरविताना मी हजारो चातुर्वर्णियांस पाहिले आहे कुत्र्याची पाळीव पिल्ले हातात उचलून त्याचे कौतुक करताना मी त्रैवर्णिकास पाहिले आहे; पण ह्या दीनहीन अस्पृश्यांचीसोन्यासारखी मुले, कुत्र्याच्या मोलानेही त्यास कोणी विचारीत नाहीत! त्याच्या सावलीचा विटाळ! अशा या दु खी प्राण्यांसारखे दुसरे कोणी दु खी मला मनुष्यजातीत दिसले नाही.'

पन्नास वर्षांपूर्वी सावरकराना तथागत बुद्धाच्या मनातला हा कळकळा जाणवला. डॉ. आबेडकरानी त्यानंतर कितीएक वर्षांनी बौद्धधर्माचा स्वीकार केला.

मीनाक्षीपुरम्चे धर्मांतर का झाले ? याचे उत्तर 'सगीत उ शाप' मध्ये आहे. त्यात बाटलेला इब्राहिम म्हणतोः—

'मुसलमान होऊन मला चार वर्षं झाली; पण अजून कुराणाच एक अक्षर तरी माहीत आहे का ?' मग धर्मांतराचा फायदा काय ? तर, 'हिंदू होतो तोवर सारे हडहड करीत. नतर तसे करण्याचे कोणास धैर्य नाही. यानतर सावरकरानी नोंदलेला अभिप्राय विशेष लक्षात घेण्याजोगा आहे :—

'हिंदूधर्माचं तात्त्विक स्वरूप काय असेल ते असो; पण ही शिवाशिवीची लाथाळी, हाच व्यावहारिक हिंदुधर्म होय, यात काही शका नाही.'

अधिक उदाहरणे देण्याचे कारण नाही. सावरकराच्या मनातला ध्यास लेखनात कसा उतरला आहे हे या थोड्या उदाहरणावरूनही उत्तम स्पष्ट होईल.

¤

समर्थ हिंदूसमाज व स्वतंत्र समर्थ हिंदूराष्ट्र हा सावरकराचा ध्यास लखलखीतपणे उतरला आहे तो त्याच्या 'संगीत उत्तरक्रिया' या नाटकात. हिंदूराष्ट्राची सावरकरांची कल्पना प्रादेशिक व निधर्मी आहे हे

आता वहुतेकांस स्पष्ट व मान्य झाले आहे, हिंदूराष्ट्र म्हणजे भारताविषयी व भारतीयत्वाविषयी आपुलकी व अभिमान बाळगणाऱ्यांचे राष्ट्र अशी सावरकरांची सुस्पष्ट कल्पना अगदी पहिल्यापासूनच आहे. या कल्पनेविषयीचे त्यांचे प्रेमही बेभान म्हणावे एवढे वेडे आहे. ' मुख्यत्वे या रोटीबंदी-समद्रबंदीपायी बाहेरची राज्ये गेली, बाहेरचा व्यापार बुडाला आणि शेवटी ज्या मुकटचापायी हे मुकुट दवडले, तो मुकटाही विटाळला–नव्हे तो मुकटा म्लेंच्छांनी साफ फेडून नेला !' अशा जळजळीत शब्दात त्यांचा **यशवंतराव** बोलतो.

अशा जळजळीतपणातही सावरकरांची मूळ निष्ठा अचल राहिली आहे. या अचलपणाविषयी आश्चर्य वाटत नाही. त्याचे विवेचन नंतर करायचे आहे. मात्र या मूळ निष्ठेसाठी सावरकरांबद्दल गौरव जरूर वाटतो.

' उत्तरक्रिया ' नाटकातलाच हा संवाद पाहावा

**बिबिअम्मा:** शत्रूच्या स्त्रियांची स्पर्शाने देखील विटंबना करू नये हा हिंदूंचा धर्मच आहे.

**सुनीति :** हिंदूंचाच का, तो खऱ्या मुसलमानांचाही धर्म असावयास पाहिजे. कारण तो माणुकीचाच धर्म आहे. तसे समजणाऱ्या भल्या मुसलमानी माणसांच्या पायाचा अंगारा मी एखाद्या हिदूसाधूच्या अंगाऱ्यासारखा मस्तकी धारण करीन !'

यातले ' माणुसकीचा धर्म ' हे शब्द फार महत्त्वाचे आहेत. वर ' दुष्ट अहंता ' या शब्दांशी ते विरोधाने तोल साधतात. माणुसकीने वागणारा, समर्थ आणि दुष्ट अहंतेला ज्याचा धाक वाटेल असा भारतीय समाज हे सावरकरांचे ध्येय होते. तीच त्यांची बांधिलकी होती. ' उत्तरक्रिया ' या नाटकाच्या शेवटचे, पेशवे माधवराव यांचे, हे उद्गार बघावेत :–

' आता बादशहास आमचा निरोप कळवा की, जर बादशाह मराठ्यांशी यापुढे तरी वैर करणार नाहीत तर, न जाणो, हिंदु-मुसलमान हे दोघेही ज्यात बंधु-बंधूप्रमाणे समानतेने वागू शकतील असे एखादे खरेखुरे समाईक हिंदी साम्राज्य अशा बनावातूनच आविर्भूत होऊ शकेल ! जर मुसलमान यापुढे तरी भारतमातेस माता नि हिंदूंस बंधू मानतील तर आम्ही हिंदूही त्यांस बंधू मानू !'

यातील अभिप्राय व त्याची विशालता स्पष्ट आहे तत्त्व व सामाजिक अस्तित्व यांचा समतोल साधण्याची आकांक्षा स्पष्ट आहे. साहित्यलेखनामागील सावरकरांची बांधिलकी स्पष्ट आहे.

¤

मात्र सावरकरांच्या साहित्यिक–प्रेरणेचा वा प्रेरणांचा शोध येथे पुरा होत नाही. खरे म्हणजे येथे तो सुरू होतो.

अनेक नवे प्रश्न उभे राहतात.

' मुकटचापायी मुकुट दवडले ' असे अनुप्रास करावेसे सावरकरांना का वाटले ? भाषाशुद्धीचा पुरस्कार त्यांनी भारतीयत्वाच्या निष्ठेने केला खरा; पण ' वैनायक ' हे वृत्त त्यांनी नव्याने का जन्मास घातले ? या वृत्ताला स्वनाममुद्रा का दिली ? ' वैनायक वृत्ताचा विशेष ' स्पष्ट करून सांगताना, ' सहज शब्दात दुःख सांगणे हे गद्य; पण शब्दात व्यक्त होऔतों ते दुःख न आवरता येऊन अकस्मात् अनावर रडे कोसळते ते पद्य ', अशी भावगर्भ व्याख्या का करतात ?

वयाच्या अकराव्या आणि पंधराव्या वर्षी प्रदीर्घ फटके सावरकर का लिहितात ? शब्दार्थाचे अलंकार त्यात का योजितात ? इतिहास, चरित्र, आत्मचरित्र, कादंबरी, नाटक – असे विविध वाङ्मयप्रकार तर लिहितातच, शिवाय फटका, पोवाडा, स्तोत्र, विलापिका, खंडकाव्य असे काव्यांतर्गत उपप्रकारही लीलया का लिहितात ? या लेखनात जुन्या वळणाची भाषा जशी आत्मविश्वासाने वापरतात, तशी नवी वळणे, नवे अलंकार यांचे वैभव ते भाषेला का देऊ बघतात ?

' बांधिलकी ' वाल्या बहुतेक लेखकांप्रमाणे ' वेडेवाकुडे गाईन ' या किमान प्रतिज्ञेवर न थांबता, साहित्यिक सौंदर्याची आराधना का करतात ?

सुरुवातीस म्हटल्याप्रमाणे या प्रश्नांचे अखेरचे उत्तर मिळणे कठीण आहे. छोट्याछोट्या पुराव्यांच्या तपशिलाचा डोंगर उभा करणे व त्या आधारे ' निष्कर्ष ' काढणे, अशी पद्धत असते. तीत धोका फार, असे मात्र वाटते. तपशिलात तत्त्व हरवणे किंवा हास्यास्पद होणे हा संभव अशा संख्यात्मक



पद्धतीत जास्त असतो. उदा. एखादी कविता नागपूर–दिल्ली प्रवासात न सुचता दिल्ली–नागपूर प्रवासात सुचली तर कविवर्यांना पहिल्यापेक्षा दुसरा प्रवास अधिक आवडत होता, असा निष्कर्ष निघणे अशक्य नाही. म्हणून हा सख्यात्मक मार्ग न वापरता अत.-प्रेरणेने प्रेरणा शोधण्याचा मार्ग येथे वापरला आहे.

¤

सावरकराचे एकूण साहित्य वाचता वाचता मनावर जो ठसा उमटत जातो तो त्यांच्या आत्मरत मनस्वी वृत्तीचा या वृत्तीला दुहेरी वेड होते एक वेड होते समर्थ हिंदूराष्ट्राचे दुसरे वेड होते भव्य भाषिक आकृतिबंधाचे पहिले वेड ही सकल्पना होती दुसरे वेड ही प्रतिमा होती.

या भाषिक प्रतिमेची अपरिहार्यता आपण समजू शकतो.

वय वर्षे आठ–दहा. घरात स्वदेशव्रताची परपरा. डोके उत्कट भावनेने गच्च भरलेले. कृतीची ओढ अनावर. दुसरी कोठलीही कृती अशक्य. मग, स्वत: सावरकरानीच लिहिल्याप्रमाणे, भाषा हीच कृती झाली.

वेदना भाषेत. चिंतन भाषेत आवेश भाषेत. महत्त्वाकांक्षा भाषेत. प्रतिज्ञा भाषेत. सारेच्या सारे स्वातंत्र्यप्रेमी अस्तित्व भाषेत आणि भाषारूप झाले.

अस्तित्व भाषारूप झाले की, माणसाचा साहित्यिक होतो सावरकराचे असेच झाले. त्याची निष्ठा हे त्याचे सपूर्ण अस्तित्व झाले. त्यांचे अस्तित्व हे स्वाभाविकच भाषारूप झाले. त्याची निष्ठा आणि त्याचे साहित्यिकत्व यात यामुळे अतराय आला नाही.

त्यांच्या 'उत्तरक्रिया' नाटकात एक वेडीचे पात्र आहे. ती एका प्रसंगी सावरकराचे मनोगत बोलते ती म्हणते :– 'वेड्या, मला दर्भ नकोत, दळभार हवेत ! एकेका व्यक्तीच्या उत्तरक्रियेला दर्भ पुरतील; पण एखाद्या पानपतच्या उत्तरक्रियेस दळभार लागतात दळभार !–दर्भ नव्हेत !'

"उत्तर दिशेस जिंकण्याची क्रिया ती उत्तरक्रिया' असे मानणाऱ्या सावरकरांना अकराव्या वर्षीच दळभार हवे होते. 'लेखण्या मोडा आणि बंदुका घ्या' असे संमेलनाध्यक्षपदावरून बजावणाऱ्या सावरकरांना दळभारच हवे होते; पण दुर्दैवाने ते नव्हते. म्हणून त्यांनी शब्दाचे दळभार उभे केले.

¤

समजा, सावरकराचे व्यक्तित्व स्वातंत्र्यकाळात जन्माला आले असते तर ? तर त्यानी आत्मतत्त्वाच्या आविष्कारासाठी भाषेऐवजी इतर साधने निवडली असती का ? ते रणधुरंधर सेनानी झाले असते का ? की पतप्रधान ? की राष्ट्राध्यक्ष ?

मला वाटते, सावरकर कोणीही झाले असते तरी एक गुण त्यांच्यात झळकत राहिलाच असता. तो गुण म्हणजे भाषेच्या विलोभनीय आविष्काराचा, सहजस्फूर्त वक्तृत्वाचा. कोणाचे तेज कशात, तर कोणाचे आणखी कशात. सावरकराचे सारे तेज त्यांच्या वाणीत होते. आतले अव्यक्त तेज वाणीत व्यक्तरूप धारण करीत असे म्हणून त्या व्यक्तरूपात आतील अव्यक्ताचा पछाडलेपणा आहे. 'कदाचित मी प्रेषित ठरेन, नाही तर वेडा,' या त्यांच्या उद्गारात हा पछाडलेपणा आहे.

त्यांची भाषा ही जशी पछाडलेपणाची, तसा त्याचा पछाडलेपणा भाषेचा होता. भाषा हा इतिहास भाषा ही संस्कृती. भाषा हीच परंपरा. भाषा हाच स्वाभिमान. भाषा हेच सर्वपरिपूर्ण व्यक्तित्व. भाषेच्या ह्या अनेकविध कळानी सावरकर पुरते मोहित झालेले दिसतात. या दिव्य आविष्कारद्रव्यावर स्वामित्व मिळविण्याची आकांक्षा त्याच्या लेखनात दिसते. आपले खरे अंतरंग जिवलगानाही कळणे दूर, मग मित्र व अनुयायी अतिदूर हे अतरंग फक्त एका भाषेला कळते असा त्यांचा विश्वास दिसतो.

या दृष्टीने भाषा हीच त्यांच्या अंतरंगाची सखी आहे. अदमानाच्या अंधारकोठडीत हीच सखी त्याना सोबत होती. एरवी एकाकीपणाचा अधार त्यांनी कसा सोसला असता ? पण त्यांच्या अंतरंगात हा भाषेचा अभंग दीप प्रज्वलित होता. या दीपाने तो अंधकार दूर केला इतकेच नव्हे, तर ती कोठडीच तेजाने भरून टाकली.

दोन जन्मठेपीची पन्नास वर्षे समजल्यावर उसळलेला सावरकरांचा भाषाकल्लोळ मुळातच वाचण्याजोगा आहे. एक वानगी पाहावी–

'वर्षे पन्नास ! अहा ! वर्षे पन्नास ही ! अहा ! वर्षे !

ध्वनि हा पुन:पुन्हाही मजवरि पाऊस की तसा वर्षे.'

ही शिक्षा कारागृहाधिपतीने कळविली, त्या वेळची दोघांची अवस्था अशी–

'अभ्यासकठोरहि ते हृदय तयाचे सखेद कळवळले !

परि हे स्मित मद्वदनावरुनी, श्रवणे, न लेश मावळले'

अशा अलिप्ततेने स्वानुभूतीकडे पाहता येत असल्याने, मग सावरकर जेव्हा कोठडीचो मापे काव्यात देतात तेव्हा खास आश्चर्य वाटत नाही. 'कमला' काव्य त्यानी पठण करून जतन करावे हे स्वाभाविक आहे असेच वाटते.

ही अलिप्तता तरी त्याना कशी साधली ? कारण वृत्तीने ते एका बाजूने आत्ममग्न तपस्वी होते, तर दुसऱ्या बाजूने आत्मरत, उसळते भाषाप्रभू होते. दोन्ही बाजूची अलिप्तता त्यांच्या ठिकाणी एकवटली होती.

सावरकरांचे मन म्हणजे एकाच स्वप्नाने भारलेल्या असख्य स्वप्नाची फुलबाग होती. यातले एकेक स्वप्न प्रत्यक्षात फुलावे असा त्याचा ध्यास होता या दृष्टीने ते साधक व तपस्वी होते. व्यावहारिक जगण्यापेक्षा संकल्पनात्मक जगणे हे सावरकराचे खरे जगणे होते. जे जे सकल्पनात्मक ते ते व्यवहारात आणण्याचा त्यानी जिद्दीने आयुष्यभर प्रयत्न केला. त्याचे आमरण प्रायोपवेशन आणि नंतरच्या पारपरिक सस्काराना त्यानी दिलेला ठाम नकार ही त्याच्या या प्रयत्नाची दोन उज्ज्वल उदाहरणे आहेत.

तथापि, सावरकराचे सारे संकल्पनात्मक जीवन व्यवहारात आले नाही. तसे ते येणे शक्यही नव्हते. अशा संकल्पनात्मक जीवनाचे सावरकरानी गाणे केले. हे गाणे म्हणजे त्याचे अंतरगातले खरे जगणे होते. 'जगन्नाथाचा रथोत्सव', 'सागरास', 'मूर्ति दुजी ती' किंवा 'सिंहगडाचा पोवाडा' ही त्याच्या मनातली गाणी म्हणजे त्याच्या मनातले खरे जगण्याचे क्षण. पुढे पुढे हे क्षणही दुर्मिळ झाले. आपली स्वप्ने व्यवहारात येत नाहीत, हे कळून नंतर नंतर सावरकराना भव्य उदासी आली होती. पहिली पहिली अदम्य आशेची गाणी त्यानी गायिली. नंतरच्या, उदासीची गाणी मात्र त्यानी गायिली नाहीत त्यानी अधिकाधिक मौन स्वीकारले. या अर्थाने आधीचा क्रातिकारक, कवी, नेता नंतर निष्काम मुनी झाला ! या मौनातील त्याचे अत:स्वसिते कवितारूप झाली असती तर अधिक महान असे काव्य निर्माण झाले असते.

मला वाटते, सावरकराच्या साहित्यिक प्रेरणेशी आपण येऊन पोहोचलो. भाषारूप संकल्पनात्मक जगणे हे सावरकराचे खरे जगणे होते. तीच त्याची मूळ साहित्यिक प्रेरणा होती ! □



# औदुंबर आळीपासून सारसबागेपर्यंत

**वि. स. वाळिंबे**

बरोबर एक वर्षापूर्वीची गोष्ट. असाच मे महिन्याचा पहिला पंधरवडा होता. 'मॅजेस्टिक'च्या गच्चीवर साहित्यिक गप्पांमधील एकेक कार्यक्रम साजरा होत होता. त्या दिवशी कोणता कार्यक्रम होता हे आज आठवत नाही; पण एवढे आठवत आहे की, त्या कार्यक्रमाला गर्दी कितपत होईल यासंबंधी केशवराव कोठावळे साशंक होते; पण तसे झाले नाही नेहमीसारखीच गर्दी झालेली होती. गच्ची श्रोत्यांनी फुलून गेली होती. 'गप्पां'चे ते दहावे वर्ष होते. त्या दिवशी जयवंत दळवी आलेले होते. केशवराव त्यांना या 'गप्पा'च्या दहा वर्षांतल्या आठवणी सांगण्यात रंगून गेले होते. बोलण्याच्या ओघात अनेक विषय येऊन गेले. जयवंत दळवींनी त्यांना सुचवले, "केशवराव, पुढच्या वर्षी तुमची षष्ठ्यब्दी-पूर्ती आहे. त्या निमित्तानं तुम्ही आत्मचरित्र लिहा.'

केशवरावांनी म्हटले, 'बघू या.'

त्यानंतरचे काही दिवस केशवरावांच्या मनात आत्मचरित्राचा विचार घोळत राहिला.

आम्ही दोघे सकाळी फिरायला जात असू.

त्या काळात केशवराव आपल्या पूर्व-जीवनासंबंधी बरेच काही बोलत असत. एके दिवशी ते म्हणाले, 'मी माझ्या वडिलांच्या फिरत्या हॉटेलापासून आत्मकथेचा प्रारंभ करायचं ठरवलं आहे.'

मला वाटते त्यांनी त्या पहिल्या प्रकरणाचे कच्चे टिपणही लिहून काढले होते. या आठवणी सांगण्यात महिना निघून गेला.

१५ जून उजाडला.

केशवरावांनी व्यावसायिक जीवनाला प्रारंभ केल्याला त्या दिवशी चाळीस वर्षे पूर्ण होत होती. त्या दिवशीच्या वर्तमानपत्रात 'मॅजेस्टिक बुक स्टॉल'ची जाहिरातही प्रसिद्ध झालेली होती—'औदुंबरच्या छायेतील चाळीस वर्षे'

म्हणून मी त्यांना त्या दिवशी सुचवले, "आजचा दिवस तुमच्या दृष्टीनं संस्मरणीय आहे; म्हणून तुम्ही आत्मचरित्राच्या लेखनाला आजच प्रारंभ करा. म्हणजे ते पुढच्या २१ मे रोजी प्रकाशित करता येईल."

केशवरावांनी सांगितले, "मी तो विचार बाजूला सारला आहे."

"का?"

"आत्मचरित्राचं लेखन नीटसं जमेल असं वाटत नाही म्हणून."

केशवरावांच्या या मनमोकळ्या उद्गारा-तच, मला वाटते, त्यांना प्रकाशक म्हणून लाभलेल्या यशाचं रहस्य आहे.

केशवराव प्रकाशक होण्याआधी लेखक होते.

हे मला पूर्वी माहीत नव्हते.

त्यांनीच हे केव्हा तरी आमच्या औदुंबर-

आळीपासून सारसबागेपर्यंतच्या फिरण्यात अलीकडे सांगितले होते

केशवरावांचे फारसे शिक्षण झालेले नव्हते.

परिस्थितीमुळे ते अर्धवटच सोडावे लागले होते.'

नतरचा त्याचा काही काळ नको त्या संगतीत गेला.

बहकून जाण्याचे ते वय होते.

पण त्या अवखळ वयातही केशवरावांनी स्वत ला सावरले आणि मध्यंतरीच्या काळात लाभलेल्या संगतीकडे निर्धारपूर्वक पाठ फिरवून नव्या जीवनाला प्रारभ केला. रद्दीत मिळणारी जुनी पुस्तके विकत घेऊन ती फूटपाथवर माडायची. आण्या–दोन आण्याला विकायची. त्या अपुऱ्या उत्पन्नावर कसाबसा उदरनिर्वाह करायचा दिवसभर उन्हातान्हात उभे राहून एका वेळच्या जेवणापुरते पैसे सुटले तरी खूप झाले, असे वाटावे असा तो त्याच्या जीवनातला काळ होता. जेवणापुरते पैसे हातात आले नाहीत तर चहा पिऊन भूक भागवावी लागे.

गेल्या वर्षी काही कामासाठी केशवरावांबरोबर मी मुंबईला गेलो होतो केशवरावानी आवर्जून मला तो गिरगावातला फूटपाथही दाखवला आणि नंतर दादर रेल्वेस्टेशनासमोरचा फूटपाथही-केशवरावानी काही रात्री त्या फूटपाथवर झोपून काढल्या होत्या. पोलिस दंडा आपटत केव्हा उठवेल याचा नेम नसायचा. त्याने उठवले तर जवळपासच्या एखाद्या चाळीतल्या जिन्याखाली जाऊन उरलेली झोप पुरी करायची.

पुढे केशवरावाची ही अस्थिर अवस्था संपली. मॅजेस्टिक सिनेमालगत एक लहानसे दुकान मिळाले. त्याचे मासिक भाडे होते पंधरा–वीस रुपये तीन महिन्याचे भाडे भरले की ती जागा मिळणार होती; पण तेवढी रक्कम उभी करायलाही केशवरावांना त्या काळात खूप प्रयास पडले.

केशवरावांचे हे प्रारंभीचे दिवस जयवंत दळवीनी, दुरून का होईना, पाहिले होते. म्हणून त्यानी केशवरावाच्या आत्मचरित्राला नाव सुचवले होते– 'रस्त्यावरचा माणूस.'

कसल्याही पूर्वपुण्याईचे बळ न लाभलेल्या एका व्यक्तीची फूटपाथवरच्या पसाऱ्यापासून विशाल वास्तूवरच्या गच्चीपर्यंतच्या कार्यकर्तृत्वाची कहाणी शब्दबद्ध व्हावी, हा हे आत्मचरित्र लिहिण्याची सूचना करण्यामागचा दळवीचा हेतू होता.

परवाच दळवी मला म्हणाले, 'अगदी सामान्य परिस्थितीतून सुरुवात करून इतकं वैभव संपादन केल्याचं दुसरं उदाहरण माझ्या पहाण्यात नाही.'

केशवरावानाही आपल्या या कर्तृत्वाचे भान होते

आणि त्याचबरोबर. त्याच्याकडे काहीशा अलिप्ततेने पाहण्याचीही जाण होती.

म्हणूनच तर त्यानी आत्मचरित्र लिहिण्याचा विचार मनाआड केला.

का ?

नीटसे जमणार नाही म्हणून.

केशवरावांनी सुरुवातीच्या काळात मुलासाठी पाच–सहा पुस्तके लिहिली होती.

आपण लेखक व्हावे असे त्यांना त्या काळात तीव्रतेने वाटत होते.

परंतु केशवराव चांगले वाचक होते.

त्यांनी स्वत.ची पुस्तके वाचकाच्या अलिप्ततेने वाचली आणि त्यांचे त्यांनाच कळून आले की, चांगला लेखक व्हायची क्षमता आपल्यात कमी आहे.

ही उणीव त्यांनी चांगल्या पुस्तकांचे प्रकाशक होऊन भरून काढली.

केशवराव प्रकाशनाकडे वळले ते असे.

त्याचबरोबर पुस्तक–विक्रीचा अनुभवही आधाराला आलेला होता.

त्यामुळे प्रकाशनासाठी पुस्तके निवडताना केशवराव केवळ स्वतःच्या आवडी-निवडीचा विचार करीत नसत. ग्राहकही त्यांच्या डोळ्यांपुढे असे.

म्हणूनच गुणवत्ता आणि वाचनीयता यांचा एक सुरेख सुवर्णमध्य त्यांनी शोधून काढला.

केशवराव नेहमी म्हणत असत, 'लेखन कसं बहारदार आणि भरगच्च असलं पाहिजे!'

त्यांच्या या म्हणण्याचा अर्थ असा की; कथा असो, कादंबरी असो, लेखनप्रकार कोणताही असो, तो वाचल्यावर आपण काही तरी कसदार वाचलं असा वाचकाला आनंद लाभला पाहिजे.

मॅजेस्टिक बुक स्टॉलच्या प्रकाशनविभागासाठी पुस्तके निवडताना केशवरावाची ही दृष्टी असे. ते दिवाळी अंक बारकाईने वाचत ते याच हेतूने आणि त्यातल्या एखाद्या नवोदित लेखकाची कथा वा कादंबरी आवडली की, ते पुस्तक, तो लेखक आपल्या प्रकाशनासाठी लाभला पाहिजे यासाठी ते जागरूक प्रयत्न करीत असत.

यातूनच त्याचे ग्रंथप्रेमी मंडळ सिद्ध झाले.

आणि या ग्रंथप्रेमी मंडळाची प्रत्यक्ष फलश्रुती म्हणजे केशवरावांनी वीस वर्षांपूर्वी सुरू केलेले ललित मासिक.

ग्रंथप्रेमी मंडळाच्या एका सहलीतच या मासिकाची रूपरेषा ठरली.

ग्रंथप्रसाराला चालना देणे हे या मासिकाचे नियतकार्य असल्यामुळे त्याचे नावही तसेच भारदस्त असले पाहिजे असे काही मित्रांनी सुचविले.

केशवरावांनी नाव मुक्रर केले ते सोपे आणि सुटसुटीत.

कारण त्याना आपले हे मासिक केवळ साहित्यिकांपुरते सीमित न ठेवता साहित्यरसिकापर्यंत पोहोचवावयाचे होते.

पुस्तकाच्या नावामागेही त्यांचा हाच दृष्टिकोन असायचा. पुस्तकाच्या अंतरंगात काय आहे याचा वाचकाला चटकन बोध व्हावा असे त्याचे शीर्षक असले पाहिजे असे ते म्हणत असत.

वाचनीयतेच्या या किमान अपेक्षेबरोबरच पुस्तकाच्या गुणवत्तेचाही केशवराव विचार करीत असत. केवळ खप हा निकष त्यांनी कधीच मानला नाही. केशवरावाच्या मित्रपरिवारात असे काही लेखक होते की, त्यांची पुस्तके चागली खपत असत; पण ती पुस्तके आपल्याकडे प्रकाशनासाठी यावीत असे केशवरावाना कधीही वाटले नाही.

स्वतःला आवडणारी पुस्तकेच प्रकाशित करायची हे बंधन केशवरावानी स्वतःहून पत्करले होते

यामध्ये काही वेळेला धोका असायचा.

पण तो स्वीकारायला त्यांची तयारी होती.

पुन्हा एकदा जयवंत दळवीचा उल्लेख करायला हवा– त्यांच्या 'चक्र' या कादंबरीच्या संदर्भात.

मुंबईतल्या झोपडपट्टीमधल्या जीवनावर आधारलेली आपली ही कादबरी, तिच्यातल्या काही शब्दप्रयोगामुळे, अश्लील ठरेल की

काय अशी दळवींना भीती वाटत होती. दळवींनी ही कादंबरी ज्या वेळी लिहिली तो संस्कृतिरक्षकांच्या आडदांडपणाचा काळ होता. 'असल्या लेखकांना आम्ही तुरुंगात धाडू!' अशी भाषा हे संस्कृतिरक्षक उच्चारत होते.

म्हणून दळवींनी असे ठरवले की, ही कादंबरी प्रकाशित करण्याचा धोका पत्करण्याऐवजी, चक्रमुद्रित करून त्या प्रती मित्रमंडळीत वाटायच्या

ही कादंबरी केशवरावांच्या वाचनात आली. त्यांना ती आवडली आणि म्हणून त्यांनी परिणामाची पर्वा न करता प्रकाशित केली. पुढे तिला यश लाभले ही गोष्ट वेगळी; पण ती प्रकाशित करीत असताना कदाचित आपल्याला न्यायासनासमोर खेचले जाईल ही संभाव्यता केशवरावांना नजरेआड करता येत नव्हती.

'चक्र' ने केशवरावांना एक चांगला लेखकही मिळवून दिला आणि एक सच्चा स्नेहीही.

केशवराव कोठावळे आणि जयवंत दळवी यांच्यातला हा स्नेहबंध दृढ केला तो 'ललित' मासिकाने. 'ललित'च्या लोकमान्यतेत दळवींच्या 'ठणठणपाळ'चा वाटा मोठा आहे. या मासिकाच्या वेगळेपणामुळे ते कितपत यशस्वी होईल यासंबंधी केशवराव सुरुवातीला साशंक होते; पण या मासिकाचा पहिलाच दिवाळी अंक केशवरावांच्या अपेक्षेपेक्षा किती तरी अधिक प्रमाणात गाजला आणि केशवराव याचे श्रेय नि:संकोचपणे त्या अंकातल्या ठणठणपाळाच्या मिष्किल लेखाला देत असत.

'ललित' निघण्यापूर्वी परचुरे प्रकाशन मंदिराच्या वतीने 'परचुरे' हे असेच साहित्यविषयक मासिक प्रसिद्ध होत असे.

दळवींचे 'ठणठणपाळ' हे सदर प्रथम अवतीर्ण झाले ते त्या मासिकात.

म्हणून मला असे वाटत होते की, दळवींचे ते लिखाण वाचून केशवरावांनी 'ललित'-साठी ही कामगिरी त्यांच्याकडे सोपवली असावी.

परंतु वस्तुस्थिती वेगळी होती.

अलीकडेच केशवरावांच्या बोलण्यातून ती मला समजली होती.

'परचुरे' मासिकाला असे साहित्य-साहित्यिकविषयक टीकाटिप्पणी करणारे सदर हवे होते मासिकाच्या संचालक-संपादकांनी त्या दृष्टीने शोध सुरू केला. त्यांच्यापैकी कोणी तरी केशवरावांपाशी हा विषय काढला तेव्हा केशवरावांनीच दळवींचे नाव सुचवले.

ठणठणपाळ ही आपली 'डिस्कव्हरी' आहे असे केशवराव अभिमानाने म्हणत ते त्यामुळे.

केशवरावांनी 'ललित'चे आस्थेने संगोपन केले-प्रसंगी आर्थिक झीज सोसूनही!

'ललित'ने केशवरावांना आगळीवेगळी प्रतिष्ठा मिळवून दिली.

'ललित' ही केशवरावांच्या मर्मबंधातली ठेव झाली.

आम्ही सारसबागेत गेल्यावर तेथे काही वेळ बसत असू. अशा वेळी एखाद्या अपरिचिताने केशवरावांशी येऊन 'मी तुमच्या 'ललित'चा वाचक आहे' असे सांगितले की, केशवरावांना धन्यधन्य वाटायचे.

ते त्याला सांगायचे, 'ललित मधले काय आवडतं, काय आवडत नाही हे अवश्य कळवत जा.'

'ललित'ने केशवरावांचा लोकसंग्रह खूपच व्यापक केला

आणि त्यांच्या या संग्राहक वृत्तीला बळ पुरवले ते साहित्यिक गप्पांनी.

केशवरावांनी आर्थिक सुस्थिती लाभल्यानंतर पुण्यात आपली वास्तू उभारली. ती त्यांना केवळ निवासासाठी नको होती. केशवरावांना ग्रंथप्रकाशनाइतकीच ग्रंथप्रसाराबाबत आस्था होती. त्यांच्यातला मूळचा ग्रंथविक्रेता सदैव जागा असायचा. त्यामुळे आपल्या या (वास्तूत-"मॅजेस्टिक" मध्ये-एक विशाल विक्रीकेंद्र निर्माण व्हावे अशी त्यांची मनीषा होती; पण त्यात एक अडचण होती. शनिवार पेठेतली ही जागा आडवाजूला होती. त्यामुळे ग्राहकांचे तेथे वळण कसे निर्माण होणार हा प्रश्न भेडसावत होता. केशवराव विचार करू लागले. त्यातून त्यांना एक कल्पना सुचली. महिन्यातल्या एका रविवारी सकाळच्या वेळी त्यांनी त्या वास्तूत साहित्यिक गप्पा सुरू केल्या. हा उपक्रम सुरुवातीला काही महिने चांगला चालला; पण पुढे उपस्थितांची संख्या ओसरू लागली. यातून केशवरावांना मार्ग काढायचा होता. महिन्यातून एक वेळा ही पहिली कल्पना त्यांनी सोडून दिली आणि त्याऐवजी मे महिन्यात सतत पधरा दिवस साहित्यिक गप्पा आयोजित करण्याचा मनोदय मित्रांपाशी बोलून दाखवला.

पहिल्या वर्षीच्या गप्पा खालच्या मजल्यावरच्या हॉलमध्ये झाल्या कविवर्य अनिलांच्या काव्यवाचनाने या उपक्रमाची मुहूर्तमेढ रोवली गेली. त्या वर्षी आणखीही काही कार्यक्रम झाले. सर्वच कार्यक्रमांना संयोजकाचा उत्साह वाढावा अशी गर्दी होत गेली आणि पुढच्या वर्षापासून तो हॉल अपुरा पडू लागला. खालच्या हॉलमध्ये प्रवर्तित झालेल्या या गप्पा गच्चीवर केव्हा गेल्या हे समजलेच नाही.

पुण्यातला एक प्रमुख सांस्कृतिक सोहळा असा या उपक्रमाला गौरव लाभला.

या 'गप्पां'मधूनच आता सर्वत्र रूढ झालेला प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम आकाराला आला.

पहिली प्रकट मुलाखत घेतली गेली ती कविवर्य ग. दि. माडगूळकरांची आणि तेव्हापासून प्रकट मुलाखती हे या गप्पांचे प्रमुख आकर्षण ठरले. दरवर्षी चार-पाच तरी प्रकट मुलाखती होऊ लागल्या म. म. द. वा पोतदार, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी नानासाहेब गोरे, जितेन्द्र अभिषेकी, जयंत नारळीकर, विष्णुपंत जोग-विविध क्षेत्रातल्या अनेक मान्यवर व्यक्तींचे वेगवेगळ्या विषयांवरचे विचार या साहित्यिक गप्पांच्या अनौपचारिक व्यासपीठावरून श्रोत्यांना अगदी जवळून ऐकायला मिळाले

हा गप्पांचा कार्यक्रम साधारणत: सात वाजता सुरू होत असे. सहा-साडेसहा वाजेपर्यंत केशवराव अस्वस्थ असत. आज कितपत गर्दी होईल या शंकेने ते कासावीस झालेले दिसत. लोक येऊ लागले, गच्चीवरची उपस्थितांची संख्या वाढू लागली की, केशवरावांची ही बेचैनी ओसरू लागे आणि सारी गच्ची भरून गेलेली आहे हे कोणी तरी खाली येऊन सांगितले की, केशवरावांच्या खुषीला पारावार रहात नसे.

वरती तुडुंब गर्दी, पण केशवराव मात्र नेहमी खालच्या मजल्यावरच्या हॉलमध्येच बसलेले असत. नंतर आलेल्यांचेही तेथे स्वागत होत असे. सुरुवातीला आग्रहाने चहापान होई, बिस्किटांची बशी सर्वांपुढून फिरे

आणि कार्यक्रम आटोपल्यानंतर सरबताचे पेले पुढे येत. या स्वागतात उपचार नसे, व्यवहार नसे. साहित्यिक आणि साहित्यरसिक यांचे स्वागत करण्यात अंत:करणापासून आनंद मानण्याचा स्वभावविशेष घेऊनच हा गृहस्थ जन्माला आलेला असला पाहिजे हे त्या वेळी प्रकर्षाने जाणवे.

या गप्पांनंतर एके दिवशी भोजनाचा कार्यक्रम होई. केशवराव साधारणत: हा कार्यक्रम २१ तारखेला ठेवत. कारण तो त्यांचा जन्मदिन होता; पण ही गोष्ट ते इतरांना सांगत नसत. कारण, दुसऱ्यांकडून स्वत:चा सत्कार करून घेण्यात त्यांना कमालीचा संकोच वाटत असे.

एके वर्षी तर भलताच प्रसंग ओढवला. ज्या दिवशी हा भोजनाचा कार्यक्रम ठरवलेला होता त्या दिवशीच सकाळीच केशवरावांच्या छातीत दुखू लागले. ते डॉक्टरांकडे गेले. डॉक्टरांनी त्यांना रुग्णालयात दाखल व्हायला सांगितले. आजाराचे स्वरूप गंभीर होते. केशवराव ताबडतोब रुग्णालयात दाखल झाले. तेथल्या विशेष उपचार विभागात त्यांच्यावर उपचार सुरू झाले; परंतु केशवरावांनी रुग्णालयात जाण्यापूर्वी घरच्या मंडळींना सांगितले होते, ' मी रुग्णालयात दाखल झालेलो आहे हे निमंत्रितांपैकी कुणालाही सांगू नका. नाही तर त्यांना भोजन नीट जाणार नाही. सगळ्यांचं नेहमीसारखंच स्वागत झालं पाहिजे. सगळ्यांना नेहमीसारखाच आग्रह झाला पाहिजे ! '

केशवराव रुग्णालयात हृदयविकाराशी झगडत होते आणि आम्ही निमंत्रित मॅजेस्टिकच्या गच्चीवर आंबरसाचा आस्वाद घेण्यात दंग होऊन गेलेलो होतो.

मला हे दुसऱ्या का तिसऱ्या दिवशी कळले. केशवरावांना भेटायला गेलो मी त्यांना त्यांच्या प्रकृतीसंबंधी विचारत होतो. ते मला विचारत होते, ' परवाचं जेवण नेहमीसारखं झालं ना ? '

केशवराव मला त्या दिवशी खूपच मोठे वाटले.

पुढे ते अमेरिकेला जाऊन आले, पण ही बातमी त्यांनी कोठेही येऊ दिली नाही. अगदी 'ललित'मध्ये देखील. जाताना निरोपसमारंभ नाही, आल्यावर स्वागतसमारंभ नाही, काहीही नाही. मित्रांकडे तेवढे जाऊन आले, तेही त्यांचे मन मोडवेना म्हणून.

स्वत:चे अगदी रास्त कौतुक करून घेणेही केशवरावांना कधी जमलेच नाही.

या वर्षी त्यांची प्रकृती बरी नव्हती.

तरीही साहित्यिक गप्पांच्या वेळचा त्यांचा उत्साह नेहमीसारखा होता.

साहित्यिक गप्पांचा केशवरावांवरही एक चांगला परिणाम घडून आलेला होता.

ते अलीकडे आपली मते स्पष्ट शब्दांत व्यक्त करायला लागले होते.

या संदर्भात मला दोन प्रसंग आठवतात.

पहिला प्रसंग आहे पुण्यात भरलेल्या साहित्यसंमेलनाच्या वेळचा.

या संमेलनाच्या अध्यक्षपदी पु. भा. भावे यांची निवड झाली होती. केशवराव आणि भावे यांचे संबंध तसे फार घनिष्ट नव्हते. तरीही भावे यांच्या अध्यक्षतेखाली भरलेले संमेलन उधळले गेले तेव्हा नुसते केशवराव कष्टीच झालेले नव्हते, संतापलेही होते.

परतताना ते या एकाच विषयावर पोटतिडिकीने बोलत होते, ' भावे हे बहुमतानं निवडून आलेले आहेत. म्हणून त्यांचा मान राखायलाच हवा होता. भावे यांची निवड ज्यांना मान्य नव्हती त्यांनी पाहिजे तर संमेलनावर बहिष्कार टाकायचा होता; पण साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षांची त्यांनी अशी अप्रतिष्ठा करायला नको होती. संमेलन मोडणाऱ्या मंडळींना हे शोभलं नाही. वेळी-अवेळी मनगटशाहीविरुद्ध पत्रकं काढणाऱ्यांनीच मनगटशाहीचं हे असं प्रदर्शन घडवावं हे निदान मला तरी मान्य नाही ! '

हे केशवरावांचे केवळ त्या वेळचे मत होते असे नाही.

पुढे केव्हाही पुण्याच्या साहित्यसंमेलनाचा विषय निघाला की, केशवराव आपले हे मत आग्रहपूर्वक नोंदवत असत.

दुसरा प्रसंग आहे मुंबईला भरलेल्या स्वतंत्र साहित्यसंमेलनाच्या बाबतीतला.

हे स्वतंत्र साहित्यसंमेलन भरविण्यात ज्यांचा पुढाकार होता त्यात जयवंत दळवी हे एक प्रमुख होते. दळवी केशवरावांचे अगदी जवळचे स्नेही. तरीही केशवरावांना ही स्वतंत्र साहित्यसंमेलनाची कल्पना रुचलेली नव्हती.

हे संमेलन शनिवारी संध्याकाळी सुरू होणार होते. सकाळी अकरा वाजता आम्ही मोटारीने निघाले. गाडीत आणखी एक


केसांचे सौंदर्य वाढविण्यासाठी शास्त्रशुद्ध रीतीने बनवलेले आयुर्वेदिक तेल

शकुंतला हेअर ऑईल

केस नैसर्गिकरित्या काळे होतात.
केस गळणे थांबते.
केसांत कोंडा होत नाही.
डोके थंड राहून शांत झोप लागते.




विजयश्री प्रॉडक्टस्
सुंदरबाग इस्टेट लालबहादूर शास्त्री मार्ग
कुर्ला, मुंबई ४०० ०७० टेलिफोन: ५१२१३१४

VISION 801

स्नेही होते. मोटार त्यांचीच होती. मी त्या स्नेह्याना गमतीने म्हणालो, 'केशवरावाना मान्य नसलेल्या समेलनाला आपण निघालो आहोत !'

त्यासरशी केशवराव उसळून म्हणाले; 'खरंच आहे ते साहित्यसंमेलनाच्या व्यासपीठावर मंत्र्यांचा वरचष्मा नको हे मलाही मान्य आहे; परंतु त्यासाठी स्वतंत्र साहित्य संमेलन भरवणं हा मार्ग नव्हे' कारण त्यामुळे आपण एका परंपरेवर आघात करत आहोत. महामंडळाच्या वतीने आयोजित केल्या जाणाऱ्या समेलनांना परंपरा आहे. ती मोडली जाता कामा नये. म्हणून ती संमेलने शासनाच्या लाचारीपासून दूर रहातील असा आपण प्रयत्न करायला हवा !'

अलीकडे केशवराव महाराष्ट्र साहित्य-परिषदेच्या कार्यकारिणीवर निवडून गेले होते. तेथून ते महामंडळावर गेले. केशवरावानी या निवडणुका लढवाव्यात याचे अनेकाना आश्चर्य वाटले. केशवराव त्याना सांगत,'समेलनं कशी असावीत हे सागणाऱ्याची तिथं जाऊन भाग घेण्याची, आपले विचार माडण्याची जबाबदारी आहे, असं मला वाटतं. ती जबाबदारी मला नीट पार पाडता आली नाही तर मी महामंडळाची जागा आपण होऊन सोडून देईन !'

अंबाजोगाई येथल्या साहित्य समेलनाला केशवराव उपस्थित राहिले ते याच जबाबदारीच्या जाणीवेपायी. एरवी एवढा प्रवास आणि दगदग करावी अशी त्याची त्या वेळी तब्येत नव्हती.

तेथून आल्यावर त्याच्या प्रकृतीची तक्रार आणखीच वाढली.

रक्तदाब स्थिर रहात नसे. एकदम खालीवर व्हायचा.

हे असे का होत आहे याचे निदान होईना तेव्हा केशवराव घाबरले.

पूर्वी त्याना दोनदा हृदयविकाराचे झटके येऊन गेले होते; पण केशवराव त्या गंभीर आजारातही हसतमुख होते.

आताही ते हसत असत–पण कष्टपूर्वक !

९ मार्चची गोष्ट.

सकाळी दहाच्या सुमाराला मी त्याच्याकडे गेलो होतो. आधी सगळे ठीक होते; पण एकदम त्याना घाम यायला लागला. ते खुर्चीवरून उठले आणि आतल्या खोलीत जाऊन पहुडले. मी डॉक्टराना बोलावून घेतले. थोड्या वेळाने केशवरावांना बरे वाटू लागले. एवढ्यात एक गृहस्थ भेटायला आले. केशवराव झोपलेले आहेत हे पाहून त्या गृहस्थांनी विचारले, 'प्रकृती बरी नाही वाटतं?'

'हार आणायची वेळ आली होती !' केशवराव हसत उद्गारले; पण ते नेहमीचे दिलखुलास हसू नव्हते. त्यात विषण्णता दाटून आलेली होती.

मनात ही विषण्णता बाळगतच त्यांनी या वर्षीच्या साहित्यिक गप्पांची पूर्वतयारी आरंभली होती.

केशवरावाच्या दृष्टीने हे वर्ष महत्त्वाचे होते.

एक तर २१ मे रोजी ते एकसष्टाव्या वर्षात पदार्पण करणार होते.

त्यांच्या स्वतःच्या दृष्टीने दुसरी गोष्ट अधिक महत्त्वाची होती.

ग्रंथप्रेमी मंडळाच्या स्थापनेला वीस वर्षे पूर्ण होत होती.

म्हणून या मंडळाच्या संस्थापक–सदस्यानी पुण्याच्या साहित्यिक गप्पा आटोपल्या की, या वर्षी मुबईला असाच कार्यक्रम साजरा करण्याचा घाट घातला होता.

पण ते सारे तसेच राहिले.

मैफल उधळली गेली

पुण्यातल्या गप्पाही जेमतेम चारच दिवस झाल्या.

२ मे रोजी व पु. काळे याच्या प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम झाला. त्या दिवशी श्रोत्याची तुडुब गर्दी झालेली होती. त्यामुळे त्या दिवशी केशवरावाशी बोलता आले नाही. म्हणून त्याना भेटण्यासाठी दुसऱ्या दिवशी सकाळी गेलो. मी त्याना त्याच्या प्रकृतीच्या संबधात विचारत होतो ते मला सागत होते, 'काल या वास्तूत दोन हजार साहित्यरसिक जमलेले होते '

साहित्यिक आणि साहित्यरसिक यांच्या आगमनाने 'मॅजेस्टिक' ही वास्तू सतत गजबजती रहावी याशिवाय केशवरावाना दुसरे काही फारसे नको असायचे.

ही वास्तू त्यानी ज्या आळीत बांधली आहे तेथे औदुबराची बरीच झाडे आहेत. म्हणून केशवरावानी महापालिकेच्या अधिकाऱ्याना सागून त्या आळीचे औदुबरआळी असे नामकरण करून घेतले.

याला आणखीही एक कारण होते.

त्यांच्या मुंबईतल्या मॅजेस्टिक बुक स्टॉलच्या पाठीमागेही औदुबराचे झाड होते.

त्या औदुबराच्या छायेत केशवराव वाढले; मोठे झाले.

म्हणून त्या वृक्षासंबंधी, त्याने पुरविलेल्या प्रेमळ सावलीसबंधी केशवरावांना कृतज्ञता वाटत असे.

पण ती व्यक्त करणे मुबईला जमण्यासारखे नव्हते. केशवरावानी तो सकल्प पुण्यात पुरा केला.

'मॅजेस्टिक'चा पत्ता लिहिताना 'औदुंबरआळी' हे लिहायला ते कधीही विसरत नसत.

केशवराव एरवी मितभाषी असत; पण आमच्या सकाळच्या फिरण्याच्या वेळी ते खूप मोकळे होत. हे फिरणे हा त्याचा मोठाच विरंगुळा असायचा.

गेला महिनाभर या फिरण्यात त्यांच्या अस्वास्थ्यामुळे खड पडला होता.

४ मे रोजी मी पुण्यात नव्हतो.

३ मे रोजी मी त्यांना विचारले होते; 'आपलं फिरणं पुन्हा सुरू करायचं ?'

'मी मुबईहून परतलो की. तोपर्यंत नक्कीच बरं वाटायला लागेल.'

५ मे रोजी संध्याकाळी मी पाहिला तो, हॉस्पिटलच्या आतल्या खोलीतल्या कॉटवर पडलेला केशवरावाचा निश्चेष्ट पार्थिव देह.

केशवराव दुसऱ्याच प्रवासाला निघून गेले होते–कोणाला काहीही कल्पना न देता.

बाबुराव इनामदार गेले तेव्हा केशवरावानी लिहिले होते, 'बाबुरावाशिवायचे पुणे मला नेहमीच उणे वाटत रहाणार आहे.'


केशवरावाच्या मित्रांनाही आता हेच दुःख उरी बाळगावे लागणार आहे.

श्री. दत्तप्रसाद दाभोळकर यांनी लिहिलेल्या गोंडा जिल्ह्यातील विकासकार्याची माहिती देणारे तीन लेख गेल्या महिन्यातील तीन वासंतिक अंकांत प्रसिद्ध झाले. या कामापासून प्रेरणा घेऊन महाराष्ट्रात बीड येथेही ग्रामोदयाचे काम सुरू झाले आहे म्हणून वरील तीन लेखांना जोडून गोंडा ते बीड हा लेख गेल्या अंकात आला. या अंकात त्या लेखाचा पुढील भाग व विषय समाप्त.

( उत्तरार्ध )

● **बंडू ठाणेकर** ●

# गोंडा ते बीड



## चार

—उक्तीप्रमाणे वागून नानाजी देशमुखांनी साठाव्या वर्षी राजकारण सोडलं. सर्व पक्षांचे लागेबांधे तोडले आणि निरपेक्ष समाजसेवेला वाहून घेतलं गोंडा जिल्हा निवडून त्या जिल्हयाच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प सोडला. संकल्पपूर्तीसाठी अव्याहत झटून एक आदर्श निर्माण केला. एवढा प्रभावी की, त्या आदर्शाचं कौतुक पक्षीय, राष्ट्रीय सीमा ओलांडून दूर–दूरहून होऊ लागलं जागतिक बँक, रिझर्व बँक ह्यांच्याकडून गोंडामधल्या परिवर्तनाची दाद मिळाली. संघीय नानांवरचा रोष विसरून इंदिरा काँग्रेस पक्षानेही त्यांच्या कार्याची मुक्तकंठाने स्तुती केली. संघावर कायम आगपाखड करणारे ब्लिट्झकार करजियाही गोंडा जिल्हयातल्या प्रयोगाने भारावून गेले. गोंडा जिल्हयात नानाजी देशमुख व त्यांच्या दीनदयाळ शोधसंस्थेने केलेल्या कार्याचं सविस्तर वर्णन माणूस वासंतिक अंक–मालिकेतल्या पहिल्या तीन अंकांत आलेच आहे. त्या यशाने प्रोत्साहित होत संस्थेने प्रत्येक राज्यात एक एक जिल्हा निवडून काम करायचा संकल्प सोडला आहे. त्यानुसार ईशान्येकडल्या सिंगभूम व सुंदरबन जिल्हयांत काम चालू झालं आहे, तर महाराष्ट्रात बीड जिल्हा संस्थेने निवडावा अशी सूचना पू. विनोबांनी नानाजींना केली होती म्हणतात; **पण** वर्धा जिल्हयाची ह्याआधीच कांग्रेसवाल्यांनी वाट लावली आहे असं सांगून संस्थचे महाराष्ट्रातले कार्यकर्ते श्री. के. डी. (कृष्णा) जोशी, प्रा. कुलकर्णी आदींनी बीड जिल्हा निवडला.

महाराष्ट्रातला अत्यंत मागासलेला असा हा बीड जिल्हा तिथले दारिद्र्य, गोंडा जिल्हयात काम सुरू करताना तिथं जी परिस्थिती होती, त्यापेक्षाही भयाण असे खुद्द श्री. जोशीही कबूल करतात. साधनसामुग्री तिथे विपुल होती. प्रदेश सुपीक होता. आठ–दहा फुटांवर त्या जिल्हयात कुठेही पाणी लागत होते. कमतरता होती ती फक्त लोकांमध्ये त्याची जाणीव करून द्यायची. असलेल्या नैसर्गिक सुबत्तेचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याची. त्यासाठी त्यांना एकत्रित करून कामाला लावण्याची.

बीड जिल्हयातली परिस्थिती त्या मानाने अगदीच भिन्न होती. इथे मुळात पाणीच नाही. जमीन खडकाळ. चक्क कोरडवाहू. त्यामुळे खरें पाहयचे तर बीड जिल्हा विकासासाठी निवडणे म्हणजे फार मोठे आव्हान होते. संस्थेने ते स्वीकारलेले आहे, ही एक चांगली बाब आहे; पण सोडलेला संकल्प पूर्ण करणे ही एक अत्यंत अवघड बाब आहे. मुळात ह्या जिल्हयाची भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक परिस्थिती व गोंडा जिल्हयात कामाला हात घालतानाची तिथली परिस्थिती ह्यात फार मोठा फरक आहे. राजकीयदृष्टयाही परिस्थितीत मोठे अंतर आहे. नानाजींनी गोंडा जिल्हयात काम करायला सुरुवात केली तेव्हा नानाजी जनता पक्षाचे सरचिटणीस होते. पक्षावर त्यांची जबरदस्त पकड होती आणि पक्ष केंद्रात आणि उत्तर प्रदेशात दोन्ही ठिकाणी सत्तेवर होता. किती नाही म्हटले तरी ह्या राजकीय परिस्थितीचा अशा विधायक कार्याला नक्कीच फायदा मिळतो. दुर्दैवाने ती परिस्थिती आज राहिलेली नाही. जनता पक्ष विभागलेला आहे. तो सत्तेवरही नाही. सत्तारूढ पक्ष आणि संघ ह्यांच्यात छत्तिसाचा आकडा आहे. महाराष्ट्रात संघाची प्रतिमाही फारशी लोकप्रिय नाही. विशेषतः अंतर्भागात. संघाकडे संशयाने पाहणारे, त्यापासून दूर राहणारे लोक मोठ्या प्रमाणात आहेत. ह्याचा आणि सत्ताधारी पक्षाच्या प्रचाराचा मोठा अडसर हे आव्हान स्वीकारताना दूर करायचा आहे.

गोंडा जिल्हयात आधी म्हटल्याप्रमाणे नैसर्गिक साधनसंपत्ती होती. निसर्ग खूष होता लोकच त्या बाबतीत अनभिज्ञ होते. त्यांना शिक्षित करून निसर्गाची देन त्यांच्यापर्यंत पोहोचवायची होती. बीडमध्ये नेमका निसर्गच कोपला आहे लोक त्या मानाने बरेच जागृत आहेत इतरत्र समाजात होणाऱ्या बदलाची त्यांना जाणीव आहे. इथे त्यामुळे प्रश्न आहे लोकांना रोजीपोटी आपापल्या गावातच मिळवून द्यायसाठी कुठला मार्ग चोखाळायचा ह्याचा ! बीड जिल्हयातल्या लाखो लोकांचे पोटापाण्यासाठी अन्यत्र होणारे स्थलांतर कसे रोखता येईल ते पाहयचा !! गोंडा जिल्हयातला प्रयोग जसाच्या तसा इथे राबवता येणे त्यामुळे कठीण आहे

बीडपासून व विशेषतः आष्टी–पाटोद्यापासून नगर, औरंगाबाद ही आज विकसित होत असलेली शहरे फारशी दूर नाहीत. सोलापूरही फारसे लांब नाही आणि नोकऱ्यांच्या निमित्ताने असंख्य लोक पुण्या–मुंबईला नियमित जात असल्याने त्या शहरांचीही पुरी ओळख बीडवासियांना आहे. साहजिकच ह्या शहरांची जी झपाट्याने वाढ औद्योगीकरणामुळे होत आहे तिचीही ओळख इथल्या लोकांना आहे. सहकारी साखरकारखाने जिल्हयात आधीच आहेत. आणखी तीन-चार येऊ घातलेले आहेत. एक–दोन सूतगिरण्या येऊ घातलेल्या आहेत. परळीचा परिसर उद्योगधंद्यांनी फुलतो आहे, तर शेजारच्या नगर जिल्ह्याचा औद्योगिक विकासापायी कायापालट होत चालला आहे. ह्या शेजारच्या नव्या संस्कृतीची ओळख झाल्यामुळे औद्योगिक विकासातूनच सर्वांगीण विकासाचा मार्ग मोकळा होऊ शकतो अशी ठाम श्रद्धा अनेकांची झालेली आहे. या पार्श्वभूमीवर आरोग्य-शिबिरे, विहिरी व त्यावर लिफ्ट-पंप, कोरडशेतीवर नवीन प्रयोग, कुटीरोद्योग असा टप्प्या-टप्प्याचा विकास-मार्ग सांगितला तर लोकांच्या पचनी पडायलाच जड जातो. 'ही कामे चक्क शासनाची आहेत......इथे फक्त एखाद-दोन मोठाले उद्योग येऊ देत बघा कसा जिल्हा बहरून जातो ते !' हे इथल्या अनेकांचे ठाम विचार आहेत.

चळवळी करा, आरडाओरडा, आंदोलने छेडा, वद–घेराव घडवून आणा–शासन नमते. अशातनंच एखादा मोठा प्रकल्प बीड जिल्ह्यात यायला हवा. त्याबरोबर परळी–बीड–नगर किंवा सोलापूर–बीड–औरंगाबाद रेल्वेमार्ग मिळवायला हवा. एवढे झाले की, जिल्ह्याच्या विकासाचा मार्ग मोकळा होईल असे अनेकांना मनोमन वाटते. ह्या ठाम कल्पना मनाशी मांडल्याने दीनदयाळच्या कार्यकर्त्यांमार्फत मांडली जाणारी सर्वांगीण विकासाची, आस्ते कदम पुढे सरकणारी कल्पना लोकांच्या गळी उतरवणे अवघड ठरेल. बीडमधल्या एका प्राध्यापकांनी मांडलेल्या ह्यासबंधीचा युक्तिवाद इथे उद्धृत करणे सयुक्तिक ठरावे. ते म्हणतात, '...ह्या पद्धतीने विकासाची वाटचाल करायची तर थोडाबहुत विकास व्हायला किमान दहा वर्षे लागतील नि तोपर्यंत शेजारचे नगर–औरंगाबाद–परळी–सोलापूर वगैरे औद्योगीकरणाची वाटचाल स्वीकारलेले परिसर पन्नास–साठ वर्षे तरी पुढे निघून गेलेले असतील. ही गॅप मग कधीच भरून काढता येणार नाही आणि हा बीडचा परिसर कायमच मागासलेला राहील ! ......'

'बीड जिल्हा विकास परिषद' नावाची एक संघटना बीडमध्ये अलीकडेच उभी राहिली आहे. बीडहून प्रकाशित होणाऱ्या 'चंपावती पत्र' ह्या दैनिकाचे संपादक श्री. क्षीरसागर हे ह्या संघटनेचे अध्यक्ष आहेत. त्यानाही दीनदयाळ शोध संस्थेचा मार्ग पटत नाही. त्यांच्या मते 'ह्या नुसत्या गप्पा आहेत. प्रत्यक्ष ठोस कृती कुठेच नाही.' त्यांच्या मते बीड जिल्ह्याचा विकास व्हावा असे वाटत असेल तर सर्वप्रथम ह्या जिल्ह्यात रेल्वेमार्ग यायला हवा. तोही शक्यतो परळी–बीड–नगर असाच किंवा सोलापूर–बीड–औरंगाबाद असा व त्यानंतर जिल्हयात सार्वजनिक क्षेत्रातले एखाद–दोन मोठे उद्योग यायला हवेत व त्यांच्या अनुषंगिक उद्योगांचे जाळे उभे राहयला हवे...त्याचप्रमाणे जिल्हयात नवीन उद्योगधंदे उभे करायला वाव मिळावा म्हणून सवलतीची कर्जेही उपलब्ध व्हायला हवीत... जायकवाडी, माजरा आदि प्रकल्प पूर्ण करून पाण्याचीही व्यवस्था शासनाने त्वरित करायला हवी...हे सारे घडले नाही तर हे विकास मंडळ आंदोलनाचा मार्ग छेडणार आहे. मी बीडमध्ये होतो त्याच दिवशी रेल्वेच्या मागणीसाठी 'रास्ता रोको' आंदोलनही छेडले गेले....

ह्या मार्गाने बीडच्या प्रगतीचा मार्ग मोकळा होईल असे मानणारा वर्ग मोठा आहे. तो प्रभावी पण आहे. महाविद्यालयातले प्राध्यापक, बीड, परळी व इतर ठिकाणचे उद्योजक, काही आमदार मंडळी, डॉक्टर्स, वकील, व्यापारी, दुकानदार वगैरे वगैरे. ह्यांना अनेक राजकीय कार्यकर्त्यांची, पुढाऱ्यांची पण साथ आहे. ह्या मंडळींचा रोष मात्र प्रस्थापित नेतृत्वावर आहे. त्यांनी स्वतःच्या गटबाजीच्या राजकारणापलीकडे जिल्हयाच्या विकासाच्या दृष्टीने काहीच केले नाही ही त्यांची मोठी तक्रार. सुंदरराव सोळंके बीड जिल्हयाचे. अनेक वर्षे ते मंत्री होते. अगदी महत्त्वाच्या अशा उद्योगखात्याचेसुद्धा आणि तरीसुद्धा त्यांच्या कारकीर्दीत कुठल्याही

जिल्ह्याचा विकास झाला नाही. अनेक आश्वासने वेळोवेळी देऊन-सुद्धा ना खतकारखाना राज्यात आला, ना इतर कुणी बडे उद्योग-पती ! त्यामुळे सहाजिकच अगदी आय कॉंग्रेसचेही अनेक सुंदररावा-वर चिडलेले दिसले.


असाच राग ह्या मंडळींचा मराठवाडा विकास परिषदेवरही आहे. मराठवाड्याचा सर्वांगीण, (म्हणजे प्रामुख्याने औद्योगिकच !) विकास व्हावा म्हणून ही संघटना प्रयत्नशील असते; पण बीड-करांचा राग असा की, ही संघटना औरंगाबाद शहर म्हणजेच मराठवाठा असे समीकरण मांडूनच चळवळी आखते. मनमाड–औरंगाबाद रेल्वेमार्गाच्या रुंदीकरणासाठी ही परिषद चळवळी करते. लोकसभेतही धरणे धरून बसते; पण त्याच वेळी मराठ-वाड्यातल्या बीड जिल्ह्यात रेल्वेमार्ग औषधालाही नाही ह्याचा ह्या मंडळींना विसर पडतो. परळी-बीड-नगर किंवा सोलापूर बीड-औरंगाबाद रेल्वेमार्गाची बीडची जुनी मागणी आहे हे त्यांच्या लक्षात राहात नाही....

एक मात्र निश्चित. ह्यापैकी कुठल्याही मंडळींजवळ बीड जिल्ह्यात नेमका कुठला प्रकल्प यावा, म्हणजे जिल्ह्याचा विकास द्रुतगतीने होऊ शकेल, ह्या प्रश्नालाही कुठले ठाम उत्तर असे नाही. तोही विचार सरकारने, शासनाच्या विविध महामंडळांनी करावा व एखादा सार्वजनिक क्षेत्रातला प्रकल्प इथे मोठ्या प्रमाणावर सुरू करावा हीच त्यांची मागणी आहे. रेल्वेबाबतची मागणी मात्र अधिक ठाम आहे. तीसाठी लढायचीही त्यांची तयारी आहे.

इथे विचारसरणीतला मोठा फरक आहे. दीनदयाळच्या के. डी. जोशी ह्यांचं ठाम मत आहे की, निदान सुरुवातीला तरी फार मोठा प्रकल्प एकदम अशा अविकसित प्रदेशात नेऊ नये. त्यातून मोठ्या उद्योगधंद्यांबरोबर वावरणाऱ्या बकाल संस्कृतीलादेखील आमंत्रण मिळते. त्यातून विकास होतो तोही बराचसा एकांगी, बकाल असाच होतो. संथपणे होणाऱ्या सर्वांगीण विकासातून माणूस ह्या परिवर्त-नाला समोरा जायला हळूहळू शिकत असतो. त्याचा मानसिक विकासही त्यातून साधला जाऊन नवनिर्माणाचे कार्य स्थिर पायावर सुरू होते. परिवर्तनाची सवय नसलेल्या अविकसित भागातल्या माणसावर त्या भागात मोठे उद्योगधंदे जबरदस्तीने नेऊन लादले तर तो माणूस भांबावून जातो. त्याचा मानसिक समतोल बिघडून जातो व बकाल यांत्रिक संस्कृतीत तो गुदमरू लागतो. त्यातून सुटका करून घेण्यासाठी तो अवैध मार्गाचा अवलंब करू लागतो आणि आणखीच तो त्या संस्कृतीची शिकार बनतो. विकास घडवून आण-ताना 'माणूस' महत्त्वाचा मानून त्याच्यासाठी विकास हवा असेल तर येऊ घातलेल्या परिवर्तनाला सामोरे जाण्याची मानसिक तयारी आधी करून घ्यायला हवी....

ही विचारसरणी सरळ-सरळ दुसऱ्या टोकाची आहे नि ती गळी उतरवणे अवघड आहे. विशेषतः झटपट विकासाच्या, श्रीमंतीच्या मागे लागलेल्यांच्या ! तशा तऱ्हेचा विकास शेजारी चाललेला पाहायची सवय लागलेल्यांच्या !!

जे विकासकार्य बीड जिल्ह्यात दीनदयाळ शोध संस्थेनं अंगी-कारले आहे त्यात हाही एक मोठा अडसर आहे. राजकीय, सामाजिक, भौगोलिक समस्यांबरोबरच ! इथल्या फार मोठ्या प्रमाणात अस-



लेल्या लोकांचा ह्या दीनदयाळ वा नगरकॉलेज वा गांधी–जय-प्रकाशप्रणित विचारसरणींवर तसा विश्वास नाही. वृत्तपत्रातने फोटो छापवून घेऊन पाठ थोपटून घ्यायसाठी हे प्रकार ठीक आहेत; पण असे एक–एक गाव सुधारत बसून विकास घडवायचा तर अनेक योजने वाट बघत बसून राहावे लागेल. त्यापेक्षा चक्क दुसऱ्या जिल्ह्यात, राज्यात, देशात जाऊन नशीब कमावणे काय वाईट ? म्हणूनही अनेकांचा ह्या विचारसरणीला विरोध आहे. बीडमधले आष्टीकर म्हणतात, '...नानाजींनी एक जिल्हा विकसित केला पाच वर्षांत. ठीक आहे; पण काय केलं तिथं त्यांनी ? तर विहिरी खणल्या. पंप बसवले. जमीन शेतीखाली आणली. लोकांचे आरोग्य

सुधारले. शिक्षण सुधारले. अरे, पण मी म्हणतो ह्या तर नुसत्या प्राथमिक गरजा झाल्या विकास कुठे आहे ? रोल्स रॉइसच्या गाड्या मागे पडून लोक अवकाशात झेप घेऊ लागले आहेत तिथे प्रवास करून सुखरूप परतू लागले आहेत आणि तुम्ही विकास करताहात हातमागांचा, चरख्यांचा ! राजकारणासाठी वीस कलमीच्या गप्पा ठीक. स्वातंत्र्यलढ्याचा भाग म्हणून टकलीवरची सूतकताई किंवा चरखाही ठीक. प्रतीकात्मक म्हणून एखादा गोंड जिल्हा, सदाकत आश्रमही ठीक; पण म्हणून काय तोच विकासाचा मार्ग ठरू शकेल का ?

... विकासाची ही गांधीवादी कल्पना आहे. त्यांच्या काळात, स्वातंत्र्यपूर्व काळात कुटलीही सत्ता हाताशी नसताना ती ठीक होती. आज स्वातंत्र्यानंतर तीस वर्षांनी ती कल्पना निव्वळ भोंगळ वाटते...

' ... पण आजही शेकडो–हजारो लोक दारिद्र्यरेषेखालचे जिणे जगताहेत दोन वेळचे जेवणही त्यांना मिळत नाही. त्याच्यासाठी रोजगारही नाहीत त्यांना ह्या प्रकल्पातून दैनंदिन निर्वाहाचं साधन तरी मिळेल की नाही ?' माझ्या ह्या प्रश्नालाही आष्टीकरांनी धुडकावून लावले

' ... त्यासाठी असल्या प्रकल्पांची गरजच काय ? देशापुढच्या अनेक समस्यांची उत्तरे देशाकडे आहेत. फक्त त्यासाठी प्रयत्न हवेत. मनापासून, तळमळीने राष्ट्रीय हित डोळ्यांसमोर ठेवून. उत्तरेतल्या नद्यांना दरवर्षी महापूर येतात. शेकडो जीव हकनाक बळी जातात. ह्या गंगा–ब्रह्मपुत्रा–सरस्वती–यमुना कृष्णा–गोदेला मिळवून दिल्या तर ! त्यातून केवढे तरी रोजगार उपलब्ध होतील. लक्षावधी हेक्टर जमीन पाण्याखाली येऊ शकेल. अनेक पाटबंधारे–कालवे खोदून केवढा तरी प्रदेश हिरवागार होऊ शकेल अगदी मराठवाड्यातलासुद्धा खूपसा. तीच गोष्ट सागरलाटांचा योग्य उपयोग किनारपट्टीवर करून घेतल्याने होऊ शकेल. ठिकठिकाणी कोसळणारा पाऊस साठवून फिरवण्याचं काम करता येण्यासारखं आहे. आशियाई क्रीडास्पर्धा भरवणाऱ्या भारताला हे अशक्य नाही. अग्निबाण अवकाशात सोडणाऱ्या भारताला तर नाहीच नाही ! अशी कामे सरकारच्या मागे लागून शास्त्रशुद्धरीत्या केली तर, मराठवाड्याच्या किंवा बीडच्याच नव्हे तर भारताच्याही सर्वांगीण विकासाला गती मिळू शकेल ह्यातही लोकांचा सहभाग मिळवून त्यांच्यामार्फत ही कामे करवून घेता येतील. त्यातून होणारा विकास एखाद्या जिल्ह्यापुरता, गावापुरता, खेड्यापुरता किंवा राज्यापुरता सीमित नसेल. तो सर्वगामी असेल चित्र पालटून टाकणारा असेल ... मी म्हणतो, अरे, असे काही प्रयोग करा. कुठे त्या शिळ्या कढीला ऊत आणत बसला आहात ! त्या पद्धतीनं विकास म्हटला तर आपला देश जगाच्या अंतापर्यंत मागासलेलाच राहील ! ...'

आष्टीकर बहुधा हैद्राबादलाच असतात. कामानिमित्त ते बीडमध्ये आले होते. ते मूळचे मराठवाड्याचेच. मराठवाड्याबद्दल प्रेम बाळगून असलेले. स्वतः इंजिनियरिंगचे जुने पदवीधर. सहज लॉजमध्ये गाठभेट झाली. गप्पा झाल्या नि त्यातून त्यांनी मला वरील


# मुंबईला एकच पर्याय
# नवी मुंबई
## नव्या मुंबईत स्थायिक व्हा


**'सिडको' नव्या योजनाबद्ध शहरांची निर्मिती**

प्रगति पथावर असलेले
नव्या शहरांचे प्रकल्प
नवी मुंबई
नविन औरंगाबाद
नविन नांदेड
नवे नाशिक

सिटी अँड इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

CIDCO

नोंदवलेले कार्यालय
'निर्मल' २ रा मजला
नरिमन पॉईंट
मुंबई ४०००२१
दूरध्वनि / २३२४२०

तत्त्वज्ञान ऐकवले बीडमधल्या दीनदयाळपद्धतीच्या विकासकार्यक्रमाला विरोध असणाऱ्यांकी इतकी ठाम मते कुणाचीच :नाहीत; पण प्रत्येकाला असे मात्र जरूर वाटते की, विकासाची ही दिशा काही खरी नाही काही तरी भव्यदिव्य हवे ! 'विकास' दिसणारा हवा ! अशाची संख्या अर्थात थोडी नाही आणि अशाना बरोबर घेऊन विकास साधायचा, तर आपले मार्ग त्यांना पटवून देणे आवश्यक आहे ! तेही मोठे आव्हान आहे ! ...

हे आव्हानही ह्या सर्व स्वयंसेवी संस्थानी स्वीकारलेले मात्र आहे! निदान ह्या मडळींशी बोलताना तसे जाणवले तरी !!

¤

## पाच

—हो ! हे आव्हान बीड जिल्ह्यापुरतं तरी निदान तीन स्वयसेवी सेवासंस्थानी स्वीकारलेले आहे. नगर कॉलेजचाच सीएसआरडी विभाग. आंबेजोगाईची डॉ. लोहियांची सानेगुरुजी-जयप्रकाश परंपरेतली मानवलोक संस्था आणि दिल्लीची ही संघप्रणीत दीनदयाळ शोध संस्था तिन्ही संस्थानी बीड जिल्ह्यात स्वतःसाठी निवडलेले कार्यक्षेत्र वेगळे असले तरी विचारसरणी साधारणतः एकच आहे. कार्यपद्धतीतही फारसा फरक नाही. तिन्ही संस्थांचा भर ग्रामविकासावरच आहे व तोही प्रायः आरोग्य, शिक्षण, शेती, कुटीरोद्योग ह्याच मार्गांनी, थोड्या-फार फरकाने जाणारा आहे ! तिन्ही संस्था गावकऱ्यांचा कार्यक्रमात सक्रिय सहभाग असेल तरच त्या त्या गावात कामे सुरू करतात हेही एक साम्यच आहे फरक म्हटलाच तर त्यांच्या लेबलात आहे एकावर मिशनचा शिक्का आहे, दुसऱ्यावर समाजवाद्यांचे लेबल आहे व तिसऱ्यावर संघाची छाप आहे ! काय गमत आहे हो ! तिन्ही पंथ तसे भिन्न. एरवी एकमेकांवर तुटून पडणारे; पण इथे बीड जिल्ह्यात काही अंशी एकमेकांचाच कार्यक्रम वेगवेगळ्या क्षेत्रात जणू राबवत आहेत. विचारात आलेले साधर्म्य कार्यक्रम–अमलबजावणीतही चालू राहावे व त्याचा एकत्रित फायदा बीड जिल्ह्याला मिळावा हीच अपेक्षा कुणीही समाजकार्यात रस घेणारा बाळगील !

नगरला मिशनचे कार्य जोमाने चालते हे निदान महाराष्ट्राला तरी नवीन नाही. धार्मिक बंधने ओलांडून इथे मिशनने बरीच चांगली कामे केली आहेत नगर कॉलेज व त्याचाच एक भाग असे ग्रामीण विकास अभ्यास संस्था ही मिशनचीच नगरला देणगी आहे. ह्या अभ्याससंस्थेमार्फत नगर जिल्ह्यात बरीच कामे चालतात सुधारित शेतीचे प्रयोग विविध शेतावर जाऊन चालू असतात अभ्याससंस्थेमार्फत ग्रामीण विकासाबाबत ठिकठिकाणच्या विद्यार्थ्यांना शिक्षणही दिले जाते. त्यासाठी प्राध्यापक तयार केले जातात. ठिकठिकाणी 'अॅफ्रो' ह्या यूनोप्रणीत भूजल सर्वेक्षण संघटनेमार्फत भूगर्भातल्या पाण्याचा शोध घ्यायचा प्रयत्न ह्या संस्थेचा चालू असतो. जिथे पाणी सापडेल तिथे विहिरी खणायच्या, पंप बसवून उपसा करायचा, लगतची जमीन पाण्याखाली आणून शेतीतले उत्पन्न वाढवायचा प्रयत्न करायचा. त्याचबरोबर नाठाळ जमिनीत घायपात रुजवायचा, वाढवायचा, त्याच्यापासून धागा काढायचा, तो विणून सुबक अशा फॅन्सी वस्तू तयार करायच्या...कुठे धनगरांचा प्रश्न हातात घ्यायचा, तर कुठे कुंभारांचा त्यांना शक्य असेल तिथे बँकेकडून मदत मिळवून द्यायची. त्यांचे जीवनमान सुधारायचे .. असे एक ना अनेक छोटे–मोठे प्रकल्प सीएसआरडीचे संचालक डॉ. हळबे ह्यांच्या नेतृत्वाखाली सुरू असतात

अशाच कुणा शिकून तयार झालेल्या विद्यार्थ्यांच्या आग्रहाखातर अभ्याससंस्थेने आपले कार्यक्षेत्र बीड जिल्ह्यात वाढवले, अगदी अलीकडेच आणि धानोरा हे लहानसे गाव त्यांनी दत्तक घेऊन टाकले. तिथे विहिरीला पाणी लागले. गावकऱ्यांचा उत्कृष्ट पाठिंबा मिळाला. सदतीस जणांची सोसायटी उभी राहिली. दीडशे एकर जमीन आता पाण्याखाली येते आहे. तिथे सुधारित शेतीचे प्रयोग सुरू झाले आहेत. ह्या प्रयोगात डॉ हळबे ह्यांची मुख्य तक्रार आढळली बँकेविषयीची ! त्यांनी स्वतः दहा लक्षाच्या ठेवी देऊन धानोऱ्याला नेलेल्या सेंट्रल बँकेविरुद्ध ! शेतकऱ्यांची, गावकऱ्यांची प्रकरणेच ह्या बँकेत रेंगाळतात असा आरोप करून डॉ हळबेंनी पुढे सांगितले की, 'त्यामुळे शेतकऱ्यांचा, ग्रामस्थांचा विश्वासच उडतो ..'

ह्यापाठोपाठ दुसरा प्रयोग इथून जवळच असलेल्या अंमोरा गावी ते करताहेत. जवळजवळ असाच थोडासा मोठा. वडगावदौला हे तिसरे गावही ते नतर घेणार आहेत. सध्या तरी नगर कॉलेजने स्वतःचे कार्यक्षेत्र ह्या नगर जिल्ह्याला अगदी लागून असलेल्या व नगरपासून ३०–३५ किलोमीटर अंतरावरच्या परिसरापुरतेच सीमित ठेवलेले आहे. 'फारसे लांब जाणे व्यवस्थापनाच्या दृष्टीने जड जाते. मॅनेज करणे अवघड होते.' असा ह्यावर कॉलेजचा खुलासा !

आंबेजोगाईतून काम करणारी डॉ लोहियांची मानवलोक संस्थाही तालुक्याच्या डोंगराळ प्रदेशातच प्रायः काम करते. काही मेडिकल कॅम्प, एक–दोन दवाखाने ही संस्था ग्रामीण भागातने चालवते. शिवाय खुद्द आंबेजोगाईत ही संस्था 'बालग्राम' चालवते. अनाथ मुलांना सहारा मिळतोच; पण 'अनाथ' महिलांनाही मिळतो ह्या महिला तिथे 'अनाथ' मुलांची आई म्हणून वावरतात आणि घरातल्या मुलांप्रमाणे ह्या अनाथ मुलांना वागणूक देऊन सनाथ बनवतात

ह्याबरोबरच मानवलोकचा आणखी एक उपक्रम चालू आहे. मेंढपाळाचा व्यवसाय ह्या परिसरातल्या डोंगरी प्रदेशात मोठा आहे. ह्या मेंढपाळांच्या व अन्य मुलांनाही शास्त्रोक्त शिक्षण द्यायचा प्रयत्न ही संस्था करते. मेंढ्या पाळणे, त्यापासून लोकर मिळवणे, लोकरीचे सूत तयार करणे, मागावर विणून घोंगड्या, ब्लॅंकेटे तयार करणे वगैरे शिक्षणही ह्या मुलांना दिले जाते. हे शिक्षण घेऊन आता एक–दोन तुकड्या तयार झाल्या आहेत. ह्या मुलांना मेंढ्या विकत घेण्यासाठी व सूत काढण्यासाठी, घोंगड्या बनवण्यासाठी चरखे–हातमाग घ्यायला बँकेकडून, वित्तीय संस्थांकडून मदत मिळवून द्यायचा प्रयत्न सध्या संस्था करीत आहे तसे झाले तर ही मुले स्वतःच्या पायावर उभी राहू शकतील व त्यांचा अनुभव घेऊन आणखी धनगर समाजातली मुले पुढे येऊ शकतील आज हे फार आवश्यक आहे धनगर समाजातली मुले हा व्यवसाय सोडून दुसरीकडे जायला लागली

आहेत, आजवरची घरातली ओढाताण बघून. धनगराला नाडून कमी भावात व्यापारी लोकर काढून घेतो. धनगर बिचारा अर्धपोटीच राहतो. व्यापारी पंजाबात किंवा मुंबईला लोकर पाठवून गबर होतो ! अशा वेळी जर धनगराच्या मुलांना थेट घोंगड्या बनवण्यापर्यंतचा व्यवसाय सुरू करून दिला तर ह्या समाजाची पिळवणूक थांबेल. धनगराचे स्थलांतर थांबेल. हे सहकार्य मात्र वेळेवर वित्तीय संस्थांकडून किंवा बँकांकडून मिळाले पाहिजे. नाही तर सर्व योजनाच पार बिघडून जाईल. महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने असे सहकार्य देऊ केलेले आहे असे समजले !

ह्याखेरीज पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आहे. कोरडवाहू शेतीचा प्रश्न आहे. शिक्षणाचा प्रश्न आहे मानवलोक संस्था त्याहीसाठी प्रयत्नशील आहे. शासनाच्या व शासकीय संस्थांच्या मागे लागून हे प्रश्न सोडवायचा संस्थेचा प्रयत्न सुरू आहे. हळूहळू हे प्रयोग चालू होतील. त्यात यशही मिळेल, असा आशावादही डॉ. लोहियांनी बोलून दाखवला.

डॉ. लोहियांची ही संस्था आंबेजोगाईतच एका लहानश्या प्लॉटवर उभी आहे. तिथे एक लहानशी झोपडीवजा पण सुंदर वास्तू उभी आहे. त्या वास्तूवर पाटी झळकते आहे 'धडपड !' मानवलोक संस्थेच्या व त्याबरोबरच डॉ. लोहिया, प्रा. सौ. शैलाताई लोहियांच्या धडपडीचेच जणू ते दृश्य चित्र ! एक जीप उभी असते. त्यातून अख्खा डोंगरभाग हज्जारदा पालथा घातला आहे डॉक्टरांनी ! आणि हे करत असताना इतर कार्यक्रमही सुरू असतात. नाटकाच्या पहिल्या प्रयोगाचा नारळ फोडण्याचे आमंत्रण तशा गडबडीत, धडपडीतही ते स्वीकारतात. आंबेजोगाईच्या संस्कृतीला जागून !!

दीनदयाळ शोध संस्थेचं कार्यक्षेत्र वरील दोन सस्थापेक्षा तसे मोठेच. संपूर्ण बीड जिल्हा तसा मोठाच. ठिकठिकाणची आर्थिक, सामाजिक, भौगोलिक परिस्थितीही अलग अलग. त्यामुळे त्यातल्या त्यात मागासलेले असे दोन तालुके सस्थेनं निवडलेले आहेत. आष्टी आणि पाटोदा. स्वत:च्या कार्यक्रमाची पचसूत्रीही ह्या सस्थेने ठरवून टाकली. श्री. के. डी. जोशींच्या म्हणण्यानुसार सुरुवातीच्या सर्वेक्षणानंतर लगेचच एक निर्णय संस्थेने घेतला. गोंडा जिल्ह्याचा प्रयोग जसाच्या तसा इथे लागू करणे केवळ अशक्य आहे. त्या हिशोबानेच त्यांनी पचसूत्री कार्यक्रम आखून टाकला. त्यावरच ह्या सस्थेचा किमान पहिली दोन वर्षे तरी भर राहील. ही पंचसूत्री अशी—


आरोग्यवर्धन व सेवा, पाणीपुरवठा, जलसिंचन–कोरडवाहू शेतीतले नवे प्रयोग व सामाजिक वनीकरण, शिक्षण व लघु–कुटीरोद्योग–ग्रामोद्योग ! औद्योगिक विकासावर गोंडा जिल्ह्यात भर नव्हता, तो इथे आवश्यक आहे; पण त्या औद्योगीकरणाची सुरुवात ग्रामोद्योग, कुटीरोद्योग ह्यातूनच व्हावी असा मात्र त्यांचा आग्रह आहे.

. ह्या कार्यक्रमानुसार जवळजवळ आठ महिन्याच्या सर्वेक्षणानंतर संस्थेचा आराखडा आता तयार होऊ लागला; पण कामाला मात्र आधीच सुरुवात झालेली आहे.

सघीयांची एक गंमत आहे. एकदा कामाला लागायचे म्हटले की, सर्व काही विसरून ही मंडळी त्या कामावर तुटून पडतात. दीनदयाळ संस्थाही त्याला अपवाद नाही. बीड जिल्हा घ्यायचा म्हटला आणि के. डी. जोशींसारख्या सुस्थापित मॅनेजमेंट कन्सल्टटने आपली ठाण्या-पुण्यातली प्रॅक्टिस सोडून देऊन धद्याला सरळ रामराम ठोकला. आता त्यांनी सर्व वेळ बीडसाठी वाहून घ्यायचं ठरवलं आहे. जोशी बीडकडे सरकले. संस्थेचा निर्णय पक्का झाला. नानाजींनी एकदा बीड जिल्ह्याचा दौरा करून त्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले आणि बघता बघता बीडसाठी स्वत:ला वाहून घेणाऱ्या कार्यकर्त्यांची पलटण उभी राहिली ! एस्. पी. कॉलेजची नोकरी सोडून प्रा. कुलकर्णी ह्या कार्यक्रमात सहभागी होताहेत. डॉ. मुळे आले प्रयागजी आले. त्यांचे बीड जिल्ह्यात संपर्क-दौरे सुरू झाले. आष्टी, पाटोदाकडा, करजवणे वगैरे गावात कार्यकर्ते उभे राहिले. बैठका सुरू झाल्या. कार्यक्रम पक्के होऊ लागले... सारे कसे शिस्तबद्ध ही शिस्त काटेकोरपणा आणि स्वत:ला झोकून देणाऱ्या स्वयंसेवकाची पलटण ! दीनदयाळच्या गोंडातल्या यशाचे हेच गमक नसेल ना ? तसे असेल तर सर्व अडचणीवर मात करून बीड जिल्ह्यातही ते यशस्वी होतील. अशी निदान आशा धरायला तरी हरकत नाही आणि तसे व्हावे ! प्रत्येक काम शासनानेच केले पाहिजे, त्यासाठी फार तर लोकांनी लढे पुकारावेत, अशी काहीशी सवय ह्या राज्याला, देशाला लागू पाहात आहे. अशी सवय जडवून देणाऱ्या पुढाऱ्यांना त्यामुळे सणसणीत चपराक बसेल. शासनाचाही गलथानपणा नक्कीच दूर होईल !

ह्या कार्यक्रमानुसार येत्या वर्षभरात चोवीस वैद्यकीय शिबिरं भरवायचा संस्थेचा मानस आहे. त्यापैकी दोन ह्या पूर्वीच झाली दोन्ही शिबिरांना भरपूर प्रतिसाद मिळाला. अगदी राजकीय विरोधकाच्या प्रचाराला तोंड देत मिळाला. धानोऱ्याच्या शिबिरात अनेक मुसलमानांनीही भाग घेतला आणि शिबिराचेही एक वैशिष्ट्य आहे ! शिबिरात मोफत इलाज करून घेणाऱ्यांवर पुढेही सतत लक्ष पुरवले जाते. ते असतील त्या खेड्यापाड्यात जाऊन त्यांना आवश्यक ती औषधेही मोफत पुरवली जातात. ही औषधे सातत्याने पुरवता यावीत म्हणून सस्थेने औषध-बँकेचा सकल्प सोडला आहे. त्यासाठी औषध कपन्या, डॉक्टर्स इत्यादींना आवाहन केले आहे. औषधे बँकेला पुरवा. मोबदल्यात बँक औषधाने आलेले गुण, इतर प्रतिक्रिया कळवेल. या योजनेला चागला प्रतिसाद मिळत आहे. सिव्हिल सर्जन, डॉक्टर्स, सरकारी अधिकारी ह्यानाही या शिबिरांच्या यशस्वितेने धक्का बसला. सरकारी किंवा लायन वगैरे वाल्यांचीही शिबिरे कधी अशी यशस्वी झाली नव्हती असे त्यांचे अभिप्राय पडले आणि सरकार-दरबारातनेही ह्या कार्यक्रमांना औषधाच्या रूपाने सहकार्य दिले, तर एका संस्थेने अशा कार्यक्रमासाठी नेहमी आपली गाडी मोफत वापरायची ऑफर देऊन टाकली. वर्षभरातल्या चोवीस शिबिरातने तालुक्यातल्या प्रत्येक खेड्यापर्यंत पोचायचा, तिथल्या लोकांशी जवळीक साधायचा सस्थेच्या कार्यकर्त्यांचा मानस आहे. 'त्यातून आमच्याविषयीचे बरेच गैरसमज दूर होतील अशी आशा, नव्हे खात्री आहे–' प्रयोगाची एकूण माहिती देताना श्री. जोशी सांगत होते.

पाणीपुरवठ्याच्या प्रश्नालाही श्री. जोशींनी अग्रक्रम दिला. संस्थेच्या सुदैवाने असेल कदाचित; पण करजवणे ( ता. पाटोदा); आष्टी, नागथळा(आष्टी) धनगरजवळगा इत्यादी गावांत पाण्याचे साठे असल्याचे अॅक्वोनेदेखील सांगितले. करंजवण्याला पाणी त्याप्रमाणे



लागलेही. करंजवणे गाव सात-आठशे वस्तीचे. तिथे ज्या दिवशी देवाची पूजा होऊन विहीर खणायचा कार्यक्रम झाला, त्या दिवशी गावातलेच चौपन्न तरुण पुढे आले. सरपंचानी एकूण कार्यक्रमात सक्रिय भाग घेतला. ह्या गावाला महिना दीड महिन्यात पाणी मिळू लागेल असा अंदाज आहे हे काम सरकारने केले तर उत्तमच. नाही तर संस्थेने गावकऱ्यांच्या मदतीने ते काम पूर्ण करण्याचा व गावाला पाणी पुरवण्याचा चंग बांधला आहे.

आष्टीला शंकराच्या देवळालगतच्या तलावाचा उपसा करून नंतर तिथून पिण्याचे पाणी गावाला पुरवण्याची योजनाही अशीच राबवली जायची आहे. आष्टीचे आमदार, सरपंच इत्यादीसह सर्वांनी ह्या गोष्टीला सक्रिय पाठिंबा दिला आहे. पाणीपुरवठ्याचे हे चार-सहा प्रकल्पही ह्या वर्षात पूर्ण करण्याचा संस्थेचा मानस आहे.

शेतामधून व इतरत्रही बोअरिंग करून विहिरी खणायच्या. त्यावर उपसा सिंचन करून शेतीला पाणी द्यायचे तसेच कोरडवाहू शेतीचे विविध प्रयोग करायचे ह्याही कार्यक्रम संस्था राबवणार आहे. त्यासाठी प्रयागजी वेगवेगळ्या शेतकऱ्यांना भेटताहेत. त्यांचे प्रयोग सुरू आहेत.

ह्या वर्षात, पावसाळ्यातच, किमान एक लक्ष झाडे लावून ती वाढवायचाही संकल्प संस्थेने सोडला आहे. सामाजिक वनीकरणाचा हा कार्यक्रम. त्याची सारी जबाबदारी श्री. नाना मुंगीकर या आष्टीच्या निवृत्त फॉरेस्टऑफिसरकडे सोपवण्यात आली आहे. त्यातही जंगलखात्याने भरीव मदत कबूल केली आहे.

शिक्षण व औद्योगीकरण ह्याबाबतही वर्षात काही ठोस प्रयोग करून दाखवायचा संकल्प संस्थेनं सोडला आहे. त्यानुसार बैलगाड्याचा एक प्रयोग सांगण्याजोगा आहे. सांगलीच्या गुणे-केळकर आदी तरुण तंत्रज्ञानी एक 'बलवान' ही बैलगाडी तयार केलेली आहे. अत्याधुनिक रबरी धावाची 'ब्रेक्सची' तीन टन क्षमतेची ही बैलगाडी जर इथून परगावी मजुरीसाठी जाणाऱ्या शेतकऱ्याला देता आली तर शेतकऱ्याची ठेकेदाराकडून होणारी पिळवणूक थांबवता येईल ह्या बैलगाड्याचे उत्पादन इथे करता आले तर तो एक लघुउद्योग उभा राहू शकेल. स्थानिक शेतकऱ्यांना बैलगाड्यांसाठी अर्थसाहाय्य पुरवायला महाराष्ट्र बँक तयार आहे असे समजते. तसे झाले तर खरोखरच शेतकऱ्याची ठेकेदाराच्या जोखडातून मुक्तता होऊ शकेल.

पॉलिवस्त्र, तेलघाण्या, लोकरव्यवसाय आदी उद्योगही जोशींनी हेरून ठेवलेले आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार करंजवणे, धनगरजवळगा, आष्टी वगैरे गावात काही उद्योजकही त्यांनी तयार केले आहेत त्याखेरीज गोबरगॅस प्लँट्सच्या उभारणीचाही त्यांचा मनोदय आहे असे दोन प्लँटस त्यांच्या दोन कार्यकर्त्यांकडे ह्यापूर्वीच सुरू झालेले आहेत. आष्टीला देशपांडे वकिलांकडे तर कड्याला डॉ. भुस्कुटे ह्यांचेकडे. काही शेतावरही हे प्रयोग सुरू आहेत.

मोठाले उद्योग आणा म्हणणे सोपे असते रेल्वे आली पाहिजे ही मागणीही ठीक गंगा, कावेरी एक व्हाव्या हेही ठीक; पण हे सारे होणार कधी ? करणार कोण ? त्यापेक्षा सर्वांगीण विकासाचा असा मार्ग चोखाळायला हरकत का असावी ? माझ्या मते असे प्रयत्न पुढे चालूच राहायला हवेत. विरोधकाची आव्हाने स्वीकारूनही. त्यांची मते वळवत राहायचा प्रयत्न करत. भारतासारख्या देशात दारिद्र्यरेषेखालच्यांची संख्या अगणित आहे. अशा ठिकाणी हेच प्रयोग योग्य ठरतात उपलब्ध साधनसामुग्रीचा आणि वाया जाणाऱ्या प्रचंड मनुष्यबळाचा विचार करून !


म्हणूनच ह्या संस्थानी हे आव्हान स्वीकारले ते योग्यच झाले आव्हान स्वीकारून त्यानी कार्य चालूही केले आहे. त्याला मोठा प्रतिसादही मिळतो आहे. हा प्रतिसाद हाच आव्हाने समर्थपणे पेलल्याची पावती आहे त्या प्रतिसादातच हळूहळू विरोध मावळून सर्वांच्या सहकार्याने बीड जिल्हा फुलेल असा आशावाद बाळगायला हरकत नाही. सध्या तरी परिस्थिती तरी खचितच आहे. ◻

## सहा

स्वयंसेवी संस्था अशा तऱ्हेने कार्यरत असताना, शासकीय संस्था, महामंडळे हीही गप्प नाहीत. आपल्या परीने, लाल फितीच्या मर्यादा सांभाळीत ह्या मंडळींनीही आपापले आराखडे तयार केलेले आहेत. जिल्हा उद्योगकेन्द्राने १९८२-८४ चा ॲक्शन प्लॅन तयार केला आहे, तर लीड बँक स्टेट बँकेने १९८५ पर्यंतचा आराखडा तयार केला आहे. महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने जिल्ह्या-

# रॅलीफॅन्सची अंगभूत उत्कृष्टता त्याची हमी आहे.

रॅलिफॅन सुपरस्टारची पूर्णपणे समन्वय साधलेली यंत्ररचना बिनतक्रार कामगिरी मिळण्यासाठी आहे.




जेव्हा सुरळीत व बिनतक्रार कामगिरीचा प्रश्न असतो तेव्हा रॅलिफॅन सुपरस्टारला तोडच नसते. मोटर प्रदीर्घ काळ टिकण्यासाठी व आवाज न करता चालण्यासाठी डबल बॉल-बेअरिंग्ज. त्याचबरोबर हवा सर्वत्र सारखी खेळती राहण्यासाठी अतिसूक्ष्म संतुलन साधलेली पाती. टिकाऊपणासाठी पूर्णपणे धातूचा बनविलेला रेग्युलेटर. हे सर्व आपल्याला उत्कृष्ट कामगिरी देणारा पंखा मिळावा म्हणून केले जाते.

सुपरस्टारवर भरंवसा ठेवा. त्याची कामगिरी खरोखरीच वाखाणण्याजोगी आहे.

**रॅलिफॅन**
उत्कृष्ट उत्पादनांसाठी


**रॅलीज**
मल्टि-टेक्नॉलजी ग्रुप

ULKA-RFC-2

तल्या कामावर भर देण्याचा संकल्प सोडला आहे; पण ह्या साऱ्या शासकीय संस्थांच्या आराखड्यात नि प्रत्यक्ष कृतीत मोठा फरक पडतो. त्यात फारसे आश्चर्य वाटण्याजोगे काही नाही. अधिकाऱ्यांची बदली अशा जिल्ह्यातने झालेली असते. त्यांना आपल्या खात्याचे जिल्ह्यात काही काम चालू आहे हे दाखवणे भाग असते. मग जुजबी पाहाणीवर, काही नेहमीच्या ठोकताळ्यांवर आराखडा तयार होता. घोषणा होतात व शेवटी 'वर' रिपोर्ताज पाठवायची वेळ आली की घाईघाईने कर्जवाटपाचे लक्ष्य गाठायचा प्रयत्न केला जातो. कर्ज घेणाऱ्यातल्या कुणी जिद्दीने पाठपुरावा करून प्रकल्प उभा केला, शेतीत पीक घेतले, दूधसंस्था निर्माण झाली तर त्यांचे उद्घाटन होते. बहुधा कुणा आमदार–खासदार मंत्र्याच्या हस्ते. फोटो-हारतुरे-प्रसिद्धी. विकासदर्शक आकडेवारी वृत्तपत्रे प्रसिद्ध करतात. अधिकारी मंडळी सुस्कारा सोडतात. विकास पुढे प्रत्यक्ष होतो की नाही याची कुणालाच तशी काळजी नसते. एकदा कर्जवाटप झाल्यावर त्या व्यक्तीचे, व्यक्तीच्या प्रकल्पाचे काय झाले हे बघायला तसा कुणालाच वेळ नसतो. पुढचे लक्ष्य गाठायला पुढे पुढे पळायचे असते. मागे वळून मग बघणार कोण ? अलीकडे वीस कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी कशी चालली आहे हे बघण्यासाठी पंतप्रधानांकडून एक मुख्यमंत्री परिषद बोलावली गेली होती. त्या वेळी सर्व राज्यांनी आपापल्या प्रदेशात वीस कलमी कार्यक्रमाखाली किती लोकांना किती साहाय्य देण्यात आले ह्याची आकडेवारी दिली गेली होती त्यातला आकडा खोटा नसेल कदाचित; पण खरोखरच तशी अंमलबजावणी झाली असेल तर दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्यांची संख्या आज निम्म्याने खाली यायला हवी. तसे मात्र झालेले नाही. कर्जवाटप जरूर झाले असलं पाहिजे; पण त्याचा विनियोग कसा झाला तेच नीट पाहिले गेलेले नाही. कर्जवाटप झालेले सगळे दारिद्र्यरेषेखालचे गरजूच होते का इकडेही कदाचित लक्ष पुरवले गेले नसणार.

ह्या संदर्भात बीड जिल्ह्यातल्या भटकंतीत ऐकायला मिळालेले किस्से मोठे गंमतीशीर आहेत. उत्पन्नाचे दाखले मामलेदार, सरपंचांकडून आणून स्वत: दारिद्र्यरेषेखाली असल्याचे दाखवणे हे तसे आता सर्रास झाले आहे; पण सरपंच असलेल्या एका मालदार बागाईतदारांनीदेखील स्वत:ला दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे घोषित करून घेतले. नाममात्र जमीन असणारा छोटा शेतकरी दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती गणली जावी असे जाहीर होताच, सरपंचसाहेबांनी आपल्या जमिनीची वाटणी करून टाकली. मुलात, भावात, इतर नातेवाइकांत आणि ह्या सर्व मंडळींत एवढी कमी जमीन प्रत्येकी आली की, सगळेच एका रात्रीत दारिद्र्यरेषेखालील छोटे शेतकरी बनले ! स्वत:च्या गाड्या असूनही, सावकारी धंदा असूनही त्यांना सरकारतर्फे पुन्हा दारिद्र्यरेषेखालील म्हणून मदतही मिळाली !

पण सरकारी योजनांचे खूपदा असेच होते. ज्यांच्यासाठी योजना आखल्या जातात त्यांच्यापर्यंत त्या योजनांचा फायदा सहसा पोहोचतच नाही. मधल्यामध्येच इतर तो हडप करतात. स्वत: गबर राहतात. दारिद्र्यरेषेखालचे खरे गरीब, तळागाळाचे लोक–त्यांना असे काही फायदे असतात हेही कित्येकदा माहीत नसते ! ह्याचा दोष अर्थात सरकारी योजनांकडे नसतो किंवा त्या राबवणाऱ्या अधिकाऱ्यांकडेही नसतो. योजना बहुधा चांगल्याच असतात. त्या



राबवणारे अधिकारीही खरे बघितले तर नि:स्वार्थपणे त्या राबवतही असतात; पण आधी म्हटल्याप्रमाणे त्यांच्यावर मर्यादा पडलेल्या असतात. योग्य ती यंत्रणा त्यांच्याजवळ नसते. जनतेपर्यंत पोहोचण्याची साधने नसतात. अंमलबजावणीत प्रत्यक्ष अधिकाऱ्यांचा सहभाग फारसा नसतोच. त्याला प्रत्यक्षात साहाय्य कुणाला दिले जात आहे हेही माहीत नसते पुढचा पाठपुरावा करायला त्याला वेळही नसतो. कारण पुढच्या कामांचा सततचा रेटा त्याच्या मागे असतो. चांगल्या सरकारी योजनांचा बोजवारा उडताना दिसतो, तो ह्या अंमलबजावणीच्या योग्य अशा यंत्रणेअभावी.

ह्याच ठिकाणी स्वयंसेवी, सेवाभावी संस्था, संघटना महत्त्वाचे कार्य बजावू शकतात. या संस्थांची सेवाभावी वृत्ती, त्यांच्या कार्यकर्त्यांचो खरोखरच तळागाळातल्या लोकांपर्यंत जाऊन भिडण्याची तळमळ आणि सरकार–दरबारातून निघणाऱ्या योजना ह्यांची जर योग्य सांगड घातली गेली तर खूप काही साधता येईल सरकारात योजना तयार करणारी माणसे तशी गाढी विद्वान मंडळी असतात, व्यासंगी असतात. आपापल्या विषयात मातब्बर असतात. त्यामुळे त्यांनी तयार

केलेल्या योजना सहसा वरवरच्या नमतात. थातुरमातुर नसतात. त्या फसतात त्या अंमलबजावणी करणाऱ्या मंडळींच्या गैरव्यवहारा-मुळे. ही अंमलबजावणी जर अशा स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने केली गेली तर ह्या गैरव्यवहारांना बराच आळा बसू शकेल. धनंजयराव गाडगीळांच्या सहकारचळवळीचेच घ्या ना. ती जर लाल फितीत अडकली असती तर गाडगीळांच्या सगळ्या कल्पनांचे मातेरे होऊन गेले असते; पण महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांनी ह्या चळवळीचे सोने करून टाकले......

अशी सांगड घालायचा प्रयत्न दीनदयाळच्या कार्यकर्त्यांचा चालू आहे असे वाटते. कलेक्टर, जिल्हा परिषद प्रमुखापासून सर्व लहान-मोठ्या सरकारी अधिकाऱ्यांना ह्या कार्यकर्त्यांनी प्रथमपासूनच विश्वासात घेतले आहे. अधिकाऱ्यांनीही सहकार्याचे आश्वासन ह्या कार्यकर्त्यांना दिले आहे. कार्यकर्त्यांनीही शासनाच्या विविध योजनांचा फायदा अगदी गरिबातल्या गरिबापर्यंत पोहोचवण्याचा चंग बांधला. स्वतःच्या योजनांची त्यांना जोड देऊन. करंजवणे गावाकडे एरवी कुणाचे लक्ष गेले नसते; पण तिथे पाणीयोजना संस्थेने आखली आहे. ग्रामस्थांचे सक्रिय साहाय्य जरूर आहे; पण त्याचबरोबर शासनाच्या ग्रामविकास–योजनेखाली ह्या प्रकल्पासाठी मदत मिळवा-यचेही प्रयत्न चालू आहेत. तीच गोष्ट करंजवण्यात निवडलेल्या १०–१२ उद्योजकांची. एरवी त्यांना कुणी हुडकलेही नसते. त्यांच्या-पर्यंत साहाय्य पोहोचलेही नसते हे उद्योजक, उद्योजक बनलेच नसते.




दारिद्र्यरेषेखालीच खितपत पडून राहिले असते. आज ते उद्योजक व्हायची शक्यता तरी निर्माण झाली. हे परस्पर सामंजस्य, सहकार्य असेच चालू राहिले तर कदाचित संस्थेच्या कार्याला चांगली गती मिळू शकेल.

ह्या संदर्भात एक चांगली घटना अलीकडेच घडून आली आहे. श्री. भुजंगराव कुलकर्णी ही मराठवाड्यातली तशी प्रसिद्ध व्यक्ती. रिटायर्ड आय. ए. एस. अधिकारी. मराठवाडा विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष. मराठवाड्यात कुठेही काही विकास-कार्य सुरू झाले की भुजंगराव तिकडे धावलेच. साहजिकच ते दीनदयाळच्या बीड कार्याकडे आकर्षित झाले आहेत. कदाचित ह्या कार्यासाठी जी संघटना उभी करायची आहे तिथे अध्यक्षपदही श्री. भुजंगरावांकडे येईल अशीच परिस्थिती आहे एका लौकरच सेवानिवृत्त होणाऱ्या सिव्हिल सर्जनची. एका जंगलखात्याच्या अधिकाऱ्याची ! !

एक मात्र कबूल करावे लागेल. अगदी विरोधकांनादेखील ! गोंडा जिल्ह्यातल्या कामामुळे अनेक उच्चस्तरीय अधिकाऱ्यांचा दीनदयाळ शोध-संस्थेला चांगला पाठिंबा मिळू लागलेला आहे. ती एक सामाजिक विधायक चळवळ आहे. राजकीय किंवा सत्तारूढ पक्ष विरोधक चळवळ नाही हेही त्यांना पटू लागलेले आहे. ह्या विचारप्रणालीला जिल्ह्याचे कलेक्टर श्री. संदीप बागचीही अपवाद नाहीत आणि त्याचा चांगला परिणाम संस्थेच्या बीडमधल्या कामा-वर होणार आहे ! जागतिक बँक, रिझर्व बँक, दिल्लीतले सत्ताधारी पक्षातले काही उच्चपदस्थ ह्या साऱ्यांच्या प्रतिक्रियांमुळे अधिकाऱ्यांच्या ह्या मतप्रणालीला पुष्टीच मिळालेली आहे. नानाजींनी घेतलेला संपूर्ण राजकारणसंन्यास (त्यांचे गेल्या तीन-चार वर्षांतल्या कुठ-ल्याही राजकीय घडामोडींवर कसलेही भाष्य नाही ! ) या कार्याला प्रेरक ठरू शकेल, तर भुजंगरावांसारखा माणूस ह्या कार्यात सामील झाला तर कार्यकर्ते, अधिकारी सर्वांनाच जास्त मनोधैर्य मिळेल. कामाच्या दृष्टीने हे चांगलेच घडत आहे .....

संस्थेचे हे काम, शासनाचे त्याला सहकार्य हे घडत असतानाच, बीड जिल्ह्याचा विकास घडवून आणायला आणखीही काही व्यक्ती, संस्था धडपडत आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. त्यांचे मार्ग कदाचित भिन्न असतील; पण त्यांनाही अपेक्षित आहे ती जिल्ह्याची प्रगती! बीडचे आमदार राजेंद्र जगताप हे अशा व्यक्तींपैकी. त्यांच्याशी बोलताना कधीकधी वाटते की, त्यांचा पक्षांतर्गत कोंडमारा चालू आहे. ते मूलतः एस्. कॉंग्रेसचे. ते आजही शरद पवारांना मानतात. नानाजींच्या संस्थेचे काम राजकारणविरहित चालले आहे अशी जर खात्री पटली तर मदत करायला ते स्वतः तयार आहेत; पण स्वतः त्यांचे आराखडे मात्र भिन्न आहेत. सहकारी सूतगिरणी, त्यासाठी आवश्यक तो जिनिंग प्रेस, गिरणीवर आधारित यंत्रमाग, प्रोसेस हाउस अशी एखादी औद्योगिक साखळी उभी करावी अशा प्रयत्नात ते आहेत. त्याचप्रमाणे सायकल किंवा शिलाईमशिन्सची जुळणी व तदनुषंगिक लघुउद्योगांचे जाळे (पंजाब स्टाइल ! ) हाही विचार त्यांच्या मनात घोळतो आहे. शिवाय जायकवाडी, भांडारा, बेंडसुरा आदींच्या साहाय्याने पाणीयोजना, भूसिंचन ह्याही प्रयत्नात ते आहेत. त्यासाठी मंत्र्यांच्या, अधिकाऱ्यांच्या गाठीभेटी चालू आहेत. इथे एक लक्षात घेतले पाहिजे. आमदारसाहेब स्थानिक लघुउद्योग-

ध्याचे अध्यक्षही आहेत.

बीड जिल्हा विकास मंडळ ही दुसरी संघटना. त्यांचे मार्ग आणखी भिन्न आहेत व प्राय: औद्योगिक विकासावरच त्यांचा भर आहे. बीडमध्ये पाऊसच नाही. जमीन खडकाळ. प्रदेश दुष्काळी. अशा वेळी विकासाचा एकमेव मार्ग उरतो तो म्हणजे व्यापार–उदीम, उद्योगधंदे मंडळाच्या प्रवक्त्याची ही ठाम भूमिका आहे. रेल्वेरस्त्यांसाठी आंदोलन हा जरी त्यांच्या चळवळीचा एक भाग असला तरी काही विधायक सूचनाही त्यांच्याकडे आहेत. बीडपासून जवळच असलेल्या वाडवणी गावात आणि आष्टीतल्या बीडसांगवीमध्ये खूप हातमाग आहेत त्यावर निघणारे बीड टेरिकॉटन तसं प्रसिद्धही आहे; पण ह्या विणकऱ्याची सुताभावी खूपदा उपासमार होते त्यांना सूत मिळवून द्यायसाठी एखादा प्रकल्प हातात घ्यायचा त्यांचा मानस आहे. मग तो सहकारी सूतगिरणीचा असेल किंवा पायचरल्यांची मालिका निर्माण करण्याचा असेल .. सिमेंट टाइल्स, सिमेंट जाळ्या, इंजिनिअरिंग उद्योग, सहकारी ऑइल मिल, फ्लोअर मिल–आदी, मोठे उद्योगही त्याच्या आराखड्यात अंतर्भूत आहेत .

हे मोठे उद्योगही अजिबात येऊ नयेत असे कुणी म्हणणार नाही; पण ते स्थानिक परिस्थितीला पेलतील अशाच पद्धतीने यायला हवेत. निष्कारण बाहेरचे ' उद्योगपती ' जिल्ह्यावर लादून जुलुमाच्या रामरामातून निघालेले मोठे उद्योग जिल्ह्याला लाभदायक ठरणार नाहीत ते निर्माण व्हायचे तर स्थानिक जनतेच्या सहभागातूनच निर्माण व्हायला हवेत. त्याचप्रमाणे परिवर्तनाचे हे औद्योगिक प्रयत्न आणि स्वयंसेवी संस्थांचे प्रकल्प ह्याच्यातही एकमेव विरोधी भाव कृतीअसायला नको. शासनाचा विचार व सेवाभावी संस्थांची ह्याच्यात जसा मेळ असायला हवा तसाच काहीसा परस्पर सामंजस्याचा प्रयत्न ह्या दोन प्रयत्नात व्हायला हवा. सेवाभावी संस्थांनी ह्या औद्योगिक विकास-विचारप्रणालीच्या लोकांनाही आपल्याबरोबर घ्यायला हवे. त्यानाही विश्वासात घ्यायला हवे. त्यातूनच परस्पर सहकार्य निर्माण होऊन सुवर्णमध्य गाठला जाईल. समतोल विकासाचा मार्ग खुला होईल.

बीडमधल्या अंतिम टप्प्यात असताना, आष्टी–बीड–आंबेजोगाई इथल्या कॉलेजातल्या प्राध्यापकांचेही प्रश्न कानावर पडले. विद्यार्थ्यांना ज्ञानदान करतानाच ते त्यांना कामाचे महत्त्व पटवून द्यायचा प्रयत्न करताहेत. त्याच्यात सुधारित शेतीचे, विविध व्यवसायाचे, उद्योजकतेचे स्फुल्लिंगही फुलवायचा प्रयत्न करीत आहेत. त्याच्यासाठी त्या पद्धतीचे प्रशिक्षण देतील अशा कार्यशाळा उघडायचा त्या प्राध्यापकाचा प्रयत्न चालू आहे. बीडमधल्या प्राध्यापकांनी तर स्वत: एक लघुउद्योग चालू करून विद्यार्थ्यांना धडा घालून दिला आहे ! मला वाटते ही प्राध्यापकमंडळी, त्यांचे विद्यार्थी वर उल्लेखिलेल्या दोन–तीन गटामध्ये चांगले सामंजस्य घडवून आणू शकतील. ह्या मंडळीशी बोलताना, तसेच बीडमध्ये दोन्ही गटांचे प्रतिनिधित्व करणाऱ्यांशी गप्पागोष्टी करताना अशा तऱ्हेच्या समन्वयाला, परस्पर सहकार्याला चांगला वाव आहे असेच वाटले. हे घडणे आवश्यक आहे. ते घडले आणि त्या समन्वयाला प्राध्यापक-विद्यार्थी–शासनाचे सहकार्य मिळाले तर फार नजीकच्या काळात बीड जिल्ह्याचा आजचा भयाण दारिद्र्याचा तोंडवळा झपाट्याने बदलू लागल्याचे दिसेल कदाचित वर्षभरातही त्या बदलाच्या काही खुणा दृष्टोत्पत्तीस यायला हरकत नाही ! .

. बीडहून मुंबईची बस पकडताना हे घडेल, निश्चित घडेल एवढा विश्वास मला तरी वाटला ! दोन वर्षांनी पुन्हा बीडला आलो तर बदलाची प्रक्रिया जाणवू लागेल ! पाच वर्षांनी आलो तर प्रत्यक्ष बदल दिसेल मनोमन ही प्रतिक्रिया प्रवासाच्या अंती झाली आणि त्यामुळेच नगरहून जामखेडची बस पकडताना धास्तावलेले मन बीडहून मुंबईची एमटी पकडताना सुखावलेले होते......

बसने नगर ओलांडले. नगर सोडताना पुन्हा मनात आले, नगरमध्ये झालेले परिवर्तन, पश्चिम महाराष्ट्रातल्या प्रयोगाची जोड बीडच्या प्रयोगाला देता येणे शक्य आहे का ? त्यातने विकासाला गती मिळू शकेल का ? दीनदयाळच्या जोशींनी हा विचार करायला काहीच हरकत नाही सहकारी साखरकारखाने कदाचित बीडमध्ये निघू शकणार नाहीत, काळी माती तितकीशी साथ देणार नसल्याने; पण कदाचित सहकारी शेती, सहकारी शेतमाल, प्रक्रियासंघ किंवा इतर काही कार्यक्रमात सहभाग वेगळा आणि सहकाराने विकास वेगळा. दोन्हीची सांगड घातली गेली ..हा प्रयत्न करायचा की नाही हे संस्थेने स्थानिक जनतेच्या मदतीने ठरवायचे आहे ..

पण तरीही एक गोष्ट मात्र स्पष्ट होती सांगड न घडताही जी वाटचाल आज आखली गेली आहे तिच्यातूनही खूप काही चांगले बाहेर पडू शकेल बीडचा चेहरामोहरा बदललेला असेल ! आजच्याप्रमाणे त्यामुळेच, पाच वर्षांनी कुणी बीडची भीती मला घालणार नाही उलट बीडच्या प्रयोगाची माहिती देऊन तो प्रयोग बघून यायलाच हवा असेच मला नगरकर सांगतील एवढी खात्री मला वाटते आहे नगरहून मुंबईकडे बस सुटली तेव्हा हाच विचार मनात होता. चेहऱ्यावर हसू होते. मन अगदी शांत होते बीडची धास्ती कुठेच पळून गेली होती बीड जिल्हा आज उमेदीने सूर्योदयाला सामोरा जात आहे. सूर्योदयानंतरच्या कोवळ्या किरणांनी तो खूपच लौकर उजळून निघणार आहे माझ्या मनात तरी त्याबद्दल संदेह नाही खिडकीतून दिसणाऱ्या बाहेरच्या काळोखालाही मला हेच सांगावेसे वाटले. हा काळोख आता फार काळाचा नाही. लौकरच सूर्योदय होणार आहे काळोख नाहीसा होणार आहे !

## स मा प्त



**कृष्णा राजाराम अष्टेकर**

सराफ आणि जव्हेरी

सोन्या मारुती चौक, पुणे २.

आधुनिक दागदागिन्यांची सुप्रसिद्ध

विश्वसनीय पेढी




● **अरुण जोगळेकर** ●

**स्त्री**-पुरुष-मैत्री हे नाते आपल्या समाजातील सर्वसामान्य माणसाच्या जीवनात म्हणण्यासारखे रूढ झालेले नाही. नात्यातल्या किंवा शेजारी रहाणाऱ्या स्त्री-पुरुषांमध्ये बोलणे चालणे असते. ते एकमेकांच्या उपयोगी पडतात; परंतु त्यांची मैत्री असते असे म्हणता येणार नाही. मैत्रीचा मला अभिप्रेत असलेला अर्थ म्हणजे – कोणत्याही दोन व्यक्तींनी एकमेकांना सर्व गुणदोषांसह स्वीकारणे. कोणतीही गोष्ट एकमेकांशी बोलण्यासाठी बाह्य किंवा आंतरिक दडपण किंवा आडपडदा नसणे. आपल्या समाजात दोन पुरुषांची किंवा दोन स्त्रियांची अशी मैत्री असू शकते; परंतु स्त्री-पुरुषांची जवळीक, एकंदरीतच फार डोळ्यावर येत असल्यामुळे स्त्री-पुरुषाची अशी मैत्री फारच अपवादाने आढळते.

नाटयचित्रक्षेत्रात मात्र मला अभिप्रेत असलेली मैत्री स्त्री–पुरुषांमध्ये शक्य होते. मंत्रालयात काम करणारा एखादा अधिकारी त्याच्या कचेरीतल्या कर्मचारी स्त्रीबरोबर जोडीने चार दिवस दिसला की, सगळ्यांचे लक्ष तिकडे वेधले जाते. 'क्ष' प्राध्यापक 'य' विद्यार्थिनीशी जरा जास्त बोलू लागला की, आसपासच्या माणसांचा खोकला वाढू लागतो. नाटयचित्रसृष्टीत असे वातावरण नसते. कोणी अभिनेत्री–अभिनेता अगदी एका बाजूला खूप गप्पा मारीत बसले तर इतरांना त्याची दखलही नसते. येथील वातावरण चाकोरीतील जीवनापेक्षा निश्चित वेगळे असते. ते अधिक मनमोकळे दडपणरहित असते. त्याची कारणे कोणतीही असू शकतील. नाटकांचे विषय, अभिनय याबद्दलच्या मनमोकळ्या चर्चा, नाटकांच्या तालमी–दौरे यामुळे सातत्याने मिळणारा सहवास, इतरेजनांची बंधने न पाळण्याचा कलाकारांचा थोडा-बहुत अहंकार यातील काही कारणे असतील किंवा या सगळ्याच कारणांचा परिपाक म्हणून असेल – येथील वातावरण ठरीव चाकोरीपेक्षा बरेच मोकळे असते. व्यक्तिविकासाला पोषकही असते. येथे स्त्री-पुरुष-मैत्री, विश्वासाची मैत्री, शक्य होते. ही मैत्री बहीण–भाऊ, पती–पत्नी या या रूढ नात्यांपेक्षा वेगळी असते. या क्षेत्रातल्या कलाकारांची जमात वेगळी असते. येथील स्त्री–पुरुषांचे वागणे, बोलणे, शिष्टाचार (manners) हे जास्त प्रच्छन्न असतात. भेटल्यावर स्त्री–पुरुषांनी हस्तांदोलन करणे, खूप दिवसांनी भेटले तर आलिंगन देणे हे अगदी सहज घडते. कधी कोणी नट दिग्दर्शिकेच्या डोक्याला मसाज करीत असेल तर ते खटकत नाही. एखादी नटी पाय देऊन नटाची पाठ दाबत असेल तर तेही चालू शकते. या प्रच्छन्नतेतून जवळीक वाढते. दोष जाणवेनासे होतात. दूरतेत जे कंगोरे जाणवत असतात ते गुळगुळीत होतात. स्नेहसंबंध दृढ होतात. बऱ्याचशा अपरिहार्यतेने हे घडत जाते. स्नेह, मैत्री, प्रेम, भानगड, affair, स्फूर्तिदात्री / स्फूर्तिदाता यांच्या सीमारेषा अत्यंत धूसर होऊ लागतात. कोणत्या भावनेला, संबंधाला काय म्हणायचे ते शेवटी त्या परिस्थितीच्या आणि व्यक्तीच्या संदर्भातच ठरते.

आपल्या समाजाला असे मैत्रीसंबंध अजून मान्य नाहीत. वरवर पुरोगामी वृत्ती दाखवली तरी वास्तवातल्या घटना पचविणे

कुठीण जाते त्यामळे कौटुंबिक जोवनात मनास्ताप होतात. 'अ' आणि 'ब' ची जास्त मैत्री झाली तर 'क' ला ती सहन होत नाही. 'क' जाऊन ती 'अ' च्या पत्नीच्या कानावर घालतो. 'अ' च्या कौटुंबिक कलहाला सुरुवात होऊ शकते. नेहमी होतेच असे नाही. कारण या क्षेत्रात अफवा, हेवेदावे यांचा कलाकारांच्या कुटुंबियांना चांगल्यापैकी परिचय झालेला असतो. कधी कुटुंबातल्या व्यक्तींनी सामंजस्य दाखविले तरी 'हितचिंतकांना' ते खपत नाही. ते सारखे ओरबाडत रहातात. 'हे नाटक्ये हे छचोर' हा कलाकारांकडे पहाण्याचा समाजाचा २५ वर्षांपूर्वीचा दृष्टिकोन अजूनही फारसा बदलेला आढळत नाही. विचारांच्या दृष्टीने समाजाची भरपूर वाटचाल झाली आहे. तरी अजून जीवनातल्या बऱ्याचशा वास्तव गोष्टी मान्य करायला, स्वीकृत करायला समाज काचकूच करतो. विचार आणि कृती यांच्या अंतरातून निर्माण होणारा संघर्ष, चाकोरीचे जीवन जगणाऱ्यांपेक्षा कलाकारांच्या जीवनात तीव्रतेने येतो. कारण स्वतःचे प्रेय मिळवण्याची कलाकारांची उत्कटता विलक्षण प्रबळ असते. सर्वसामान्य जन परंपरेने आखून दिलेले आयुष्य मुकाटयाने जगत असतात—कुरकुरत, ठेचकाळत, कधीकधी रक्तबंबाळ होतसुद्धा ! त्यातून बाहेर पडण्याची गती त्यांना दिसत नसते. कधीकधी गती दिसली तरी ती स्वीकारायला जे धैर्य लागते ते त्यांच्यात नसते. किंबहुना असे म्हणता येईल की, चाकोरी सोडण्यासाठी जी आंतरिक उत्कटता लागते तीच त्यांच्याजवळ नसते. कलाकार या उत्कटतेच्या जोरावरच उभा असतो. त्यापायी इतरांचे कलाकारांशी किंवा कलाकारांचे इतरांशी पटेनासे होते. यातून निर्माण झालेल्या तणावांमुळे किंवा कटकटींमुळे न पटणाऱ्या कौटुंबिकसंबंधांच्या आवर्तात सापडलेले दुःखी जीव, नंतर कलाजीवनात योग्य साथीदार मिळाल्याने सुखी झाल्याची अनेक उदाहरणे आहेत.


या क्षेत्रातली मैत्री ही नेहमीच अगदी अंतःकरणपूर्वकच होते असे मात्र मी म्हणत नाही. करिअरसाठी मैत्रीची अनेक उदाहरणे आहेत. या क्षेत्रात 'जोडी' असणे फार महत्त्वाचे असते. लेखक—अभिनेत्री, मालक—अभिनेत्री, दिग्दर्शक—अभिनेत्री, अभिनेता—अभिनेत्री अशा कित्येक जोडयांनी आपल्या अंगच्या गुणांनी प्रेक्षकांना वेडे केले आहे. म्हणजे ही मैत्री हा पुष्कळदा व्यवसायाचा भाग असतो. हे या व्यवसायातच घडू शकते. मंत्रालयातला अधिकारी आणि त्याची स्टेनो ही काही मत्रालयीन काम करणारी लोकप्रिय 'जोडी' असे होऊ शकत नाही. मात्र व्यवसायाच्या हेतूने सुरुवात झालेली मैत्री शेवटपर्यंत त्याच पातळीवर राहील अशी काही कोणी खात्री देऊ शकत नाही. ती पुढे कोणतेही वळण घेऊ शकते.

स्त्री—पुरुषमैत्रीमुळे कलाकाराची प्रतिष्ठा वाढते असे ठामपणे म्हणता येत नाही; पण प्रतिष्ठा कमी होत नाही हे मात्र निश्चित. अशा संबंधामुळे एखाद्या राष्ट्राचा अध्यक्ष किंवा पंतप्रधान रातोरात खाली खेचला जातो. त्याची प्रतिष्ठा लयाला जाते; परंतु अशा संबंधामुळे एखादा कलाकार 'नाटयक्षेत्राबाहेर फेकला गेला', 'अस्तंगत झाला' असे माझ्या पहाण्यात नाही. यामुळेही कदाचित कलाकार मैत्रीच्या संबंधात सहज पुढे जाऊ शकत असतील, अधिक स्वच्छंदी होत असतील.


कलाकार प्रसिद्धीच्या झोतात असल्यामुळे त्यांच्या बारीक—सारीक हालचाली सर्व ठिकाणी टिपल्या जातात. सामान्य लोकांच्या दृष्टीने जे अब्रह्मण्यम् असते ते कलाकारांच्या वर्तुळातले केवळ उपचार असतात. कोणी कोणा नटीच्या खांद्यावर हात ठेवून बोलला तर त्यात त्यांना किंवा नटीच्या नवऱ्यालाही काही वाटत नाही; पण लोक स्वतःची नीतीची फूटपट्टी लावून भलतेच अर्थ काढतात. त्यातून अफवा पसरवतात. त्या अफवांना वायुवेगाने प्रसिद्धी मिळते. काल पणजीला घडलेल्या घटनेची चर्चा दुसऱ्याच दिवशी पुण्यात सुरू होते. खऱ्या—खोटयाची शहानिशा करण्याची कोणाची इच्छा नसते. कलाकाराला या परिस्थितीला सतत सामोरे जावे लागते. इतर ठिकाणी बारीक—सारीक काही चुपकेचुपके चाललेले असते; पण तिकडे कोणाचे लक्ष नसते. त्यामुळे त्याची समस्या होत नाही. कलाकार मात्र प्रतिक्रिया म्हणून बेबंद होण्याची शक्यता असते. त्याच्या अशा वागण्याला कोणी स्वच्छंद, कोणी बेबंद म्हणेल, कोणी नादी म्हणेल, कोणी छंदी—फंदी म्हणेल.

या स्वच्छंदामुळे प्रतिमा डागाळत असेल; पण प्रतिभा बहरताना कित्येकदा दिसेल. काही कुटुंबजीवने हादरत असतील, मोडत-उध्वस्त होत असतील, उध्वस्त झालेली जीवने पुन्हा उभीही रहात असतील. त्याचा बाऊ करण्याचे कारण नाही. कलानिर्मितीच्या प्रक्रियेत ते स्वाभाविक आहे. कला कलाकारांपेक्षा मोठी आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. ●


'टी' बुक क्लब
१९८३
गाजलेल्या इंग्रजी पुस्तकांचे मराठी अनुवाद
रु. १० भरून सभासद व्हा.
आम्ही ह्या वर्षात सहा पुस्तके
फक्त अर्ध्या किंमतीत सभासदांना देऊ.
कृपया माहिती-पत्रक मागवा.
अजब पुस्तकालय
भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर २.
मेहता पब्लिशिंग हाऊस
१२१६ सदाशिव पेठ, पुणे ३०



# ब्लड कॅन्सर



**पूर्वसूत्र :** मिचेलीवरचे हॉस्पिटलमध्ये चाललेले चुकीचे उपचार थांबवण्यासाठी काय करता येईल ते चार्लसला समजत नव्हतं. त्या उपचारांनी ती मृत्यूच्या जवळ चालली होती. रिसायकल कंपनीतून नदीत सोडल्या जाणाऱ्या बेंझिनविरुद्ध चार्लसनं तक्रार नोंदवली होती. इन्स्टिटयूटचे आणि रिसायकल कंपनीचे संबंध त्याच्या लक्षात आले होतेच. व्यवस्थापनानं यातला धोका ओळखून त्याला बडतर्फ केलं होतं. चार्लसच्या डोळ्यांसमोर आता फक्त मिचेली होती ! मिचेलीला कसंही करून त्या हॉस्पिटलमधून आणि ल्युकेमियाच्या भयंकर आजारातून सोडवायचं होतं; पण ते कसं शक्य होतं ? कॅथरिननं त्याचं पालकत्व काही दिवस कायद्यानं नामंजूर केलं होतं. चार्लसनं या सगळ्यातून सुटण्यासाठी एक भयंकर धाडसी योजना आखली होती. पुढे काय होणार ते कोणालाच सांगता येत नव्हतं !

□

अगदी वेगळ्या व नवीन विषयावरील ही हृदयस्पर्शी कादंबरी.

**मागील अंकात प्रकरणे ११ ते १३ दिली. पुढे....**

**मूळ लेखक : डॉ. रॉबिन कुक : मूळ कादंबरीचे नाव ' फीव्हर. '**

**मुक्त अनुवाद : प्रा. म. रा. राईलकर**

# चौदा

थोड्या वेळानं चार्लस सावध झाला. 'तू होतीस म्हणून बरं झालं.' कॅथरिनच्या जिवात जीव आला.

कॅथरिन जेवण करीत होती तोवर त्यानं 'नव्या' प्रयोगशाळेत कामाला सुरुवात केली स्वत:च्या रक्ताचा नमुना घेऊन त्यानं त्यातील पेशी आणि टी-लिम्फोसाइट्स वेगळ्या केल्या. त्यात मिचेलीच्या ल्युकेमिक पेशी घालून इन्क्युबेटरमध्ये नळी ठेवली.

जेवता जेवता त्यान कॅथरिनला सागितल की, अजून काही फरक दिसत नाही. माझ्या शरीराची प्रतिकारशक्ती इतक्या झपाट्यानं काम करते आहे की, त्याच्यात सर्वच नष्ट होऊन जात आहे. तिनं थोडं सावकाश क्रिया करायला हवी. तेव्हा आता उद्या पुन्हा एक इजेक्शन द्यायला हवं!'

'मिचेली आता बरी दिसतेय!' तिनं विषय बदलला.

'ते दिखाऊ आहे. पूर्वीच्या औषधांचा परिणाम हळूहळू कमी होतोय, त्यामुळं तुला तस वाटतंय.'

दोघानीही आपली अथरुणं मिचेलीच्या खोलीत आणून घातली.

दुसरे दिवशी सकाळी कॅथरिनला फारच हलकं हलक वाटू लागलं. तिच्या मनावरचा ताण खूपच कमी झाला

त्याचा नाश्ता होतो न होतो तो काचा फुटल्याचा आणि घरावर दगड पडल्याचा आवाज आला. कॅथरिननं दचकून विचारल, 'हे काय?'

'रीसायकल कंपनीकडून पाहुणे आले असतील; पण हे अपेक्षित होतंच.'

'आता काय करायचं?' खिडकीतून डोकावून पाहात तिनं विचारलं.

'आपण काहीच करायचं नाही. ते जवळ येईपर्यंत स्वस्थ राहायचं. पिऊन आले आहेत सगळे'

'मी पोलिसाना फोन करते.' असं म्हणून तिनं पोलिसाना फोन केला·

पलीकडून त्रासिक स्वरात विचारणा झाली, 'काय आहे?'

'आमच्या घरावर काही दारुड्यांनी दगडफेक करायला सुरुवात केलीय.'

'ठीक आहे. नाव, पत्ता सांगा. पिनकोड पण.'

'पिनकोड? ते कशाला?'

'हे बाई, आम्हाला सगळे कागदपत्र नीट भरावे लागतात. बरं किती लोक आहेत?'

'सात-आठ असतील.'

'कॅथरिन.' चार्लस ओरडला. 'तू पुढच्या दाराशी लक्ष ठेव. मी मागच्या बाजूला पहातो!'

'लवकर गाडी पाठवा!' कॅथरिननं पोलिस अधिकारी, बर्नी क्राफर्डला ओरडून सागितलं.

कॅथरिनला स्फोटाचा आवाज आला. म्हणून तिने मागच्या बाजूला धाव घेतली. चार्लसनंच बंदुकीचा आवाज काढल्याचं कळताच तिनं श्वास सोडला. 'काय झालं?'

'मी हवेतच एक बार काढला तेव्हा ते लोक घाबरून पळाले.'

आरडाओरडा करीत पुढच्या बाजूनं काही माणसं घराजवळ येऊ लागली चार्लसनं विली कॅरला ओळखलं. त्याच्या हातात मिचेलीच्या खेळघरातून पळवून आणलेला रंगाचा मोठा डबा होता,

चार्लसन खिडकीच्या फटीतून नेम धरून डब्यावर गोळी झाडली. रंग डब्यात पसरला आणि सगळं टोळकं धूम पळाल. ! आपापल्या गाड्यांत बसून ते सगळे पळून गेले.

◻

दुसरे दिवशी सकाळी मिचेलीची प्रकृती चागली सुधारली आणि हॉटेलमधल्या पोऱ्याची नक्कल करीत चार्लसनं तिचा नाश्ता आणला तेव्हा ती खुदकन हसलीसुद्धा!

त्यानं पुन्हा स्वत:च रक्त काढून पाहिलं नी तो म्हणाला, 'माझ्या लिम्फोसाईट्ची प्रतिक्रिया अपेक्षेप्रमाणं झाली नाही मला मिचेलीच्या अॅन्टिजेनचे आणखी एक इजेक्शन द्यायला हवं. काल आपण गुंडांच्या तडाक्यातून नशिबानंच वाचलो.

'पण पोलीस तुला पकडायला आले तर तू काय करणार?'

'माझं काम अपेक्षेप्रमाण होईतो सगळ्याना दूर ठेवणार मी.'

'पण बदुकीच्या जोरावर पोलिसाना दूर ठेवलंस तर ते कायद्याच्या विरुद्ध होईल. विशेष म्हणजे मिचेलीच्या उपचाराचं निमित्त ते सागू शकतात.'

'तेही बरोबर आहे म्हणा!'

'मी एक गोष्ट करू शकते. काल मला भेटलेल्या डिटेक्टिवला भेटून पालकत्वाबद्दल माझा आग्रह नाही असं सागेन. म्हणजे तुला कुणी अटक करणार नाही.'

'ठीक आहे. तसं करून पाहू. तू भाड्याची गाडी घेऊन जा.'

मोठ्या नाइलाजानं कॅथरिन बाहेर पडली. त्याला हात करून तिनं वॅगनगाडी पुढं काढली

गाडी लावून तिनं पॅट्रिक ओ सुलिव्हॅनच्या कचेरीत प्रवेश केला.

'खाली बसणार ना?' पॅट्रिकनं विचारलं.

'धन्यवाद! मी तुमचा फार वेळ घेणार नाही.'

त्याच्या कचेरीचं निरीक्षण करीत, काय नि कसं बोलावं याचा ती विचार करीत होती.

'मी अशाकरता इथं आले आहे की माझ्या पतीविरुद्ध केलेली तक्रार मला मागं घ्यायची आहे.'

पॅट्रिकच्या चेहऱ्यावर कसलाही बदल झाला नाही.

'म्हणजे मला मिचेलीचं पालकत्व नको आहे.'

तरीही त्याचा चेहरा तसाच!

'खरं म्हणजे चार्लसचं नि तिचं रक्ताचं नातं आहे. मला तिची पर्वा नाही असं नाही; तो स्वत. M. D. आहे. त्यामुळे योग्यायोग्य त्यालाच जास्त कळतं. नाही का?'

'तुमचे पती कुठं आहेत?'

कॅथरिन गडबडली. त्यानं अशा स्वरात विचारलं की, जणू काही आतापर्यंत ती काही बोललीच नव्हती. 'मला माहीत नाही.' आपल्या आवाजात पुरेसा ठामपणा नाही हे तिलाही जाणवलं.

'मार्टलबाई, जज्जानी तुम्हाला जसं मिचेलीचं पालकत्व दिलं,

तसं रॉबर्ट टेबर नावाच्या एका व्यक्तीलाही दिलय. त्यामुळं तुम्ही जरी आता पाऊल माग घेतलंत तरी श्री. टेबर घेतील तसं तुम्हाला वाटतं का ?'

'मला नाही सागता यायचं !' ही एक नवीच भानगड झाली असं तिला वाटलं.

'मला अस कळलंय की मिचेलीला विशिष्ट असे उपचार देणं आवश्यक आहे; पण तुमच्या बोलण्यावरून असं दिसतंय की तुमचं आणि चार्लसचं बोलणं झाल असाव.'

'झालंय आणि मुलीची प्रकृती सुधारतेय'

'औषधाच काय ?'

'चार्लस स्वत. डॉक्टर आहे.'

'ते ठीक आहे; पण कोर्ट वाटेल ते उपचार मान्य करणार नाही'

'मला वाटत मी आता निघावं,' म्हणून ती उठली.

'नी मला वाटत तुमचे पती कुठं आहेत ते तुम्ही सांगावं.'

'ते मी नाही सागू शकणार !' आता तिनं स्पष्टपणं म्हटलं.

'तुमच्या पतीबद्दल वाइनबुर्गर इन्स्टिटयूटचीही तक्रार आहे आणि त्यांच्यावर वॉरन्टही आहे.'

'इन्स्टिटयूटची सर्व उपकरणं त्याना परत मिळतील.'

'तुम्ही गुन्ह्याला मदत करताहात असा याचा अर्थ होतो.'

'तुम्ही आपला वेळ दिलात याबद्दल धन्यवाद,' असं म्हणून ती निघाली.

'चार्लस कुठं आहे ते आम्हाला केव्हाच कळलंय.' कॅथरिन गर्कन वळली.

'तुम्ही परत येऊन बसलात तर आपल्याला नीटपण बोलता येईल.' पॅट्रिक म्हणाला. 'वाईनबुर्गर इन्स्टिटयूटन चार्लसवर उपकरणं चोरल्याचा आरोप केला असला तरी माझा त्याच्यावर विश्वास नाही हे काही नेहमीसारख प्रकरण नाही मला वाटतं ते सहजगत्या सुटेल म्हणूनच आम्ही अजून वॉरंटाचा उपयोग केला नव्हता; पण इन्स्टिटयूटकडून सारखा दबाव वाढता आहे. त्यामुळं आज सकाळी शापटसबरी पोलिसाना फोन केला त्यानी कळवलं की, 'तो घरातच आहे आणि तुमचा आग्रह असेल तर आम्ही जातो !' मी म्हटलं ..

'अरे देवा !' कॅथरिन एकदम पाढरीफटक पडली. 'म्हणजे संकटं अजून सपली नाहीत.'

'तुम्ही काय म्हणता आहात ?'

कॅथरिननं मग चार्लसन रीसायकल कंपनी विरुद्ध उघडलेली मोहीम, स्थानिक पोलिसाचं वर्तन वगैरे त्याला सागितल.

'पण तिथले पोलीस चार्लसला पकडायला विशेष उत्सुक दिसतात !' पॅट्रिक म्हणाला.

'तुम्ही थाबवू शकणार नाही का ?'

'माझ तिथं काही चालणार नाही. कारण त्या भागात मला अधिकार नाही.' त्यानं शाफ्ट्सबरीला फोन लावला

'आम्ही गराडा घातलाय घराला,' बर्नी पलीकडून इतक्या मोठ्यान बोलत होता की कॅथरिनला ऐकू जात होतं. 'पण त्यानं अगदी किल्ल्यासारखा बदोबस्त केलाय. बदूक पण आहे आणि आत आजारी मुलगी असल्यानं आमची अडचण झालीय.'

'मग तुम्ही राज्याचे पोलीस मागवता का ?'

'छे छे ! त्याची मुळीच जरुरी नाही.'

पॅट्रिकनं फोन बंद करून कॅथरिनकडे पाहिलं.

'हा गुता अधिकच झालाय. नि मिचेलीकरता चार्लस वाटेल त्या मर्यादेपर्यंत जाईल,' कॅथरिन म्हणाली.

'बाप रे ! बरं असं करू या मीही तुमच्याबरोबर तिकडं येतो. मात्र माझं तिथ काहीही चालणार नाही हे लक्षात ठेवा,' पॅट्रिक म्हणाला.

घरापाशी बरीच गर्दी झाली होती. खूप धमाल होणार म्हणून सगळ्याना कुतूहल होते. नि गर्दी बघून फेरीवाल्यानी आपला मालही विकायला आणला !

'बाप रे ! ही तर शाळेची सहलच आलेली दिसते ?'

'पण बंदुका ?' कॅथरिन म्हणाली.

पॅट्रिकला फ्रँक नेल्सन दिसल्याबरोबर तो पुढे गेला. पॅट्रिकचं येणं त्याला विशेष आवडलेलं दिसत नव्हतं.

'कसं काय चाललंय ?'

'छान ! परिस्थिती काबूत आहे.' आणि वॉकी टॉकी घेऊन त्यानं पोलिसाच्या एका तुकडीला घराच्या मागच्या बाजूला पिटाळलं.

'इतक्या सैन्याची गरज आहे अस वाटत का ?' पॅट्रिकनं विचारलं.

त्यासरशी फ्रँक उसळला, 'हे पहा, इथली परिस्थिती कशी हाताळायची ते मला कळतंय. आम्हाला बोस्टनच्या डुढ्ढाचार्यांच्या उप-


# शतपैलू सावरकर

लेखक : ह. त्र्यं. देसाई

※

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विविधांगी कर्तृत्वाचा परिचय घडविणारी साठ भाषणे. युवकांसाठी विशेष उपयुक्त.

※

**प्रकाशक : 'प्रबोधन'** गोरेगाव, मुंबई ६२

**मूल्य :** रु. २५ **पृष्ठे :** डेमी ३२०

**प्रकाशन :** १५ ऑगस्ट १९८३

देशांची गरज नाही. समजलं ?'

एका उंच माणसान पॅटच्या खाद्याला बोट लावलं. तो म्हणाला, 'मी, 'ग्लोब 'चा प्रतिनिधी काही विशेष ?'

त्यान त्याला फ्रँककडे पाठवलं फ्रँकन हातात मोठा कर्णा घेतला नि बोलायला सुरुवात केली. 'मार्टल, तुमच्या घराला वेढा घातला आहे तेव्हा मुकाट्यानं हात वर करून बाहेर ये !'

थोडा वेळ वाट पाहून त्यानं पुन्हा कर्ण्यातून चार्लसला सूचना दिली आणि सांगितलं मी घराच्या आणखी जवळ येत आहे.

'मार्टल, तुला पुन्हा सूचना देतोय. तू बाहेर आला नाहीस तर आम्ही आत येऊ '

तेवढ्यात धाडकन दार उघडून चार्लस दरवाज्यात उभा राहिला. त्याच्या हातातल्या बदुकीतून हवेत दोन गोळ्या उडाल्या. फ्रँकनं पटकन जमिनीवर लोळण घेतली नि चार्लसनं पुन्हा दार लावल. ते पाहताच फ्रँक धावत धावत मागे आला. जमावानं मोठमोठ्यानं ओरडा केला

स्थानिक टीव्हीच्या लोकानी लागलीच आपली उपकरणं सरसावून फ्रँकची मुलाखत घ्यायला सुरुवात केली ते पाहताच गावातले एक पुढारी जॉन रँडॉल्फनं पुढं येऊन मुलाखतवाल्या बाईला सागितलं, 'पोलिसप्रमुख आपलं काम चोख बजावताहेत असं मला वाटतं.'

बाईनं फ्रँकला विचारलं, 'इथं काय भानगड आहे हे जमलेल्या लोकाना तुम्ही थोडक्यात सांगू शकाल शकाल काय ?'

'तर,' त्यानं लगेच बोलायला सुरुवात केली. 'इथ एक माथेफिरू शास्त्रज्ञ आपल्या मुलीला घेऊन राहिला आहे. मुलगी आजारी असली तरी तो डॉक्टराना तिच्यावर उपचार करू देत नाहीये. त्याच्याकडे शस्त्रास्त्राचा प्रचड साठा आहे. त्याच्यावर मूल पळवण्याचा आणि उपकरणं चोरल्याचा आरोप आहे. मात्र जनतेनं घाबरण्याचं मुळीच कारण नाही. परिस्थिती आमच्या पूर्णपणं काबूत आहे.'

पॅट्रिक कॅथरिनला शोधत होता. ती दिसल्याबरोबर तो तिच्याजवळ गेला ती घाबरून गेली होती.

'तुम्ही यात लक्ष घातल नाही तर काही तरी भयंकर परिस्थिती होईल,' ती म्हणाली.

'मला ते शक्य नसल्याच मी आधीच सांगितलं होतं; पण टीव्हीचे आणि वृत्तपत्राचे प्रतिनिधी असल्यानं पोलीस वेडंवाकडं काही करू शकणार नाहीत. त्यामुळं भ्यायचं कारण नाही. तरीही मी फ्रँकशी बोलून पहातो.' असं म्हणून तो फ्रँककडे गेला.

'तुम्ही पोर्टेबल फोनवरून चार्लसशी बोलून का पाहात नाही ?' पॅट्रिक त्याला म्हणाला.

कपाळाला आठी घालीत का होईना, गाडीत चढून त्यानं चार्लसला फोन केला. 'मार्टल, तुमच्या अटी तरी काय आहेत ते कळू द्यात आम्हाला.'

'जहान्नममध्ये जा !'

'छान सूचना आहे !' फ्रँक फोन गाडीमध्ये ठेवून म्हणाला. 'पण माणूस बोलायला तयार नसेल तर वाटाघाटी तरी कशा करायच्या?'

'आम्ही आमच्या माणसांतर्फे हल्ला केला तर !' फ्रँकच्या पाठीमागून आवाज आला. पॅट्रिक त्या कल्पनेनंच दचकला. रीसायकल कपनीचं टोळकं आलं होतं !

'त्यापेक्षा अश्रुधूर वापरावा,' पॅट्रिक म्हणाला.

'हे पहा तुमच्या सूचना विचारल्याशिवाय देऊ नका आणि आमच्याकडे इतकं साहित्य नसत. आणायच तर राज्य पोलिसाची मदत घ्यावी लागेल; पण आमच आम्ही पाहून घेऊ.'

दुपार होऊ लागली तशी गर्दी हटली. तेवढ्यात घराच्या दिशेनं कॅथरिन धावत जात असलेली त्या दोघांना दिसली.

'ही काय भानगड नवी ?' फ्रँकनं भुवया उचावल्या.

'मार्टलची बायको,' पॅट्रिक उत्तरला.

'बाप रे ! तिला आत जाऊ देता कामा नये.'

बर्फामुळं कॅथरिनला पळता येईना. त्यामुळं ती दोन-तीन वेळा धडपडली. तिच्या मागं चार-सहा पोलीस. एकदम इतकेजण धावल्यामुळ तेच आपसात अडखळून पडले. सगळीच गंमत असं समजणाऱ्या जनतेनं टाळ्या वाजवायला नि ओरडायला सुरुवात केली. पॅट्रिकला वाटत होतं की कॅथरिनन आत पोचावं; पण त्यामुळं आणखी काही नवी भानगड झाली नाही म्हणजे मिळवली.

तितक्यात दार उघडलं नि चार्लसनं मोठा आवाज, प्रकाश नि धूर करणारा हातबाँब कॅथरिनच्या पलीकडे फेकला त्याबरोबर पाठलाग करणारे दचकून थाबले. कॅथरिन तेवढ्यात आत शिरली नि किल्ल्याचं दार बद झालं !

'मी तुझी वाट पाहात होते ममी,' तिच्या गळ्यात हात टाकून मिचेली म्हणाली. आताची आपली कृती बरोबरच आहे याबद्दल तिची खात्री झाली. चार्लस ह्या खिडकीतून त्या खिडकीत पाहात धावत होता. जरा वेळानं तो परत आला नि एकेकीच्या गळ्यात एकेक हात टाकीत मजेनं म्हणाला, 'चला, माझ्या दोन्ही स्त्रिया मला परत मिळाल्या! बरं झालं आलीस ते. मला दोन्ही आघाड्यावर लक्ष ठेवणं कठिण जात होतं.'

'इथल्या पोलिसांवर माझा विश्वास नाही. तो फ्रँक नेलसन म्हणजे भडक डोक्याचा इसम आहे ' पॅट्रिक ओ सुलिव्हँनबरोबरचं बोलणही तिनं त्याला सागितलं. 'पण मला वाटतं आता आपण आपला हट्ट सोडावा.'

'शक्य नाही,' तो हळू आवाजात पण निर्धारानं म्हणाला.

'पण तू जर सर्व उपकरणं परत केलीस नि डॉ. काइत्समानला तू काय करतोयस ते समजावून सागितलंस तर, तुला आपल्या पद्धतीनं हॉस्पिटलमध्येच प्रयोग करता येतील.'

'आता ते शक्य नाही. संशोधन मंडळ आणि मेडिकलबोर्ड दोघं मिळून मला हे अशक्य करून सोडतील आणि आता जर मिचेली माझ्या हातातून सुटली तर पुन्हा ती मला भेटण्याची आशाच नको. चालेल तुला, तसं झालं तर ?' मिचेलीच्या केस गळलेल्या डोक्यावरून हात फिरवीत त्यानं विचारलं. मिचेलीनंही मान हलवली 'शिवाय, माझ्या शरीरानं योग्य तो प्रतिसाद द्यायला सुरुवात केलीय असं वाटू लागलंय.'

'खरं सागतोस ?' आनदानं तिचं मन उचबळून आलं. बाहेरची धमाल पाहून आल्यानं तिला चार्लसचा शातपणा विशेष वाटला.

'मागल्या वेळी मी आपल्या टी-लिम्फोसाइट्स तपासल्या तेव्हा मिचेलीच्या ल्युकेमिक पेशीविरुद्धची त्यांची प्रतिक्रिया सौम्य वाटली;

पण प्रतिक्रिया सुरू झाली हीच महत्त्वाची बाब आहे. अँटिजेनचा आणखी एक डोस पुढचं काम करील असं वाटतंय.'

*बाहेर कर्ण्याचा आवाज येत होता; पण पडणाऱ्या बर्फामुळं स्पष्ट आवाज येईना*

¤

जेवणानंतर कॅथरिननं त्याला अँटिजेनच्या इंजेक्शनचा दुसरा हप्ता दिला अपेक्षेप्रमाणे त्याला त्रास झालाच म्हणून तयार ठेवलेलं एपिनेफिनचं इंजेक्शनही दिलं. त्यामुळं त्रास कमी झाला.

काहीच गडबड होत नाही असं पाहून आणि रात्र पडू लागली *तसतशी बाहेरची जनता कमी होत गेली. रात्री ९ वाजता* कडक थंडी पडल्यावर तर पोलिसाशिवाय कुणी जागेवर राहिल नाही.

कॅथरिन आणि चार्लस यानी आळीपाळीने मिचेलीकडे आणि खिडक्यांकडे लक्ष ठेवायचं ठरवलं.

¤

## पंधरा

रात्री २ वाजता बर्नी क्रॉफर्ड आला. मागल्या वेळी त्यानं फ्रँकला उठवायचा प्रयत्न केला असता जागा झाल्या झाल्या त्यानं बर्नीला ठोसा चढवला. नंतर त्यानं माफी मागितली; पण त्यानं दुखणं थोडच कमी होणार ?

*या वेळी त्यानं गाडीच मागचं दार उघडलं नि त्याच्या अंगावर बर्फ उडवलं. फ्रँक खडबडून जागा झाला नि आपल्या सहाय्यकाचाच* चावटपणा आहे हे कळल्यावर तो त्याच्या मागं धावला; पण बर्नी आधीच पुष्कळ लांब गेला होता. शिवाय अशा थंडीत धावणं थोडंच सोपं होत !

'किती वाजले ?' फ्रँकनं विचारलं.

गाडीतला वॉकी टॉकी काढून त्यानं वॅली फ्रॅबला फोन केला. त्याची योजना फ्रँकला पटली. पटण्याशिवाय इलाजच नव्हता. कारण *आता अश्रू जायची पाळी आली होती ! रात्री २ वाजता हल्ला* करायचं त्यानी ठरवलं होतं.

वॅलीनं सांगितलं की, मी मागचं दार फोडतो आणि पुढच उघडतो तुम्ही लोक लागलीच आत शिरा.

'तुम्ही सगळे तयार ? तो आणि आणखी दोघे मागच्या बाजूला आले. सगळ्याच्या अंगावर पांढरे कपडे असल्यामुळं बर्फाच्या मान्यात ते दिसून येत नव्हते. 'शॉटगन कुठाय ?' अँजेलोनं ब्रेझोला बंदूक *दिली नि ब्रेझोनं त्याला दिली. 'सगळ्याना आपलं काम लक्षात* आहे ना ? पहिल्यांदा जो कोणी मार्टलला पकडील त्याला शंभर डॉलर बक्षीस !'

वॅली मागच्या बाजूला आला नि त्यानं बंदुकीनं कुलूप फोडलं. मागोमाग ब्रेझो नि अँजेलो धावत आले. त्यांनी दार उघडलं नि ते आत शिरले

चार्लसने अगदी साधी एक युक्ती करून ठेवली होती. दार उघडल्याबरोबर एक दोरी तुटली आणि त्या तिघाच्या अंगावर धान्याची नि बटाटयाची पोती कोसळली. तिघेही गाडले गेले. तेवढयात चार्लस नि कॅथरिन जागी झाली नि त्यानं तिघाच्यावर बंदूक चालवली. तिघेही धडपडत उठून पळून गेले.

चार्लसन मागच दार चांगल्या दोरखंडानं बांधून बंद केलं आणि तिथं एक खुर्ची लावून ठेवली.

बहुधा एकाला गोळी लागली असावी. कारण अँम्बुलन्स येऊन गेल्याचा आवाज आला.

सगळं आटपल्यावर तो मिचेलीकडे आला. तिच्या कपाळाला हात लावताच, तिला ताप आला असल्याचं त्याला जाणवलं.

'हे चिन्ह बरं नव्हे !' तो चिंतेनं म्हणाला.

*'काय झालं ?'*

'बहुधा ल्युकेमिक पेशीनी मज्जासंस्थेवरच हल्ला केला असावा.

'म्हणजे तिला आता हॉस्पिटलमधे न्यावं लागणार का ?'

'होय ना !'

रात्री पुन्हा आळीपाळीने दोघानी गस्त घालायचं ठरवलं. बाहेर पाहिलं तर पोलिसाची एकच गाडी उभी होती.

सकाळी कॅथरिनन नाश्ता तयार केला नि चार्लसला उठवलं. मिचेलीला १०२ ताप होता; पण ती उत्साही दिसली. मात्र आता तिला हॉस्पिटलमध्ये नेण्यावाचून पर्याय नाही असंही त्याच्या लक्षात आल.

चार्लसनं पुन्हा आपलं रक्त काढलं. टी-लिम्फोस्पाईट्स वेगळया केल्या नि मिचेलीच्या ल्युकेमिक पेशींबरोबर मिसळल्या. मायक्रोस्कोपखाली ठेवून तो निरीक्षण करू लागला. त्यान आनंदाने उडी मारली कॅथरिनचे खांदे धरून त्याने तिला गरागरा फिरवलं नि काय *झालय ते सांगितलं.* 'माझ्या रक्तात आता चांगली प्रतिकार शक्ती आलेली आहे आता लस काढून मिचेलीला टोचायची !' कॅथरिनचं मनही आनंदाने उचंबळलं.

'म्हणजे तुला आता पुन्हा टोचायला नको ?'

'तसं नव्हे. आपण धोका पत्करायचा नाही. टोचलेलं बरं.' तो म्हणाला.

¤

बाहेर फ्रँक, बर्नी आणि वॅली बोलत होते.

'गोळी लागलेला इसम कसा आहे ?' बर्नीने विचारलं.

'ठीक आहे; पण मार्टल आता ह्या गोष्टीमुळं आणखीनच अडचणीत येणार आहे. कारण त्यान पोलिसाला गोळी मारली.'

'पण त्याने गोळी मारलेली नाही '

'त्यानं काय फरक पडतो ? पण लोकांना पकडण्याकरता सापळा लावणं हाही गुन्हाच आहे !' सकाळ झाल्यावर पुन्हा लोक जमले.

'मला वाटतं,' वॅली संतापाने म्हणाला, 'बॉंब टाकून घरच मुळातून उखडावं.'

'दमानं.' फ्रॅन्कने चापलं. 'आत एक बाई नि आजारी मुलगी आहे हे विसरू नकोस '

दिवस चढू लागला तशी गर्दी वाढू लागली. *अजून काहीच झालं* नाही याच त्याना आश्चर्य वाटलं. फ्रँकने सगळया बाजूनी हत्यारी पोलीस उभे केले.

कर्ण्यामधून ओरडून चार्लसला आवाहन करण्याचा त्याला कंटाळा आला. 'फोन केला तर लेकाचा उत्तरच देत नाही !' आता जर

काही करता आलं नाही तर राज्य पोलीस मधे पडणार याची त्याला खात्री होती आणि श्रेय मिळवण्याची ही संधी त्याला दवडायची नव्हती.

नाश्टयाचा पाव त्याने तोंडात घातला तोच एका भल्या मोठ्या गाडीतून पाच लोक उतरल्याच त्याने पाहिलं दोन अधिकारी आणि तीन रक्षक.

तोंडातला पाव संपेपर्यंत ते पुढं आलेच.

'मी डॉ इवॅनेज आणि हे डॉ मॉरिसन !' असं म्हणून त्यांनी फ्रॅंकला आपली ओळख करून दिली.

'इथं बराच उपद्रव झाला आहे असं कळलं म्हणून आलो. आमचा काही उपयोग होण्यासारखा असला तर पाहू.'

फ्रॅंकने खांदे उडवले.

'मार्टेलने जी उपकरणं पळवून आणली आहेत ती आमची आहेत. त्यामुळे आम्हालाही काळजी आहे !'

'तुमच्याकडे सगळी तयारी असणारच.' मॉरिसन म्हणाला. 'पण हे तिघे इसम ब्रॉयर केमिकल्सचे रक्षक आहेत नि त्यांनी काही गमतीदार वस्तू आणल्या आहेत. तुम्ही पाहणार का ?'

'पण अर्थात निर्णय तुमचा !' इवॅनेज म्हणाला.

'मला वाटतं माझ्याकडे भरपूर माणसं आहेत !' फ्रॅंक म्हणाला.

'ठीक आहे. वाटलं तर सांगा आम्हाला !' इवॅनेज गाडीत बसल्यावर मॉरिसन इवॅनेजला म्हणाला, 'असल्या माणसाच्या हाती काम सोपवलंय म्हणजे विलक्षणच !'

'इथं वृत्तपत्रवाले जमल्यामुळं चार्लसला सहानुभूती निर्माण होईल अशी भीती वाटते. फार दिरंगाई झाली तर राज्य-पोलीसमध्ये पडतील ती मग सगळ्या देशभर प्रसिद्धी मिळेल.'

'मला तसंच वाटतं; पण यामुळं सगळ्या कॅन्सर-व्यवस्थेलाच यामुळं सुरुंग लागेल असं वाटू लागलय.'

'विशेषत: कॅन्सरान आणि वाइनबर्गर,' इवॅनेज म्हणाला. 'त्या बिनडोक पोलीसअधिकाऱ्याच्या डोक्यात आपल्या माणसाचा उपयोग करायचं शिरलं पाहिजे.'

'आपण पेरलय तर ! थोड्या वेळानं आपसूक येईल तो. दुसरा मार्गच नाही त्याला.'

¤

गाडी बंद करून फ्रॅंक आरामात बसला होता. तेवढ्यात काचेवर टकटक आवाज आला म्हणून त्यानं दार उघडलं.

'मी डॉ. काइत्समान आणि माझ्या मागं डॉ. विली. तुम्हीच ना पोलीसप्रमुख फ्रॅंक नेल्सन !'

फ्रॅंकनं दोघांकडं पाहिलं. त्याला कळेना याचं आपल्याकडे काय काम असावं.

'थोडं बोलायचं होतं.' डॉ. काइत्समान.

'आम्ही दोघे त्या आजारी मुलीचे डॉक्टर आहोत आणि मदत करता आली तर पाहावं म्हणून आलोत.'

'मार्टेल तुमचे ऐकेल असं वाटत का ?'

दोघे एकमेकाकडे पाहात राहिले. 'तसं वाटत नाही,' डॉ. काइत्समान म्हणाले, 'तो कुणाशीच बोलणार नाही. त्याला सायकॉटिक अॅटॅक आला आहे !'

'कसला अॅटॅक ?'

'नर्व्हस ब्रेकडाउन.'

'समजलो.'

'आम्हाला मुख्य म्हणजे त्या पोरीची काळजी लागलीय,' डॉ. काइत्समान म्हणाले, 'तिच्या उपचारांना जितका उशीर होईल तितक्या वेगानं तिचा मृत्यू जवळ येईल.'

'फारच वाईट '

'फारच आणि तुम्ही जर उशीर कराल तर तुम्हाला मृत बालकाची सुटका केल्याचं श्रेय मिळेल,' डॉ. काइत्समान म्हणाले.

'शिवाय डॉ. मार्टेल स्वत:च्या पोरीवर भलभलते प्रयोग करीत असेल अशी भीती आहेच.'

'डाबीस ! बरं झालं सांगितलंत. मी आता बाकीच्या अधिकाऱ्याशी बोलतो.'

दुपार उलटून गेली. मुलं शाळेतून परतू लागली जीन पॉल गर्दीतून वाट काढीत पुढं आला. त्याला घराकडे जायचं होतं; पण पोलीस अडवतील म्हणून त्यानं हालचाल केली नाही. तेवढ्यात त्याला चक येताना दिसला त्यानं हाक मारली, 'चक !'

'तू थोडी मोठ्यानं किंकाळी फोड बरं का रे !'

'म्हणणे काय होईल ?' जीन पॉलनं विचारलं.

'म्हणजे तुझ्याकडे लोकांचं लक्ष जाईल आणि तू माझं नाव घेऊन ओरड बरं का रे !'

'काय झालय माहिताय ? डॅडींनी तो कारखाना बंद करायचा ठरवलाय. लोकांना वाटत ते वेडे आहेत. म्हणून त्याच्या मागं लागलेत गावातले सगळे,' जीन पॉलनं माहिती दिली.

'गावातलेच काय बाहेरचेसुद्धा. डॅडींनी मिचेलीला हॉस्पिटलमधून पळवून आणलंय परवा रात्री.'

'खरं सांगतोस ?'

'बास ! तुला आणखी काही नाही वाटलं. डॅडींनी काय चमत्कार केलाय तुला कळत नाही. सगळ्यांना गुंडाळून बसलेत. आपण तर मानलं बुवा त्याना,' चक म्हणाला. 'अरे, आपण दोघं मिळून युक्ती काढू या काही तरी.'

'बोल,' जीन पॉलनं उत्सुकतेनं विचारलं. 'काय करायचं ?'

त्या दोघानी थोडा वेळ संगनमत केलं नि चक फ्रॅंक नेल्सनकडे आला.

फ्रॅंकला तर फारच आनंद झाला; पण घरात जायची त्यांची कल्पना त्याला मान्य झाली नाही. 'त्यापेक्षा तू कर्णा वापरून बोल वडिलांशी.' तो म्हणाला. चार्लस मुलाशी नक्की बोलेल असं त्याला वाटलं.

फ्रॅंकनं कर्णा घेतला नि लोकांना शांत व्हायला सांगितलं. मग कर्णा घराकडे वळवून चार्लसला सांगितलं की, तुझी मुलं तुझ्याशी बोलताहेत; पण काहीही हालचाल झाली नाही. तीनदा प्रयत्न केल्यावर शेवटी त्यानं चककडे कर्णा दिला.

कर्णा हाती घेऊन तो बोलू लागला, 'डॅड, मी चक आहे आणि जीन पॉल पण इथं आहे. तुम्हाला ऐकू येतंय का ?' तीनदा बोलल्यावर दरवाजा किलकिला झाला नि चार्लस ओरडला, 'ऐकू येतय मला, चक.'

तत्क्षणी कर्णा गाडीत फेकून त्यानं घराकडे पळायला सुरुवात केली. मागोमाग जीन पॉल काय झालं हे पोलिसाच्या लक्षात येण्यापूर्वी पोरं निम्म्या अंतरावर पोचली होती.

'पकडा पकडा, हरामखोराना,' फ्रँक ओरडला.

जीन पॉल खेळाडू असल्यामुळं त्यानं चकला मागं टाकलं तेवढ्यात कशाला तरी अडखळून चक खाली पडला नि मागून येणाऱ्या बर्नीनं त्याला पकडलं. चकनं हिसकाहिसकी केल्यामुळ बर्नीचा तोल जाऊन तो खाली पडला आणि त्याच्या अगावर मागून येणारे पोलीस पडले चकनं आपली सुटका करून घेऊन पळायला सुरुवात केली.

तेवढ्यात आणखी दोन पोलीस पुढ आले. त्यानी चकला गाठलच असत. तेवढ्यात चार्लसनं दाराच्या फटीतून गोळीबार केला. त्यासरशी पोलीस थाबले आणि मागं पळू लागले, पोरं दारात पोचताच चार्लसनं दार उघडलं नि पोरं आत शिरली. दार बद झालं! खिडकीतून पाहून त्यानं कुणी त्याच्या माग येत नसल्याची खात्री करून घेतली मग तो मुलाकडे वळला.

मुलाना धाप लागली होती; पण चकित होऊन ती खोलीकडे पाहात होती. खोलीच स्वरूप पार पालटून तिची प्रयोगशाळा झालेली पाहून त्यांना मौज वाटली. सगळ्या खिडक्या बंद, डॅडीच्या हातात बंदूक. लढाईच्या कल्पनेन ते दोघे हरखून गेले; पण चार्लसच्या मुद्रेकडे बघताच तेही गंभीर झाले.

'बाप रे! तुम्ही दोघे इथं काय करीत होतात?'

'आम्हाला वाटलं की, आमची तुम्हाला मदत लागेल. तिकडे सगळे तुमच्या विरुद्ध आहेत,' चक मवाळपणं म्हणाला.

'लोक तुमच्याबद्दल काय काय बोलत होते ते मला ऐकवेना,' जीन पॉल मुसमुसत म्हणाला.

'हे आपले कुटुंब आहे!' चक म्हणाला. 'आपण इथं एकत्रच राहिल पाहिजे. आपल्याला मिचेलीला मदत करायचीय ना?'

'कशी आहे ती डॅड?'

चार्लसने उत्तर दिलं नाही; पण चकचे उद्गार ऐकून तो विस्मित झाला. 'बरोबर आहे त्याचं. मुलगे कुटुंबातलेच आहेत. त्याना वगळून कसं चालेल?'

'अरे लवाडांनो!' म्हणून चार्लस हसला.

वडिलाचा बदललेला आवाज त्याच्या लक्षात आला. त्याबरोबर दोघेही त्याच्याकडे धावले आणि त्याला बिलगले. कॅथरिनही पुढं आली आणि तिने दोघांचे मुके घेतले.

सगळे मिळून मग मिचेलीकडे आले. तिन सर्वांचं गोड हसून स्वागत केलं. चकने तिच्याभोवती हात घालून तिला मिठी मारली.

¤

## सोळा

मार्टलचे मुलगे आपल्या हातून निसटून गेल्यामुळं फ्रँकला फारच शरमल्यासारखं झालं म्हणजे परिस्थिती सुधारण्याऐवजी अधिकच बिघडली. आता सगळं कुटुंबच जणू घराचा किल्ला करून लढताहे! राज्य पोलिसाना बोलवावं अशी सूचना पुन्हा पुन्हा येऊ लागली; पण नेमक तेच त्याला नको होतं. मात्र आता फार उशीर करणं त्याच्या हातात नव्हतं.

डॉ. इव्हॅनेज पुन्हा पुढं आले श्री. व्हाईट आणि श्री. फेरुलो तुमच्याबरोबर काम करायला तयार आहेत,' ते म्हणाले. दोघाही रक्षकांनी हसून संमती दिली.

'वा: फारच छान!' तो म्हणाला खरं; पण त्यांना सागायचं काय हा प्रश्नच होता! तेवढ्यात त्याला आठवलं, 'तुम्ही काही तरी गमतीदार वस्तू आणली आहे ना?'

'तर. श्री. व्हाईट, जरा दाखवता का आम्हाला?'

व्हाइटने एक जड वस्तू फ्रँकच्या हातात दिली आणि विचारलं, 'हे काय असेल असं वाटत तुम्हाला?'

'कुणास ठाऊक! अश्रुधूर?'

'बॉंब आहे हा!'

'बॉंब?' असं म्हणून फ्रँकने ती वस्तू पटकन दूर ढकलली.

'होय; पण ह्यामुळं माणसं मरणार नाहीत. थोडा वेळ सगळा गोंधळ होईल, धूर होईल इतकंच. अशा परिस्थितीत तर फारच छान.'

'पण त्याने तर सगळ्या खिडक्यात बंदोबस्त केलाय. आत जाणार कस?'

'सगळ्या खिडक्या नव्हेत.' मग व्हाइटने त्याला सगळी योजना समजावून सांगितली. 'फेरुलो ह्या कामात वाकबगार आहे. तो वरच्या जिन्यावरून हा बॉंब सोडील मग तुम्ही पुढच्या मागच्या दोन्ही दारानी आत घुसा!'

योजना ठरली!

¤

रात्री दहा वाजता चार्लसने डायलायझर बंद केला आणि अतिशय काळजीपूर्वक त्यातील द्रव्य काढून घेतलं आणि एक छोट्या व्हायलमध्ये ठेवलं. ह्या पदार्थाची नेमकी रासायनिक घटना त्याला माहीत नव्हती; पण हाच तो अज्ञात घटक. इतके दिवस याचाच शोध लागत नव्हता!

दुपारी त्याने स्वतःच्या टी-लिम्फोसाइट्चा परिणाम मिचेलीच्या ल्युकेमिक पेशीवर किती होतो हे मायक्रोस्कोपखाली समक्ष पाहिलं होतं ल्युकेमिक पेशी तात्काळ नष्ट झाल्या. इतक्या झपाट्याने ते काम झालेलं पाहून त्यालाही आश्चर्य वाटलं. ही प्रक्रिया पाहिल्यावर तो आनंदाने ओरडला.

इतकी प्रगती पाहिल्यावर अॅंटिजेनच आणखी इंजेक्शन घेण्याचा विचार त्याने रद्द केला. कॅथरिनलाही स्वाभाविकत. आनंद झाला; पण चार्लसचं चारशे सीसी रक्त काढायच तिच्या जिवावर आलं. मग चक आणि पॉल ह्याच्या मदतीने त्याने ते काम केलं.

जेवणापूर्वी त्याने आपल्या रक्तातल्या श्वेतपेशी वेगळ्या केल्या. 'सामान्य परिस्थितीत ह्या पायरीपर्यंत पोचायला आपल्याला किती वर्षं लागली असती!'

मात्र त्याचं स्वरूप, तीव्रता आणि क्षमता याबद्दल काहीच माहिती नव्हती. अंधारातली उडी होती आता. कारण मिचेलीला केव्हा डोस द्यायचा? कसा ठरवायचा? काहीच समजत नव्हतं.

मिचेली प्रथम तयारच नव्हती. समजूत काढल्यावर कॅथरिननं तिचा हात धरला आणि चार्लसनं शिरेतून द्रव्य सोडायला सुरुवात

केली. मुलगे वर टेहेळणी करीत होते.

आपण द्रव्य दिलय खरं; पण त्याचे परिणाम काय होतील? त्यानं दोघींपैकी कुणालाच काही सांगितलं नाही. इतर दुष्परिणामाबद्दलही त्याला कल्पना नव्हती. तो मिचेलीकडे लक्ष ठेवून बसला.

मध्यरात्री सगळे कुटुंबीय एकत्र आले. तेव्हापर्यंत एकसोळाश हिस्सा देऊन झाला होता आणि तापाव्यतिरिक्त दुसरं लक्षण दिसत नव्हत. तिचा रक्तदाब, नाडी सर्व छान होतं.

त्यानी दोन दोन तास टेहेळणी करायच ठरवल. चक पुन्हा वरच्या मजल्यावर गेला

रात्री २ वाजता चकने जीन पॉलला उठवलं आणि सांगितलं की, अजून काही हालचाल नाही; पण पोलीस गाडीच्या बाजूला आणखी एक गाडी येऊन उभी राहिली आहे.

जीन पॉल तोंड धुऊन आला आणि वरच्या मजल्यावर जाऊन या खोलीतून त्या खोलीत हिंडत राहिला.

तितक्यात त्याला आवाज ऐकू आला. त्यानं कानोसा घेतला; पण शांत! जरा वेळानं त्याची खात्री झाली चिमणीच्या बाजूनं कुणी तरी आहे. तो खाली धावला नि त्यानं चार्लसला उठवलं.

चार्लसने सगळ्यांनाच उठवल. 'जीन पॉलने चिमणीच्या बाजूला आवाज ऐकला. आपल्याला अजून एक दिवस तरी ह्या सगळ्याना दूर ठेवायला हवं,' असं म्हणून कॅथरिनला पिस्तूल देऊन मागच्या दाराशी पाठवल पोराना पुढच्या दाराशी पाहायला सांगितलं आणि आपण वर गेला. आपण चिमणीतून येण्याची वाट आधीच बंद केली याबद्दल त्यान स्वतःची पाठ थोपटून घेतली!

¤

फेरलोनं चिमणीला शिडी लावली आणि तो छपरावर चढला वरच्या मजल्यावरच्या सगळ्या खोल्या त्यानं पाहिल्या. सर्व काही शांत आहे असं पाहिल्यावर तो पुढं आला. आता तो बरोबर चार्लसच्या डोक्यावर होता.

चार्लसला वाटलं जीन पॉलला भास झाला. त्यामुळं तो खाली जायला निघाला; पण तेवढ्यात छप्पर करकरलं! त्याच्या शरीरातून भीतीची एक लहर सळसळली.

पुन्हा आवाज आला. वरच्या आवाजाच्या अनुरोधानं तो खालच्या बाजून जात राहिला. कोणी तरी जिना उतरून येत होत. तो काठी धरून उभा राहिला.

खाली मिचेली हलल्यासारखं त्याला वाटलं. आता काय करावं? खाली जावं की इथंच वाट पाहावी. तेवढ्यात जीन पॉल चकशी काही तरी बोलल्याचा त्याला आवाज आला.

गच्चीच्या दाराशी कुणी तरी आलं. तो काठी सरसावून उभा राहिला. दरवाज्याची मूठ फिरली नि दरवाजा उघडला. त्यान डोकावून पाहिलं आणि आपल्याजवळचा बॉंब काढला.

आता थांबणं धोक्याचं होतं; पण आगातुकाला मारणही शक्य नव्हतं. त्यानं दरवाज्यावर जोरदार लाथ घालून तो बंद केला. त्याला कुलूप घालावं असं त्याच्या मनात आलं तोच भला मोठा स्फोट झाला. जिन्याच्या प्रत्येक पायरीवर आदळत फेरुलो खाली आला.

स्फोट झाल्याबरोबर कॅथरिन आणि मुलं धावत आली. तेवढ्यात मागच्या आणि पुढच्या बाजूला पावलाचे आवाज आले. काचेचं तावदान फोडून आतली मूठ फिरवण्यासाठी एकान हात आत घातला. चकनं तो हात पकडून धरला नि जीन पॉलनं त्याच्या हातावर बॅट घातली.

मागच्या दाराला बांधलेला दोरखंड सोडवण्यात काहीना यश आलं. तिथं कॅथरिन होतीच. तिनं बंदुकीचा घोडा ओढायला सुरुवात केली. ब्रेझो आणि वॅलीनं आपली दिशा बदलली आणि ते पळून गेले.

सगळी गडबड एकदम कमी झाली जीन पॉल मागच्या दारी गेला नि त्यानं दार नीट लावलं नि त्याला टेबल टेकून ठेवल.

डॅडीना काही लागलं-बिगलं नाही ना हे बघायला चक वर गेला, तर चार्लस बेशुद्ध झालेल्या एका माणसाची तपासणी करीत होता.

चकच्या मदतीनं त्यानं त्याला खाली आणलं आणि खुर्चीला चागलं बांधून ठेवल

आता स्वस्थपणे पुन्हा सर्वजण एकत्र आले. मिचेली सोडली तर कुणालाही झोप येणं शक्यच नव्हत. मुलगे पुन्हा वर गेले नि त्यानी टेहेळणी सुरू केली

चार्लस मशीनपाशी आला. पुन्हा रक्तावाटे द्रव्याचा दुसरा डोस सुरू केला; पण मिचेलीला जागसुद्धा आली नाही म्हणजे ते विषारी नक्की नव्हतं.

आता तो आपल्या कैद्याकडे आला तोही एव्हाना सावध झाला होता. त्याच्या खिशातील .३८ चं पिस्तुल त्यानं काढून घेतलं नि विचारलं, 'तू कोण आहेस?'

'फेरुलोनं उत्तर दिलं नाही.

'तू इथं काय करतोयस?'

उत्तर नाही.

शेवटी त्याच्या कोटातून चार्लसनं त्याचं पाकीट काढलं नि उघडलं. 'अँथनी फेरुलो, न्यू जर्सी. 'न्यू जर्सी?'' त्यानं मागच्या बाजूला पाहिलं. अँथनी फेरुलो, ब्रॉयर केमिकल्स, रक्षक. 'ब्रॉयर केमिकल्स!'

त्याला इतका वेळ वाटत होत की, आपल्याविरुद्ध फक्त मेडिकल बोर्ड आणि काही उद्योगपती आहेत; पण आता त्याला लढ्याची तीव्रता समजली.

त्यानं आता सर्व दिवे लावले नि मुलांना बोलावलं.

'उद्या' तो म्हणाला, 'उद्या आपण हे सर्व सोडायचं आणि बाहेर जायचं.

'का पण?' चकनं विचारलं.

'मिचेलीकरता जे काही शक्य होतं ते मी केलं. आता तिला थोडी रेडिओथेरपीची गरज आहे. तेव्हा हॉस्पिटलमध्ये जायला हवं.'

'ती बरी होईल का?' कॅथरिननं विचारलं.

'काही सांगता येत नाही. तत्त्वतः सर्व काही बरोबर चाललं होतं; पण बऱ्याच प्रश्नाची उत्तरं मला माहिती नाहीत. वैद्यकीय जगतात मान्यता न पावलेलं तंत्र मी वापरलं होतं. आता आशा करण्याव्यतिरिक्त आपल्या हाती काहीही नाही.'

चार्लसनं फोनवरून वृत्तपत्राना व टीव्हीला सांगितलं की, उद्या

दुपारी आम्ही बाहेर येत आहोत.

नंतर त्यान फ्रँक नेल्सनला फोन केला तो फोनवर आल्यावर त्यानं त्याला सांगितल की, मी उद्या दुपारी बाहेर येत आहे हे वृत्तपत्रांना कळवल आहे.

टीव्ही आणि वृत्तपत्रे यांचे प्रतिनिधी असले की, दंगल कमी होईल अशी त्याला आशा होती.

दुपारी १२ वाजता त्यान मुख्य दाराच्या माग लावलेल्या फळया काढून कुलुप उघडल. टीव्हीचे आणि वृत्तपत्राचे प्रतिनिधी होतेच. अँब्युलन्स, पोलिसाच्या गाडया आणि बघ्याची प्रचड गर्दी.

चार्लसच्या हातात मिचेली आजूबाजूला कॅथरिन व दोन मुलगे.

'अच्छा, फेडलो. भेटू '

'गर्दीमध्ये, डॉ. इबॅनेज, डॉ. मॉरिसन, डॉ. विली आणि डॉ. क्राइत्समान ह्यांना पाहून त्याला आश्चर्य वाटलं.

काहीच गडबड झाली नाही हे पाहून जमाव निराश झाला. पॅट्रिक ओ सुलेव्हॅनला आनंद झाला नि त्यान टाळया वाजवल्या.

वॅली क्रॅबनं आपलं पिस्तूल सरसावलं आणि ब्रेक्षोच्या मदतीनं तो झाडावर चढला

बदुकीचा आवाज झाला आणि चार्लस हडबडला. तो एकदम पडला नाही; पण खाली बसला. त्यानं मिचेलीला खाली ठेवलं आणि तिच्या बाजूला तो पडला. कॅथरिन वळली आणि किंचाळली.

पॅट्रिक सावधपणं पुढ झाला नि हाती पिस्तूल घेऊन तो कुटुंबाचं रक्षण करू लागला

¤

## सतरा

आजवर स्वत.ला कधी हॉस्पिटलात पडून राहण्याची पाळी न आल्यान चार्लसला ते मोठच त्रासाचं वाटत होतं. रुग्णाला इतकं असहाय आणि अगतिक होत असेल याची त्याला कल्पनाही नव्हती. गोळी लागल्यावर शस्त्रक्रिया करावी लागली आणि आपाततःच सुया, शिरेतल्या इंजेक्शनच्या बाटल्या, मॉनिटर ह्या सगळया बधनात त्याला जखडल्यासारख झालं. जणु आपल्याच प्रयोगशाळेतले आपण एक प्राणी आहोत !

वळायचा प्रयत्न केल्याबरोबर त्याच्या छातीतून असह्य कळा आल्या. बहुधा आपल्या हालचालीमुळ टाके तुटून जखम उघडली असावी अस वाटल म्हणून तो काही काळ पुन्हा कळ येते का याची वाट पहात स्वस्थ पडून राहिला.

डाव्या बाजूनं पाठीतून एक नळी काढून बाटलीत सोडली होती आणि डाव्या हाताला तारा नि दोऱ्या बाधून विचित्रपणं टागून ठेवला होता. पूर्णपणे हॉस्पिटलच्या सेवकाच्या मर्जीवर अवलबून राहावं लागत होत.

दरवाज्यावर टकटक आवाज आला. त्याला वाटलं दर चार तासांनी कृत्रिमरित्या फुप्फुसं फुगवणारा तंत्रज्ञच आला असावा; पण डॉ. काइत्समानना पाहून तो चकित झाला.

'थोडा वेळ बोललं तर त्रास नाही ना होणार ?' डॉ. काइत्समाननी विचारलं

चार्लसनं मानेनच होकार दिला खरा; पण त्याची फारशी बोलायची इच्छा नव्हती; पण मुख्य म्हणजे मिचेलीच कसं आहे ते त्याला कळून घ्यायच होतं आणि तिची प्रकृती बिघडलेली नाही यापेक्षा जास्त काही सागणं कॅथरिनला शक्य झालं नव्हतं.

खुर्ची पुढं ओढून डॉ. काइत्समान चार्लसच्या कॉटपाशी बसले

'आता कसं वाटतय ?'

'फारस चागल नाहीये !' पुन्हा एकदा छातीतून कळ येणार असं त्याला वाटलं.

'चांगली बातमी घेऊन आलोय. आमची थोडीशी घाई होत असेल; पण आम्हाला वाटत तुम्हाला माहिती असणं चागल !'

चार्लस न बोलता स्वस्थ राहिला. 'काय सागणार हा ?' ह्या आशकेनं त्याचे ठोके वाढू लागले.

'एक म्हणजे रेडिओथेरपीला मिचेलीनं चागलाच प्रतिसाद दिलाय. तिच्या मज्जासंस्थेवर झालेला परिणाम एकाच बैठकीत कमी झाल्याच आढळून आल '

चार्लसनं हुकार दिला. केवळ यासाठीच तो आलेला नाही हे चार्लसला सहज दिसत होतं

तेवढयात धाडकन् दार उघडून तत्रज्ञ आत आला कृत्रिम श्वसनाच यत्र ढकलीत तो पुढ आला नि मजेन म्हणाला, 'उपचाराची वेळ झाली, डॉ. मार्टल !' तेवढयात डॉ. काइत्समानना पाहताच अदबीनं थाबून तो म्हणाला, 'माफ करा डॉक्टरसाहेब !'

'असू दे, असू दे'. मध्ये जरासा व्यत्यय आला ते बरंच झाल असं त्याच्या मुद्रेवरून दिसत होतं. 'नाही तरी मला जायचंच आहे आता आणखी एक गोष्ट म्हणजे मिचेलीच्या ल्युकेमिक पेशी एकजात सगळया नाहीशा झाल्या आहेत !'

चार्लसच्या हृदयात एकदम आनंदाची लहर फिरली. 'बाप रे काय सागता ?' तो उत्साहानं ओरडला आणि त्याच्या छातीत एकदम कळ आली.

'खरच सागतोय मी !' डॉ. काइत्समान म्हणाले. 'आम्हा सर्वांनासुद्धा खूप आनद झाला; पण मला सागा डॉ. चार्लस, तुम्ही घरी असताना मिचेलीला काय देत होतात ?'

आनदानं मन उचबळून येत होत खरं; पण छातीतल्या कळा तो उपभोगू देत नव्हत्या. म्हणजे मिचेली बरी होणार तर. आपल्या कल्पनेप्रमाण सगळं घडतय; पण डॉ काइत्समानला आताच काही सागावं अस त्याला वाटेना. 'काही विशेष नाही. मी तिच्या प्रतिकारशक्तीला जागृत करण्याचा प्रयत्न केला '

'बीसीजी सारख काही तरी देऊन ?' डॉ काइत्समाननं विचारलं.

'तसच काही तरी !' आताच त्याला शास्त्रीय चर्चेत शिरायच नव्हत

'ठीक आहे !' दाराकडे जात डॉ. काइत्समान म्हणाले, 'तुम्हाला बरं वाटलं की. आपण बोलू तुम्ही जे काही केलंत त्याची आमच्या केमोथेरपीला मदतच झालेली दिसतेय; पण नंतर पाहू तुम्हाला चागल बरं वाटलं की !'

'होय. चांगलं बरं वाटलं की !'

'पोलीसचौकशी रद्द झाल्याचं कळलंच असेल तुम्हाला ?'

डॉ. काइत्समाननं दिलेल्या बातमीचा उपयोग फारच छान झाला. एरवी कृत्रिम श्वसनाच्या वेदना सहन करणं कठिण जात असे ते आज त्याला जाणवलंच नाही ! वेदनामुळं पेशंटला स्वतः श्वसन करणं शक्य होत नसल्यानं यंत्राच्या साह्यानं त्याची छाती फुगवतात. वीस मिनिटं हा प्रयोग झाल्यानंतर तत्रज्ञ निघून गेला नि थकून गेल्यामुळं चार्लसला झोप लागली.

किती वेळ गेला हे त्याला कळलं नाही; पण कसल्याशा आवाजानं त्याला जाग आली. त्यानं मान वळवून पाहिलं नि तो चमकला, डॉ. इवॅनेज !

'तुम्हाला त्रास झाला नसेल अशी आशा आहे,' डॉ. इवॅनेज मृदुपणे म्हणाले.

चार्लसच्या मस्तकात संतापाची तिडीक उठली; पण डॉ. काइत्समाननी बातमी दिल्यापासून तो समाधानी होता म्हणून काहीच न बोलता तो स्वस्थ राहिला.

'तुमची प्रकृती सुधारते हे चांगलं आहे. सर्जन म्हणाले, तुम्ही नशीबवान आहात !'

नशीब ! काय शब्द आहे. 'छातीत गोळी लागणं हे नशीब समजता का तुम्ही ?'

'चार्लस, मी इथं समझौत्यासाठी आलोय.'

'समझौता ?' चार्लसला कळेना की हा कशाबद्दल बोलतोय !

'मी सगळया गोष्टीचा बारकाईनं विचार केला आणि माझ्या हातून काही चुका झाल्या हे मी कबूल करतो; पण तू तयार असशील तर मी त्या दुरुस्त करायला तयार आहे.'

चार्लसनं इकडे तिकडं पाहिलं. त्याला वाटलं इवॅनेजला म्हणावं 'जहान्नममध्ये जा.'

थोडा वेळ त्यानं उत्तरासाठी वाट पाहिली आणि काहीच उत्तर द्यायला चार्लस तयार नाही हे पाहिल्यावर तो म्हणाला, 'एक गोष्ट मी प्रांजलपण कबूल करतो. तू म्हटलंस तर आम्हाला चांगलंच अडचणीत आणू शकशील; पण त्यानं कुणाचच भलं होणार नाही. मी संचालक मंडळाला पटवून दिलंय की तुझ्याबद्दलची तक्रार त्यांनी मागं घ्यावी नि तुझी जागा तुला परत द्यावी...'

'मसणात गेली तुमची नोकरी,' चार्लस जोरात ओरडला. नि त्याच्या छातीत चमक आल्यामुळं जोगत कण्हला.

'ठीक आहे. मी समजू शकतो. तुला वाइनबुर्गर इन्स्टिटयूटमध्ये यायचं नसेल तर नको येऊ; पण तुला स्वतःच्या इच्छेप्रमाणे काम करता यावं अशा अनेक संस्था आहेत.'

चार्लसच्या मनात मिचेलीचा विचार आला. आपण मिचेलीच्या बाबतीत खरंच काही चमत्कार केला आहे का ? नीट सर्व काही तपासलं पाहिजे. त्याकरता तरी आपल्याला प्रयोगशाळेची जरुरी आहेच.

चार्लसनं वळून डॉ. इवॅनेजकडे पाहिलं. मॉरिसन त्याला कधीच आवडला नाही; पण इवॅनेजबद्दल त्याला कधी राग नव्हता 'मी तुम्हाला आधीच सांगून ठेवतोय. माझ्या भरपूर मागण्या आहेत.' खरं म्हणजे त्यानं कसलाच विचार केलेला नव्हता. कारण बरं होऊन बाहेर पडल्यावर काय करायचं हा प्रश्न त्याच्यापुढं अजून आलाच नव्हता; पण आता अपाटयानं त्याच्या मनात वेगवेगळे विचार येऊ लागले.

'योग्य असतील तर तुझ्या सर्व मागण्या मी मान्य करीन,' डॉ. इवॅनेज म्हणाला.

'आणि मी तुमच्याकरता काय करावं ?'

'वाइनबुर्गरला कोणत्याही प्रकारे अडचणीत आणू नये. आधीच खूप उपद्रव झाला आहे.'

गेले कित्येक दिवस जगापासून दूर–प्रथम घरात कोंडलेला, नंतर इन्टेन्सिव केअर युनिटमध्ये आणि आता स्वतंत्र खोलीत राहिल्यानं वृत्तपत्रीय जगात आपल्याला केवढी मागणी आली आहे याची त्याला कल्पना नव्हती.

स्वतःच्या मुलीकरता ह्या शास्त्रज्ञानं आपला जीव धोक्यात घातला होता आणि अशा एका नामांकित शास्त्रज्ञाला अपमानास्पद रीतीनं हाकलून देणाऱ्या वाइनबुर्गर इन्स्टिटयूट विरुद्ध माहिती मिळवायला वृत्तपत्रं टपलीच होती.

'ठीक आहे. मला एक स्वतत्र अशी संशोधकाची जागा हवी आणि माझ्यावर कोणाची सत्ता असू नये,' चार्लस सथपणे बोलू लागला.

'ते सहज जमेल. खरं म्हणजे बर्कलीमधल्या माझ्या एका मित्राशी माझं आधीच बोलणं झालय.'

'कॅन्सरान. जणू काही नव्यानच हे औषध तुम्ही पाहिलंय असं मानून त्याच्या सगळया चाचण्या पहिल्यापासून घ्यायच्या.'

'तो अभ्यासही आम्ही सुरू केला आहे.'

चार्लसला आश्चर्य वाटलं. इवॅनेज काय बोलतोय त्यावर त्याचा विश्वास बसेना. 'आणि रीसायकल कंपनी ? रोजच्या रोज नदीत विषारी पदार्थ टाकले जाताहेत त्याचं काय ?'

'तुझ्या वकिलान जी धडपड केलीय त्यामुळं परिसर–संरक्षक–मंडळान त्यात लक्ष घातलय. तोही प्रश्न सुटेल.'

'आणि ब्रॉयर केमिकलसनं शोनहौजर कुटुंबाला योग्य ती भरपाई द्यायला हवी. फार तर त्यांचं नाव जाहीर करू नये.' आणखी काय काय बोलावं याचा विचार करीत तो म्हणाला.

'नाव येणार नसेल तर तेही मी करू शकेन.'

क्षणभर शांतता पसरली.

'आणखी काही ?' डॉ. इवॅनेजनं. विचारलं.

चार्लसला आश्चर्य वाटलं. 'इतकं तरी आपण कसं काय बोललो बुवा ?' आणखी काही सुचतं का याचा तो विचार करू लागला नि म्हणाला, 'मला वाटतं इतकं ठीक आहे.'

इवॅनेज उठला. खुर्ची जागेवर ठेवीत तो म्हणाला, 'चार्लस, तू आमच्यासरोबर आता राहणार नाहीस याचं वाईट वाटतं मला. खरंच, विश्वास ठेव !'

**चार्लसला आश्चर्य वाटलं. इवॅनेज काय बोलतोय यावर त्याचा विश्वासच बसेना !**

चार्लस त्याच्याकडे तो जाईपर्यंत पहात राहिला.

न्यू हॅम्पशायर सोडून चार्लस आणि त्याचं कुटुंब बर्कलीला निघालं तेव्हा पोरांनी आरडाओरडा करून नकोसं केलं; पण एकूण सगळं काही समाधानकारक वाटण्याजोगंच नव्हतं का ?

समोरच्या आरशात चार्लसनं पाहिलं. त्याच्याबरोबर मागं जीन पॉल बसला होता नि सारखा खिडकीतून धावता निसर्ग पाहात होता. त्याच्या शेजारी बसलेली मिचेली सारखी चुळबुळ करीत होती ती अगदी कंटाळलेली दिसत होती. स्टेशनवॅगनच्या अगदी मागच्या भागात चक जाऊन बसला होता. जणू त्यानं स्वत:भोवती कोशच करून घेतला होता. सपूर्ण प्रवासभर तो रसायनशास्त्राचं पुस्तक वाचीत बसला होता. छे: चार्लसने डोकं हलवलं, 'हे पोर म्हणजे न उलगडणारं कोडं आहे. कदाचित ही क्षणिक लहर असेल असं त्याला वाटलं. मात्र 'आपण डॉक्टर होणार !' असं ज्या वेळी चकने म्हटलं त्या वेळी त्याच्या हृदयात समाधानाची लहर येऊन गेली खरं !

त्यानं कॅथरिनकडे टक लावून पाहिलं. तिचं आपलं 'दोन उलटे तीन साधे' चालू होतं. प्रवास सुरू झाल्यापासून त्यात खंड नव्हता. चार्लसची नजर तिला जाणवल्यावर मान उचलून तिनं त्याच्याकडे पाहिलं. पोरांचा आरडाओरडा चालू असला तरी परस्परांच्या दृष्टीत त्यांना समाधान आढळलं. मिचेलीच्या आजाराचे दिवस, त्यातही घराचा किल्ला करून दिलेल्या लढाईचा तो शेवटचा भीषण दिवस ! त्या पार्श्वभूमीवर आताचे क्षण विलक्षणच म्हणायचे !

कॅथरिननं त्याच्या गुडघ्यावर हात ठेवला. चार्लस पार कृश झाला होता. तरीही मागच्यापेक्षा देखणा वाटला तिला. त्याच्या दृष्टीत नेहमी कसला तरी ताण कसली तरी अनामिक चिंता भासत असे, त्याचा आता मागमूसही नव्हता.

'झाल्या प्रसंगाचा जो जो मी विचार करते ना, तो तो मला काही कळेनासंच होतंय !' कॅथरिननं स्मित करीत म्हटलं.

चार्लसने शरीराची थोडी हालचाल केली. त्याचा डावा हात प्लॅस्टरमध्ये असल्याने त्याला सारखं अवघडून बसावं लागे. त्यात गाडी चालवण्याचं काम चालूच होतं. होऊन गेलेल्या प्रसंगांचं मूल्यमापन करणं सोपं नव्हतं; 'पण एक गोष्ट नक्की कॅथरिन ही आपली खरीखुरी सखी आहे !' त्याला पक्की जाणीव झाली.

'म्हणजे तूही विचार करत्येस तर ?'

हातातली लोकर पिशवीत खुपसता खुपसता ती म्हणाली, 'बांधाबांध करून निघण्याच्या गडबडीत खरं म्हणजे स्वस्थपणं विचार करायलाच झालं नाही.'

'काय काय समजलं नाही तुला ?'

'डॅडी' जीन पॉलने हाक मारली. बर्कलीमध्ये हॉकी खेळतात का हो ? तिथं बर्फ असतं खेळायला ?'

'मला नाही वाटत,' वाकडी मान करून त्याने जीन पॉलला म्हटलं.

'काय वेडपट आहेस रे !' चकनं मागच्या बाजूनं त्याला टप्पल मारली.

'तू गप्प रहा,' त्याने चकच्या हातातल्या पुस्तकावर थप्पड मारली. 'मी तुला नव्हतं विचारलं !

'हां, आवाज खाली !' चार्लसनं मधे पडत म्हटलं. 'तुला सर्फ शिकता येईल. तिथं किनारा आहे चांगला.'

'सर्फ फक्त दक्षिण कॅलिफोर्निया इथेच खेळतात.' चकनं पुन्हा त्याला डिवचलं.

'पहा यानं पुन्हा लुडबुड सुरू केली !' जीन पॉल म्हणाला.

'पुरे आता !' चार्लसनं कॅथरिनकडे पाहात म्हटलं.

'पोरांची भांडणं ऐकून बरं वाटतंय नाही ? पूर्वीचे दिवस परत आलेत !' ती म्हणाली.

'समाधान ?' चार्लसनं चमकून विचारलं.

'सोडून दे; पण मला एक सांग, वाइनबुर्गरवाल्यांनी अशी एकदम कोलांटी उडी कशी घेतली ?'

'मलाही आधी कळलं नाही. डॉ. इबॅनेज खराच धूर्त आहे; पण हॉस्पिटलच्या माझ्या खोलीभोवती पत्रकार आणि टी. व्ही. प्रतिनिधींच्या घिरट्या त्यानं पाहिल्या असणार. त्यांना सगळं काही सांगण्याचा मला मोह व्हायच्या आधीच त्यानं हा बंदोबस्त केला !'

'देवा, देवा ! खऱ्या भानगडी जनतेला कळल्या तर !'

'छे: मला काही वाटाघाटी करता येत नाहीत. खरं तर मी नवी गाडीच मागायला हवी होती !' चार्लस खळखळून हसला.

मागच्या बाजूला बसलेली मिचेली हे सर्व ऐकत होती. तिनं पिशवीतून केसांचा टोप काढला. तिच्या केसांचा रंग, तिच्या खऱ्या आईप्रमाणं काळाभोर होता; पण आपण कॅथरिनसारखं दिसावं म्हणून तिनं तांबूस रंगाचाच टोप घेतला ! सगळ्यांनी तिची सम-




जूत घालण्याचा प्रयत्न केला. आता नवे केस वाढल्यानंतर ते काळेच येणार हे तिला कळत नव्हत असं नाही; पण तरीही तिनं आपला हेका सोडला नाही मिचेली डोक्यावर घातलेल्या टोपातून बोटं फिरवीत होती ति ला चार्लस म्हणाला, 'आता नवीन टोप घेताना तरी काळा घे बर का ग ?'

'हा काय 'वाईट आहे ?' असं म्हणून जीन पॉलनं तिचा टोप उडवला नि स्वत.च्या डोक्यावर चढवला.

'डॅडी, त्याला सागा ना ! माझा टोप परत दे म्हणाव !'

'तू खर म्हणजे मुलगीच व्हायला हव होतस, चकन पुढं झुकून म्हटल 'या टोपात तू इतका सुरेख दिसतोस म्हणून सागू !'

'जीन पॉल !' मधे पडत कॅथरिनन त्याला दाटलं, 'तिचा टोप परत दे बघू !'

'घे ग टकले !' अस म्हणून त्यानं तिचे ठोसे चुकवीत टोप तिच्याकडे फेकला.

चार्लसनं आणि कॅथरिननं परस्पराकडे समाधानाचा कटाक्ष टाकला. जुने दिवस विसरता विसरत नव्हते. चार्लसचे स्वत:वरचे प्र योग, ती इजक्शनं, मिचेलीच्या रक्ताची तपासणी छे! भयानक स्वप्नच जणू ! त्या सगळ्या धडपडीला यश येईल की नाही हेही कळत नव्हत !

'तुझ्या प्रयोगाना जे यश आलं त्याचं श्रेय हे लोक तुला द्यायचे नाहीत कधी !' कॅथरिनन म्हटल.

'तस कुणालाच खात्रीशीर सागता यायचं नाही. मलासुद्धा ते सिद्ध करता यायचं नाही. कॅन्सरवर माझ्या स्वत:च्या मताप्रमाणं संशोधन करायला बर्कली इन्स्टिटयूटन मान्यता दिली हे फार चागलं झालं. नशीब हात देईल, तर ल्युकेमियाविरुद्ध शरिरानं स्वत:च कसा लढा दिला हे मिचेलीच्या म्हणजे पहिल्याच केसमध्ये मी दाखवू शकेन !'

'डॅडी ! 'जीन पॉल एकदम ओरडला, 'तुम्ही पुढच्या पेट्रोलपंपा वर गाडी थांबवाल का ?'

गाडी थाबवत चार्लस म्हणाला, 'अजून पन्नास मैलापर्यंत आपल्याला शहर भेटणार नाही तेव्हा इथंच थाबून विश्रांती घेऊ या!'

चक आणि मिचेलीचा वाद चालला होता तिकड खूण करीत कॅथरिनला त्यान म्हटल, 'खरंच, पूर्वीचे दिवस परत आलेत बरं का !'

आसपासच्या वाळवंटाकडे हात करीत कॅथरिन म्हणाली, 'वाळवंटसुद्धा इतकं सुदर असू शकतं हे खरं नाही वाटत !'

चार्लसनं खोल श्वास भरून घेतला, 'शापट्सबरी म्हणजे दुसराच कोणता ग्रह असावा असं वाटतंय नाही ?' कॅथरिनचा दंड धरून तिला आपल्याकडे ओढत तो पुढ म्हणाला, 'मला आता कशाची भीती वाटतेय सांगू ? मी आता बहुधा आत्मसतुष्ट होऊन स्वस्थ बसणार !'

'त्याची नको काळजी !' कॅथरिन हसत म्हणाली. 'बर्कलीला पोचेतो थांब. राहायला घर नाही, जवळ पैसा नाही आणि सोबत तीन उपाशी पोरं !'

'खरं आहे तुझं. अजून संकटांना संधी आहेच !' त्यानंही हसून प्रतिसाद दिला

उपसहार–

न्यू हॅम्पशायरच्या शुभ्र पर्वतावरील बर्फ वितळू लागला. पॉटामॅकनदी दुथडी भरून रोरावत धावू लागली खडकावर आपटत, डोंगरातून उड्या घेत ती सोसाट्यानं सागराकडे झेपावू लागली.

हवा हळूहळू उबदार होऊ लागली. अगदी रीसायकल कपनीच्या आसपाससुद्धा वनस्पती, त्यावर कीटक, त्याना पकडणारे बेडूक, सरडे दिसू लागले. इंद्रधनुष्याचे रंग जणू सगळीकडे सांडू लागले.

¤

उन्हाळा घट्ट लागला, तसतसा कपनीच्या वाहत्या टाक्यांतून पुन्हा बेंझिनचे थेब पाण्यात उतरू लागले. नदीचं पाणी पुन्हा विषारी बनू लागलं. उगवलेली वनस्पती, कीटक पुन्हा लुप्त होऊ लागले. वाढत्या उन्हाळ्याबरोबर बेन्झिनचा विषारी सुगधही वाढू लागला. नदीच्या पाण्यातील त्याची तीव्रताही वाढू लागली !

मानवनिर्मित सृष्टीचं चक्र फिरतच होतं !

**स मा प्त**


" मला शक्य असते तर मी या ग्रंथाच्या लाख प्रती काढून ग्रामीण भागातील मुलाबाळांच्या हाती पडतील अशी व्यवस्था केली असती. "

– कलकत्त्याहून **श्री. बा. जोशी**

'कार्व्हर' पहिल्या आवृत्तीचे असे उत्फूर्त व भरघोस स्वागत झाले.

मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, यांनी शाळांसाठी – शिक्षणसंस्थांसाठी या ग्रंथाची शिफारस केली.

**दुसरी आवृत्ती प्रकाशित**

**एक होता कार्व्हर** सौ. वीणा गवाणकर

मूल्य : तीस रुपये । सवलत मूल्य : बावीस रुपये

नजीकच्या विक्रेत्याकडे मागणी करा.

ठराविक प्रतीची विक्री होईपर्यंतच सवलत चालू.

**राजहंस प्रकाशन** १०२५ सदाशिव, पुणे ३०

*With Best Compliments*

*From—*

MOHAN B. CHITALE'S

**RENUKA CONSTRUCTION COMPANY**

Promotors and Builders

214, Narayan Peth, N. C. Kelkar Road,
Near L. I. C. Building, PUNE 411 030.

PHONE: 30806

Contact FOR BOOKING
BETWEEN 10 A.M. TO 12 NOON
4 P.M. TO 8 P.M. EXCEPT SUNDAY

Adverto/A. J. A.